मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

भारतीय सौर फाल्गुन-ज्येष्ठ १९४१

एप्रिल-जून २०१९ / खंड ४३, अंक १

# महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)

**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५**

दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१ ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in

संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in


**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना-विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित-संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व - डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) - स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास-रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश - संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला-के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) - स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज - श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई-बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोदिंया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी ॲन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३१९०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

# अर्थसंवाद

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

एप्रिल-मे-जून २०१९/ खंड ४३ / अंक १

प्रमुख संपादक
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

सहाय्यक संपादक
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय,वारणा नगर)

सल्लागार मंडळ
(२०१८-२१)
जनार्दन काकडे
राजू शिंदे
अजय दरेकर
मोहन सदामते

संपादकीय पत्रव्यवहार
राहुल शं. म्होपरे
विद्यापीठ क्वार्टर नं. डी-३४,
सायबरसमोर,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
ता. करवीर, जि. कोल्हापूर
पिन : ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

लेखातील मते लेखकांचीच

## अनुक्रमणिका

१. समित ल. माहोरे :
नामदार गोखलेंच्या आर्थिक विचारांची सद्य:कालीन यथार्थता ........ ५

२. ज्ञानदेव तळुले, विजय ककडे, महादेव देशमुख :
महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पपूर्तीतील प्रदीर्घ विलंब व प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनातील त्रुटी आणि समस्या: स्थल वास्तव परिप्रेक्षातून पुनर्वसन नियोजनार्थ संक्षिप्त टिपण ........ १६

३. अविनाश कुलकर्णी :
स्थानिक व स्थलांतरित संघर्षाचे सैध्दांतिक विश्लेषण ........ ४३

४. तृप्ती कवाळे :
महाराष्ट्रातील शालेय आरोग्य कार्यक्रमाचा आढावा ........ ४८

५. पी. एस. कांबळे :
विकास दृष्टिकोनातून सार्वजनिक अंदाजपत्रक : विशेष संदर्भ केंद्रीय आणि महाराष्ट्र अंदाजपत्रक २०१९-२० .... ५५

६. मंजुषा मुसमाडे : पुस्तक परिचय
'मोदीनॉमिक्स' ........ ६०

७. अविनाश निकम :
महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची समर्पकता : निबंध लेखकांसाठी विषय रुपरेषा ........ ६५

८. विकास विनायक सुकाळे :
भारतीय शेतीसंबंधी पारित करण्यात आलेल्या कायद्याचे पुनरावलोकन - निबंध लेखकांसाठी विषय रुपरेषा ........ ६८

९. एस. एस. कावळे :
'महाराष्ट्राच्या जडणघडणीत छत्रपती शिवाजी महाराजांचे योगदान -निबंध लेखकांसाठी विषय रुपरेषा ........ ७१

१०. संतोष दास्ताने :
डॉ. नी. भा. सप्रे ........ ७४

११. शि. ना. माने : प्रतिक्रिया
पाणी विपणन : एक उद्बोधन ........ ७७

१२. शि. ना. माने : अर्थ शब्दांची वाट पाहे
डिपॉप्युलेशन ........ ७९

१३. जे. एफ. पाटील: अर्थ शब्दांची वाट पाहे
सस्टेनेबल डेव्हलपमेंट ........ ८१

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### कार्यकारी मंडळ २०१९-२०

- **अध्यक्ष**

**रामदास य. माहोरे (नागपूर)**

- **कार्याध्यक्ष**

**कैलास के. पाटील (परभणी)**

- **कार्यवाह खजिनदार**

**रामदास बापूराव भांडवलकर (यवतमाळ)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

**राहुल शंकरराव म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

**जगन्नाथ पाटील (सातारा)**
**आप्पासाहेब पुजारी (मंगळवेढा)**
**रामकृष्ण टाले (नागपूर)**

- **सदस्य**

**महादेव पाटील (मिरज-सांगली)**
**संतोष कदम (सोलापूर)**
**सुभाष पाटील (पुणे)**
**विनोद गावंडे (अमरावती)**
**अशोकगीर गोस्वामी (भुसावळ)**
**मारोती तेगमपुरे (अंबड)**
**विजय भोपाळे (नांदेड)**
**स्नेहा देशपांडे (नागपुर)**
**बळवंत कोरे (कराड)**
**गणेश मांगडे (दापोली)**
**माधव शिंदे (अहमदनगर)**

- **स्वीकृत सदस्य**

**सुरेश भास्कर ढाके (भुसावळ)**
**शिवाजी कारभारी ढगे (धुळे)**

- **स्थानिक कार्यवाह**

**प्रितम प्रवीन कोठारी (सोलापूर)**



### कार्यालयीन पत्रव्यवहार:

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **आर. बी. भांडवलकर**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गजानन नगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६


### अर्थसंवाद वर्गणी :

- **परिषदेचे सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| आजीव सदस्य | : | रु.३०००/- (एकरकमी) |
| इमारत निधी | : | रु.२०००/- |
| सदस्य सूची | : | रु. १००/- |
| एकूण | : | रु. ५१००/- |

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

शैक्षणिक संस्था : रु.१०००/-(त्रैवार्षिक)
व्यावसायिक संस्था : रु.१०००/-(त्रैवार्षिक)
ग्रंथालये : रु.१५००/-(पंचवार्षिक)

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.


### अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


टिप: म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.


हे त्रैमासिक, प्रकाशक आर. बी. भांडवलकर (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिद्ध केले.

# नामदार गोखलेंच्या आर्थिक विचारांची सद्य:कालीन यथार्थता

**समित ल. माहोरे** †

नामदार गोपाळ कृष्ण गोखलेंचे(१८६६-१९१५) विचार भारतातील वर्तमान राजकीय निर्मितीकरिता उपयोगात आणल्यासारखे दिसून येत नाही. आताच २०१५ मध्ये आपण नामदार गोपाळ कृष्ण गोखलेंच्या निर्वाणीचे शताब्दी वर्ष साजरे केले होते आणि त्याचबरोबर त्यांच्या जयंतीला ही दीडशे वर्ष पूर्ण होऊन गेली आहेत. परंतु आपल्या वर्तमान सामाजिक सभोवताल स्वीकारलेल्या इतर भारतीयांमध्ये जसे सरदार वल्लभभाई पटेल, पंडित जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी, बाबासाहेब आंबेडकर इ. मध्ये गोपाळ कृष्ण गोखलेंचे नाव कुठेतरी अस्पष्ट असल्याचे दिसून येते. त्यांचे आयुष्य फारच लहान होते आणि स्वतंत्र भारताचे साक्षीदार न बनताच त्यांचे निधन झाले. (Ramachandran, 2015) नामदार गोखले यांच्या मृत्यू लेखाचे वर्णन लोकमान्य टिळकांनी महाभारतातील 'मुहूर्त ज्वलित श्रेयो न तु धुमायिनं चिरमं', हे शीर्षक देऊन केले होते. हे शीर्षक गोखलेंच्या जीवन आणि कारकिर्दीला अगदी योग्य होते. खरोखरच ती एक कमी काळ जळलेली परंतु तेजस्वी अशी प्रकाश ज्योत होती. लॉर्ड कर्झनने त्यांची प्रशंसा करताना असे म्हटले होते की, ''ईश्वराने आपणास अनन्यसाधारण योग्यता दिली आहे, ज्याचा उपयोग आपण निःसंकोच खऱ्या भावनेने देशाच्या हितासाठी केला आहे.'' ह्या ना त्या निमित्ताने, या थोर भारत सेवकाची आपण स्मृती जगवितो, त्यांचे गुणगान करतो व त्यांच्यासंबंधीची आपली कृतज्ञतेची भावना व्यक्त करीत असतो.

भारतातील नेमस्त विचारसरणीच्या प्रमुख पुढाऱ्यांमध्ये ना. गोखलेंचे नाव घेतले जाते. देशातील तत्कालीन आर्थिक व राजकीय परिस्थितीचा यथायोग्य अभ्यास, अपरंपरागत सामाजिक विचार, सतत देशहितासाठी त्याग व कार्य करण्याची प्रबळ इच्छा, उदात्त ध्येयदृष्टी यामुळेच गोखलेंचे नाव भारताच्या आर्थिक व राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण ठरते.

लौकिक अर्थाने विचार केल्यास गोखले यांनी त्यांच्या अल्पवयातच फार मोठे यश संपादित केले होते. गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म ९ मे १८६६ रोजी बॉम्बे प्रेसिडेंसीच्या रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यातील कोथलुक गावात झाला. त्यांचे पालक कृष्णराव व वळूबाई एक गरीब पण प्रतिष्ठित चितपावन ब्राह्मण होते. गोखले यांनी कोथापूरमधील राजाराम हायस्कूलमध्ये सुरुवातीचे शिक्षण घेतले आणि नंतर ते उच्च शिक्षणासाठी मुंबईत स्थायिक झाले. एलफिन्स्टन

†सहायक प्राध्यापक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
आजीव सभासद क्र. : १६४१, भ्रमणध्वनी : ९९२११४०५५३, ई-मेल : drsamitmahore@gmail.com

कॉलेज (बॉम्बे) येथे १८ व्या वर्षीच पदवी मिळविली आणि साधे जीवन जगून देशसेवा करण्याची शपथ घेतली.१८१५ ते १९०२ अशी एकूण १८ वर्षे त्यांनी न्यू इंग्लिश हायस्कूल व फर्ग्युसन कॉलेजमध्ये इतिहास आणि राजकीय अर्थव्यवस्थेचे प्राध्यापक आणि त्यानंतर मुख्याध्यापक म्हणून अध्यापनाचे कार्य केले. त्या वेळी ते फक्त वीस वर्षाचे होते. याच काळात वयाच्या २२व्या वर्षांपासून त्यांनी 'सुधारक' या प्रभावशाली इंग्रजी नियतकालिकाचे संपादक म्हणून लिखाण केले. राष्ट्रीय कॉंग्रेस चळवळीचे सक्रिय कार्यकर्ते म्हणून ओळखले जात असताना, ते काही वर्षे राष्ट्रीय कॉंग्रेसचे संयुक्त सचिव होते आणि १९०५ मध्ये बॅनर्सच्या सत्रात अध्यक्ष झाले. उच्च शिक्षणामुळे गोखलेंना स्वातंत्र्य, लोकशाही आणि सरकारच्या संसदीय प्रशासनाचे महत्त्व समजले होते.

'सार्वजनिक सभा' या संस्थेचे ते सचिव होते आणि त्यांनी संस्थेच्या त्रैमासिकाचे संपादक म्हणून कार्यही केले. वयाच्या २५ व्या वर्षी प्रांतिक सभेचे ते सचिव होते आणि २९ व्या वर्षी राष्ट्रीय सभेचे चिटणीस होते. तसेच वेल्बी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आयोगापुढे महत्त्वाची साक्ष ३० व्या वर्षी दिली होती. आणि ३४ व्या वर्षी प्रांतिक तर ३६ व्या वर्षी इंपिरियल किंवा केंद्रीय विधिमंडळाचे सदस्य होते. वयाच्या ४२व्या वर्षी ते कॉंग्रेसचे अध्यक्ष होते आणि याच काळात त्यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली होती. ४६ व्या वर्षी ते रॉयल कमिशनचे सभासद झाले. खरंच किती प्रभावशाली व्यक्तिमत्त्व होते ते! कठोर परिश्रम आणि एकनिष्ठपणा यामुळे देशाला गोपाळ कृष्ण गोखले यांचे अमूल्य असे योगदान मिळाले. परंतु, दुर्दैवाने, सततच्या कठोर परिश्रम आणि थकव्यामुळे त्यांना मधुमेह आणि हृदयाचा दमा वाढला. शेवटी १९ फेब्रुवारी, १९१५ रोजी वयाच्या अवघ्या ४९ व्या वर्षीच ही तेजस्वी ज्योत शांत विझली आणि भारताच्या अशा या महान आणि प्रतिभावान व्यक्तिमत्त्वाचे जीवन संपले.

स्वतंत्र भारताच्या राजकीय आर्थिक विचारांच्या जडणघडणीचे ते एक शिल्पकार म्हणून ओळखले जातात. गोखल्यांनी सार्वजनिक जीवन आणि राजकारणाचे धडे न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे आणि दादाभाई नौरोजी यांच्याकडून घेतले होते. अशा या थोर नेत्याची थोरवी अशी की गांधीजी स्वतः त्यांना महात्मा म्हणत आणि बॅरिस्टर जीना यांच्यावर गोखलेंचा एवढा प्रभाव होता की आपण 'मुस्लिमातील गोखले' व्हावे असे त्यांना वाटत असे. महात्मा गांधींवर गोखले यांच्या विचारांचा बराच प्रभाव होता. त्यामुळेच ते गोखल्यांना आपले गुरू मानत होते. त्यांच्यावर फक्त भारतीय विचारवंतांचाच प्रभाव होता असे नाही तर पाश्चिमात्य विचारवंतांचाही ते पाठपुरावा करीत होते. रूढीवादी लॉर्ड कर्झनने असे म्हटले होते की, ''भारताला उदारमतवादी विचारसरणीची अत्यंत आवश्यकता आहे.'' गोखलेंच्या आर्थिक स्थैर्य आणि पुनरूत्थानाकरिता योजलेल्या उपायांवरून, त्यांच्यावर हॅमिल्टन, केरी आणि सिस्मोंडी यांचा रचनात्मक प्रभाव असल्याचे दिसून येते. परंतु त्यांचे विचार हे समकालीन ब्रिटिश परंपरागत विचारधारेच्या विरुद्ध असल्याचे दिसून येतात. त्यांच्या वैचारिक पद्धतीनुसार, ते कॉम्टे, ॲडम मिलर आणि फ्रेड्रिच लिस्ट याच्या विचारांचा पाठपुरावा करत असल्याचे दिसून येते. गोखले हे एक गाढे अभ्यासक होते, त्यांनी फ्रान्स आणि जर्मनी येथील राज्याने देशाला दिलेल्या आर्थिक संरक्षणाचे समर्थन केले होते. तसेच, कॉबडेन आणि ब्राईट यांचे, भारतीय परिस्थितीवर, मँचेस्टर विचारधारेचे तत्त्व योग्य राहणार नाही, असे त्यांना वाटत होते.

अशा या महान व्यक्तीच्या विचारांच्या परंपरेची साखळी भारतात गांधीजी व त्यानंतर विनोबा भावे यांनी चालवली. परंतु अशा या थोर व्यक्तीचे विचार

आजच्या काळात उपयोगी आहेत का? त्यांचे विचार समजून घेण्यात खरोखरच काही अर्थ आहे का? असे प्रश्न पडणे साहाजिकच आहे. खरे तर त्यांचे विचार हे आजच्या राजकीय व आर्थिक परिस्थितीपेक्षा भिन्न नाहीत राजकारणाची व अर्थव्यवस्थेची दिशा आणि दशा बदलायची असेल तर पुन्हा एकदा गोखले यांच्या विचारांचा अवलंब करावा लागणार आहे. त्याकरिता त्यांचे आर्थिक व राजकीय विचार समजून घेणे आवश्यक आहे.

**गोखले यांचे आर्थिक विचार**

राजकीय स्वातंत्र्य आर्थिक आधाराशिवाय प्राप्त होऊ शकत नाही. त्यामुळे आर्थिक घटकांच्या महत्त्वाची गोखलेंना कल्पना होती. गोखल्यांच्या आर्थिक आणि सामाजिक कल्पना ह्या त्यांच्या राजकीय विचारांचाच एक भाग होता. दृढतेने विचार केल्यास गोखले अर्थशास्त्रज्ञ नव्हते आणि सामाजिक दृष्टिने सखोल विचार करता ते सामाजिक विचारवंतही नव्हते. तथापि, काँग्रेसचे नेते या नात्याने आणि विधिमंडळाचे सदस्य असल्याने गोखलेंना अनेक आर्थिक-सामाजिक बाबींवर विचार करावा लागत असे आणि या विचारांनीच त्यांच्या आर्थिक व सामाजिक कल्पनांना जन्म दिला. या कल्पनांनी त्यांच्या विचारसरणीला प्रतिबिंबित केले, ज्यामुळे त्यांच्या काळातील सामाजिक बदलांची प्रक्रिया प्रभावित झाली. त्यांनी भारतातील अर्थशास्त्रीय विविध समस्यांचे विश्लेषण मूलभूत वैज्ञानिक संशोधनाद्वारे करण्यासाठी पुणा येथे 'रानडे अर्थशास्त्रीय संस्था' या नावाने संदर्भ ग्रंथालय आणि प्रयोगशाळेची स्थापना केली. गोखलेंना कुठल्याही बाबतीत पूर्वग्रह नव्हता किंवा ते पक्षपात करीत तर नव्हते आणि ते अशा तत्त्वांना व कार्यक्रमांनाही कधीच समर्थन देत नव्हते. सामाजिक आणि राजकीय जीवनातही महत्त्वाचे प्रकल्प सुरू करण्याआधी किंवा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याआधी नेहमीच ब्रिटिश परंपरेप्रमाणे सावधगिरी बाळगायचे. ते आधी विषय समजून घ्यायचे, त्याचा अभ्यास करायचे आणि नंतरच आपले मत मांडायचे (Mathur, 1961).

आर्थिक विचारांच्या बाबतीत नामदार गोखलेंवर न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडेंचा प्रभाव होता. त्यांना रानडेंच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक प्रशिक्षण मिळाले, त्याचबरोबर जी. व्ही. जोशी यांचेही ते खूप ऋणी होते. गोखले नेहमीच अर्थशास्त्राचे पाश्चिमात्य आदर्श भारताच्या दृष्टिने कसे योग्य राहतील याचा शोध घेत असत. त्यांनी द्विधातुच्या काटेरी समस्यांवर नवनवीन कल्पना विकसित केल्या होत्या. परंतु सार्वजनिक सेवकाच्या मानसिकतेमुळे आणि अकस्मिक मृत्युमुळे ते पुढे जाऊ शकले नाही. त्यांच्या आर्थिक विचारांची कल्पना मुंबई विधिमंडळ, इम्पेरियल विधिमंडळ तसेच इतर विविध ठिकाणी केलेल्या भाषणांवरून करता येते. त्यांच्या भाषणांमध्ये तत्कालीन आर्थिक प्रश्नांचा उल्लेख नेहमीच होत असे. त्यांचा राजस्व अर्थशास्त्रामध्ये विशेष अभ्यास होता. त्याचबरोबर त्यांना भारताच्या नियंत्रण आणि प्रशासनामध्ये विशेष आवड होती. ब्रिटिश सरकारकडे पाहण्याचा त्याचा विशिष्ट दृष्टिकोन होता. कधी कधी ते ब्रिटिश कार्यपद्धतीला समर्थन द्यायचे; कारण त्यांना ब्रिटिश सरकारच्या प्रशासनाची प्रक्रिया शिकायची होती. याचा अर्थ असा नाही की ते ब्रिटिश सरकारच्या प्रत्येक निर्णयांना आंधळेपणाने समर्थन करीत होते. सरकारच्या कार्यात काही अनियमितता आढळली किंवा भारतीयांच्या विरोधात काही अन्यायकारक निर्णय घेतले गेले तर ते त्याला विरोधही दर्शवायचे. याउलट, आंतरराष्ट्रीय शांतता, सरकारच्या खर्चातील आवश्यक बदल त्याचप्रमाणे राजकीय व सामाजिक सुधारणा याला गोखलेंचे पूर्ण समर्थन होते. त्यांनी प्रचलित करपद्धती आणि अंदाजपत्रकाच्या धोरणांमध्ये सुधारणा सुचविल्या होत्या. भारताच्या अंदाजपत्रकाबाबत त्यांचे असे मत होते

की, ते प्रत्येक क्षेत्रानुसार मांडायला पाहिजे जेणेकरून सर्वच भागांवर जाणीवपूर्वक लक्ष दिले जाईल आणि संपूर्ण देशात सर्वसमावेशक असा विकास घडून येईल. त्यामुळे भारताच्या आर्थिक स्थितीची कल्पना असलेल्या लोकांना आपले मत मांडण्याची संधी मिळेल. विधिमंडळाचे सदस्य असताना अर्थसंकल्पासंबंधित अभ्यासपूर्ण भाषण करायचे. भाषणाची सुरुवात ऐतिहासिक पार्श्वभूमी व त्यानंतर परीक्षण आणि शेवटी निष्कर्ष काढून समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी उपाय सुचवित होते.

**भारतीय वित्त**

गोखलेंनी भारतीय वित्त आणि एकाच बाजूवर आधारित असलेल्या अर्थसंकल्पामधील आर्थिक त्रुटी आणि विसंगतीचा अभ्यास केला होता. सरकारच्या वाढत्या सार्वजनिक खर्चावर त्यांनी टीका केली होती. त्यांचे स्पष्ट मत होते की, ताठर निरहस्तक्षेप धोरण भारतातील वित्ताचे रक्षण करू शकणार नाही. राज्याच्या रचनात्मक आणि कार्यात्मक निर्मितीकरिता, तत्परता, सहानुभूती आाणि दूरदृष्टी ही त्रिसुत्री काळाची गरज आहे हे त्यांनी हेरले होते. आर्थिक विचारांमुळे, कल्याणकारी राज्याचे समर्थन करणारे गोखले आपल्याकाळापेक्षा कितीतरी पुढचा विचार करणारे होते, यात तीळमात्रही शंका नाही. त्यांनी १८७४ ते १९०९ या काळातील वित्ताची चार भागांमध्ये विभागणी करून जमा आणि खर्चाच्या बाजूंचे तुलनात्मक अध्ययन केले, यावरून त्यांच्या असे लक्षात आले की, या काळात करण्यात आलेल्या खर्चात वाढ झाली असून ही वाढ उत्पन्नातील वाढीपेक्षा खूप जास्त होती. जमा आणि खर्च या दोन्ही बाजू समान असावयास पाहिजे. सामान्य व्यक्ती त्यांच्या अंदाजपत्रकातील जमा आणि खर्चामध्ये समानता राखण्यास असमर्थ असतील तर देशाच्या अंदाजपत्रकाला काहीच अर्थ राहात नाही.

१८९५ मध्ये रॉयल कमिशनची नियुक्ती करण्यात आली होती. या कमिशनचा मुख्य उद्देश, 'प्रशासन, सैन्य व नागरी खर्चाचे व्यवस्थापन करणे, त्याचबरोबर ब्रिटिश सरकार आणि भारत सरकार यांच्यातील शुल्काची वाटणी व इतर संबंधित बाबी याची चौकशी करणे' हा होता. गोखलेही या कमिशनचे औपचारिक साक्षीदार होते. त्यांनी संकलित केलेली माहिती व आकडेवारीसह सर्व पुराव्यांना ३ भागात विभागले. पहिला, खर्चाच्या नियंत्रणाकरिता योजिलेली यंत्रणा हाताळणारा, दुसरा, खर्चातील वाढीकरिता कारणीभूत घटक आणि तिसरा, इंग्लंड आणि भारत याच्यातील शुल्काच्या वाटणीसंबंधित होते. गोखलेंनी असे निदर्शनास आणले की, इंग्लंड व इतर देशांमध्ये सार्वजनिक खर्च हा करदात्यांकडूनच नियंत्रित केला जातो. परंतु भारतातील सार्वजनिक खर्चावर कुठलेही लोकप्रिय नियंत्रण नव्हते. सार्वजनिक खर्चाच्या वाढीबाबत गोखलेंनी असा निष्कर्ष काढला की, ईस्ट इंडिया कंपनीकडून ब्रिटिश सरकारला सत्ता हस्तांतरित केल्यापासून तर अलीकडील काळापर्यंत सार्वजनिक खर्चात प्रचंड वाढ झाली होती. सरासरी खर्च हा रु.३ कोटीवरून रु. ७३ कोटीपर्यंत वाढला होता.

मागील काळातील अर्थसंकल्पांच्या अध्ययनावरून गोखलेंनी असे निष्कर्ष काढले की, उत्तर व उत्तर-पूर्वेकडील सीमा वाढविण्यासाठी, तसेच राजघराण्याच्या सोयीसुविधांकरिता सैनिकांवर करण्यात येणाऱ्या खर्चाकरिता भारतातील संसाधनांचा दुरुपयोग होत होता. ब्रिटिश सरकार फक्त ब्रिटिशांच्याच हितसंबंधाचे रक्षण करीत असल्याचा आरोपही त्यांनी केला होता. कारण हा सर्व पैसा भारतीय करदात्यांचा असल्याने तो भारतातील जनतेवरच खर्च करणे आवश्यक होते. भारतातील सार्वजनिक खर्चावर सरकारचे नियंत्रण असायला पाहिजे यावर त्यांनी भर दिला होता. ब्रिटिश सरकार आणि भारत यांच्यातील करांच्या वाटणीबाबत गोखले यांनी असे सुचविले होते की, कार्यालयांवर

होणारा संपूर्ण खर्च हा ५०-५० टक्के असा सामायिक आधारावर विभागला गेला पाहिजे आणि सैन्यांवरील खर्च हा राजघराण्याने भरावा तसेच भारतातील ब्रिटिश सैन्याच्या देखभालीचा वाजवी खर्चाचा भाग राजघराण्याने दिला पाहिजे.

सरकारच्या वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी गोखलेंनी काही उपायही सुचविले होते. त्यांच्या मते, एक, अर्थव्यवस्थेच्या आकारानुसार व आवश्यकतेनुसारच सार्वजनिक खर्च करण्यात यावा. युद्ध, दुष्काळ इ. परिस्थिती वगळता इतर कोणत्याही स्थितीत सामान्य महसूल विशिष्ट मर्यादेपलीकडे खर्च करण्याची परवानगी दिली जाऊ नये. दोन, सैन्यांचा आकार भारतातील सीमेच्या आवश्यकतेनुसार असावा आणि सैन्यांवरील खर्चामध्ये कपात करण्यात यावी. तीन, सार्वजनिक सेवांमध्ये जास्तीत जास्त भारतीयांनाच नियुक्त करण्यात यावे आणि भारतीयांना दिले जाणारे पगार हे इंग्रजांइतकेच असावे जेणेकरून लष्करी खर्चात कपात करता येईल आणि चार, खर्चाचे लेखापरीक्षण (Audit) हे स्वतंत्र केले पाहिजे. त्याचबरोबर लेखापरीक्षण अहवाल (Audit Report) हा नियमित संसदेसमोर मांडला गेला पाहिजे, जेणेकरून वित्तीय प्रशासनाची प्रभावी टीका शक्य होईल.

भारतीय अर्थसंकल्पाच्या संदर्भात गोपाळरावांनी असे मत मांडले होते की, अर्थसंकल्पात वस्तूंवर आधारित जमा-खर्चाची नोंद करण्यात यावी म्हणजे भारतीय परिस्थितीचे आकलन असलेल्या लोकांना त्याचे मत मांडण्याची संधी मिळेल. त्याचबरोबर अनधिकृत सदस्यांकडून झालेल्या सूचना नियंत्रण समितीकडे निर्देशित करण्यात याव्यात व आवश्यक ते बदल समाविष्ट करावे.

मर्यादित साधनांमुळे स्थानिक संस्था आणि प्रांतांची आर्थिक स्थिती ही गरिबीची होती. गोखलेंनी स्थानिक संस्था, प्रांतीय सरकार आणि केंद्र सरकार यांच्यातील करांचे वितरण सुचविले होते. त्यांच्या मते, जमिनीवरील महसूल, जकात आणि जंगलापासून मिळणारा महसूल हा प्रांतांना दिला जावा. अफू, मीठ, सीमाशुल्क, डाक आणि टेलिग्राम यांपासून मिळणारा महसूल केंद्र सरकारला दिला जावा. तसेच स्थानिक संस्थांना महसुलाचे पंचवार्षिक समायोजन करण्यात यावे.

नामदार गोखले हे शिलकी अंदाजपत्रकाच्या बाजूने कधीच नव्हते. त्यांच्या मते, शिलकीचे अंदाजपत्रक अन्यायकारक आणि अनैतिक असून ते एका जबाबदार सरकारने अनावश्यक बाबींवर केलेली उधळपट्टीच असते. शिलकीच्या अंदाजपत्रकाचा उपयोग ब्रिटिश सरकार कर्जाची परतफेड, रेल्वे बांधणी यांसारख्या व्यावसायिक उपक्रमांवर करीत होती. परंतु ह्या खर्चाला गोखलेंचा विरोध होता. त्यांच्या मते, व्यावसायिक उपक्रमांसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड या उत्पन्नातून न करता सरकारच्या इतर उत्पन्नातून करायला पाहिजे. गोखल्यांनी अंदाजपत्रकाच्या आवश्यक बाबींकडे सरकारचे लक्ष वेधले होते व काही शिफारशीही सुचविल्या होत्या. ह्यामध्ये प्रामुख्याने सरकारी जमिनीची मागणी कमी करणे, हिंदुस्थानच्या शेतकऱ्यांना कर्जातून बाहेर काढणे, कृषी बँकांची स्थापना करून त्याद्वारे सहकारी पतसंस्थांची सुरुवात करणे, औद्योगिक आणि तांत्रिक शिक्षणाला प्रोत्साहन देणे, मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणे, सामान्य प्रशासन व्यवस्थेत सुधारणा करणे इत्यादि अनेक महत्त्वपूर्ण शिफारशी त्यांनी मांडल्या होत्या.

आज २१ व्या शतकातही आपण गोखलेंनी सुचविलेल्या बऱ्याच उपायांचा अवलंब केला आहे आणि करतही आहोत. भारतातील सार्वजनिक वित्तासंबंधित या समस्यांचे निवारण करण्यात आपण आजही असमर्थ आहोत. यावरून नामदार गोखले यांचे विचार आजच्या काळातही उपयुक्त आहेत, असे दिसून येते.

**अर्थसंकल्पाचे विश्लेषण**

गोखले आपल्या अर्थसंकल्पीय भाषण व लिखाणांत अचूक आकडेवारीचा उपयोग करीत असत. सरकारची अन्यायकारक कर आकारणी वाढते. दारिद्र्य याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली होती. सरकारचे शिलकीचे अंदाजपत्रक कसे फसवे आहे, हे त्यांनी दाखवून दिले होते. १८९४-९५ ते १८९८-९९ या काळात रुपयाचा पौंडाशी असलेला विनिमयाचा दर १३.१ पेन्सवरून १६ पेन्सपर्यंत बदलला होता. रुपयाचा दर ३ पेन्सने मजबूत झाल्यामुळे या काळातील अर्थसंकल्पात ५ कोटीची शिल्लक निर्माण झाली होती. ह्या शिलकीचे मुख्य कारण सरकारचे श्रेय नसून रुपयाची किंमत वाढली हे होते, असे गोखलेंनी आकडेवारीच्या आधारे स्पष्ट केले होते. त्याचबरोबर १८९८ ते १९०३ या काळात विनिमयाच्या दरवाढीमुळे सरकारचे २२ कोटी रु. वाचले आणि सरकारने त्या वर्षीच्या उत्पन्नातून रुपये ११ कोटी विशेष बाबींवर खर्च दाखविला होता. परंतु गोखलेंच्या गणनेंनुसार प्रत्यक्षात शिलकीतील वाढ रुपये २२ कोटी नसून रुपये ३३ कोटी एवढी होती. सरकारजवळ एवढी शिल्लक असल्यामुळे सरकारने मिठावरील कर कमी करावा, सुती कापडावरील जकात कमी करावी आणि प्राप्ती करातील सुटीची मर्यादा ही रुपये ५०० वरून रुपये १००० करण्यात यावी, अशा तीन महत्त्वपूर्ण मागण्या गोखलेंनी केल्या होत्या. त्यापैकी सरकारने दोन मागण्या मान्य केल्या होत्या. याचे संपूर्ण श्रेय गोखल्यांचे वक्तृत्व, अचूक आकडेवारी आणि निर्धास्तपणे आपली बाजू मांडण्याचे धाडस याला द्यावे लागेल यात काही शंका नाही.

**व्यापार**

प्राचीन काळापासूनच व्यापाराला अर्थव्यवस्थेमध्ये महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्या काळात परदेशी बाजारपेठांमध्ये इंग्रजांचे वर्चस्व होते. त्यामुळे खुल्या व्यापाराच्या तत्त्वांचा पुरस्कार ब्रिटिश कारखानदार, व्यापारी, राजकारणी व अधिकारी अशा सर्वच स्तरांतून केला जात होता. परंतु मुक्त व्यापार धोरणाला गोखलेंचा विरोध होता. मुक्त व्यापार धोरणामुळे फक्त मोठ्या उद्योगांना लाभ होतो आणि असे मोठे उद्योगच आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये टिकाव धरू शकतात. परंतु देशातील लहान लहान उद्योग अशा स्पर्धेमध्ये टिकू शकत नसल्याने ते बंद पडत होते. जगात असे अनेक देश आहेत ज्यांनी मुक्त व्यापाराला विरोध करून आपल्या अर्थव्यवस्थेचा विकास घडवून आणण्याकरिता संरक्षित व्यापार धोरणाचा अवलंब केला होता. उद्योगधंद्याचा विकास करायचा असेल तर अशा लघु उद्योगांना संरक्षण मिळायला हवे आणि त्यांना संरक्षण मिळाले तरच औद्योगिक विकासाबरोबर देशाचा विकास होईल, असे त्यांचे स्पष्ट मत होते.

याबाबतीत गोखले जर्मन अर्थतज्ज्ञ प्राध्यापक लिस्ट यांच्याशी सहमत होते. त्यांच्या मते, देशातील मागासलेल्या औद्योगिक क्षेत्र जागतिक बाजारपेठेत टिकाव धरू शकत नाही त्यामुळे या देशातील स्थानिक उद्योगधंदे बंद पडू लागतात आणि त्यानंतर देशाच्या अर्थव्यवस्थेचा भार शेती क्षेत्रावर पडतो अशा परिस्थितीत सरकारचे स्थानिक उद्योगांना संरक्षण देणे गरजेचे असते. त्यामुळेच संरक्षणात्मक व्यापाराच्या माध्यमातून उद्योगधंद्यांना संरक्षण देऊन मार्ग प्रशस्त केला

**मोफत आणि सक्तीचे शिक्षण**

अशिक्षित लोकांचा देश कधीच विकास करू शकत नाही. त्यामुळे शिक्षणाची सुविधा संपूर्ण देशात पुरविली गेली पाहिजे, असे मत गोखले आपल्या भाषणात नेहमीच मांडायचे. त्यामुळे त्यांनी सर्वप्रथम विधिमंडळात मोफत प्राथमिक शिक्षणाची सुरुवात करण्याला समर्थन दिले आणि १९१० मध्ये त्यांनी केंद्रीय विधिमंडळात मोफत व सक्तीच्या शिक्षणाची मागणी करणारा ठरावही मांडला होता. या ठरावामध्ये

सक्तीचा काळ हा ६ ते १० असा चार वर्षांचाच असावा आणि सक्ती फक्त मुलांकरिताच असावी; मुलींवर करू नये. त्याचबरोबर सक्ती ही स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावी, कारण ब्रिटिश सरकार सक्ती करणार नाही, हे त्यांना माहीत होते. त्यामुळेच ही जबाबदारी त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांवर टाकली होती. या ठरावाचा मुख्य उद्देश हा महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात सरकारच्या संमतीने सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण सुरू करणे हा होता. परंतु हा ठराव मंजूर न झाल्याने पुढच्याच वर्षी म्हणजे १९११ मध्ये पुन्हा ठराव कायद्याच्या स्वरूपात मांडला व कायद्याची कार्यवाही पुढे सुरू झाली होती. याचे कारण म्हणजे ब्रिटिश सरकारला कायद्याचे तत्त्व मान्य होते. त्यामुळेच प्रशासकीय नियमानुसार कायद्याची मध्यवर्ती व प्रांतिक सरकारच्या गॅझेटमधे सर्व भाषांमधून प्रसिद्धीही करण्यात आली आणि देशभर त्यावर चर्चाही झाली होती. त्यानंतर १९१२ मध्ये त्यावर विचार करण्यासाठी समितीही नेमण्याची सुचना केली गेली. परंतु संख्याबळाच्या आधारावर सरकारने हा ठराव फेटाळून लावला. इंग्रज सरकारचा विरोधामुळे सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा ठराव तेव्हा पारित होऊ शकला नाही. आश्चर्याची बाब म्हणजे बऱ्याच भारतीयांनी सुद्धा ह्या ठरावाला विरोध केला होता.

गोखले यांचे आर्थिक विचार एवढे दृढ आणि परिपूर्ण होते की, त्यांनी फक्त मोफत शिक्षणाचा ठरावच प्रस्तावित केला नाही तर ह्या कायद्याच्या अंमलबजावणीकरिता आवश्यक निधीची शिफारसही केली होती. गोखलेंच्या मसुद्यातील महत्त्वपूर्ण बाब म्हणजे या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक निधी हा मध्यवर्ती म्हणजेच केंद्र आणि राज्य सरकार संयुक्तपणे निर्माण करू शकतात असे त्यांनी मांडले होते. या कायद्यामुळे मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे जनसामान्यांचे स्वप्न पूर्ण होईल आणि शिक्षणाच्या सोयीसुविधा जनसामान्यांपर्यंत पुरविणे ही केंद्र सरकारची जबाबदारी आहे. त्यामुळेच केंद्र सरकारने शिक्षणावरही, रेल्वे आणि लष्करा एवढेच लक्ष दिले पाहिजे, असे गोखलेंनी प्रस्तावित केले होते.

गोखलेंनी फक्त मोफत व सक्तीच्याच शिक्षणाचा विचार मांडला असे नाही तर ह्यापूर्वी ब्रिटिश सरकार भारतातील मुलांच्या शिक्षणावर फारच कमी खर्च करीत असल्याची टीका त्यांनी उपलब्ध आकडेवारीच्या आधारे केली होती. १९०३ च्या अर्थसंकल्पीय भाषणात त्यांनी असे निदर्शनास आणले की, अर्थसंकल्पातील शिलकीचा बराचसा भाग हा लष्करावर खर्च होतो. किंबहुना भारतीय अर्थसंकल्प हा लष्करासंबंधित बाबींचा विचार करूनच मांडला जातो असे त्यांनी उपलब्ध माहितीच्या साहाय्याने स्पष्ट केले होते. त्यामुळे लोकोपयोगी आणि कल्याणकारी योजना सरकारला हाती घेता येत नव्हत्या. परिणामी, लोकांचा भौतिक व नैतिक विकास खुंटला होता. ब्रिटिश सरकार इंग्लंडमधील मुलाच्या शिक्षणावर प्रति विद्यार्थी ६० पेन्स खर्च करीत असे तर भारत सरकारचा खर्च प्रति विद्यार्थी फक्त ८ पेन्सच होता हे गोखल्यांनी खात्रीलायक पुराव्याद्वारे मांडले होते.

गोपाळरावांच्या या प्रयत्नांमुळे सर्वत्र शिक्षणासंबंधी जनजागृती झाली. त्याचबरोबर देशभरात शिक्षणाचे महत्त्व पटून त्यावर चर्चा होऊ लागली. त्यानंतर शिक्षणाचा प्रसार करण्याच्या दृष्टिने, देशात विविध ठिकाणी प्राथमिक शिक्षण संस्था स्थापन झाल्यात. पुढे मध्यवर्ती सरकारनेही प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व मान्य केले आणि शिक्षण हे स्वतंत्र खाते सुरू केले. त्यानंतर इंग्लंडच्या राजाने भारतभेटी दरम्यान प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराकरिता ५० लाखांचे अनुदानही जाहीर केले होते.

गोखले हे भारतीयांच्या पहिल्या पिढीतील व्यक्ती होते ज्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेता आले होते.

शिक्षणाचा गोखल्यांवर खूप प्रभाव पडला होता. त्यांचे इंग्रजी भाषेवर चांगलेच प्रभुत्व होते त्यामुळेच ते आपले विचार स्पष्टपणे मांडू शकत होते. पाश्चिमात्य शिक्षणामुळे, त्यांच्यामध्ये लोकशाही आणि संसदीय प्रणालीकरिता आदराची भावना निर्माण झाली होती. शिक्षणामुळेच त्यांच्यावर पाश्चिमात्य, राजकीय आणि आर्थिक विचारांबरोबरच जॉन स्टुअर्ट मिल आणि एडमुंड बुर्के यांच्या विचारांचाही प्रभाव होता आणि गोखलेंना हे सगळे शिक्षणामुळेच शक्य झाले होते.

आजही शिक्षणाला आपल्या सर्वांगीण विकासामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. किंबहुना जीवनाचा तो एक अविभाज्य घटकच आहे. त्यामुळेच आजच्या काळात आपल्याला मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता भासली आणि प्राथमिक शिक्षण जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी कायद्याची मदतही घ्यावी लागली. परंतु या कायद्यासाठी आपल्याला जवळजवळ एक शतक वाट पाहावी लागली, या कायद्यामध्ये गोखलेंचे अमूल्य योगदान आहे, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

### वाढता लष्करी खर्च

दादाभाई नौरोजींबरोबरच गोखलेसुद्धा सरकारच्या वाढत्या लष्करी खर्चावर नेहमीच टीका करीत असत. ब्रिटिश साम्राज्याच्या संरक्षणासाठी व विस्तारासाठी हिंदी सैनिकांचा वापर होत असे. परंतु, साम्राज्याच्या कारणास्तव होणारा संपूर्ण खर्च हा हिंदुस्तान सरकारवरच लादला जात होता. त्याचबरोबर ब्रिटिश साम्राज्य वाढविण्याकरिता जी युद्धे झालीत तेव्हा इथून पाठविलेल्या प्रत्येक सैनिक व अधिकाऱ्यांचा खर्च हा हिंदुस्तान सरकारकडून घेण्यात येत होता. ह्या काळात शिपायांचे पगारही वाढविण्यात आले होते. अशा प्रकारे सर्व अनावश्यक खर्च ब्रिटिश सरकार संरक्षणाच्या नावावर हिंदुस्तान सरकारकडून वसूल करीत असे. त्यामुळे लष्करी खर्चातील होणारी वाढ भरून काढण्यासाठी आरोग्य, शिक्षण यासारख्या महत्त्वाच्या बाबींकडे दुर्लक्ष होत असल्याचे प्रतिपादनही गोखलेंनी केले होते.

### सत्तेचे विकेंद्रीकरण

नामदार गोखले हे सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे समर्थक होते. ते नेहमी म्हणत, लोकांनी लोकांसाठी कार्य केल्यास आणि सर्वांचाच त्यामध्ये सहभाग असल्यास ते लोकशाही पद्धतीला तारकच असेल. त्यांनी जिल्हा परिषद पंचायतीची निर्मिती, स्थानिक मंडळे व ग्रामस्तरावर पंचायती स्थापन करण्याचे सुचविले होते. पुणे महानगरपालिकेचे अध्यक्ष असताना त्यांनी स्थानिक प्रशासनाच्या निवडणूक प्रक्रियेत बरेच बदल केले. संपूर्ण राज्यांना साहाय्य करण्यासाठी प्रांताप्रांतामध्ये सभासदांची परिषद तयार करण्यीची सूचना त्यांनी दिली होती. त्यांचे असे मत होते की, वित्त आणि अंदाजपत्रक अशा महत्त्वाच्या बाबींची चर्चा प्रादेशिक विधिमंडळात व्हावयास पाहिजे. जेणेकरून विविध भागांतील या विषयांची जाण असणारे सामान्य व्यक्ती आपले मत मांडू शकतील. १९०९ मध्ये गोखले विकेंद्रीकरण समितीचे सदस्य होते आणि त्यामार्फत त्यांनी विकेंद्रीकरणाची आवश्यकता अधोरेखित केली होती.

### शेतकरी आणि गरिबांचा विकास

गोखलेंना हिंदुस्थानातील शेतकऱ्यांच्या निम्न आर्थिक व सामाजिक जीवनमानाची जाणीव होती. ब्रिटिश राजवटीत भारतात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असे दोन प्रकारचे कर आकारले जात होते. प्रत्यक्ष कर हे उत्पनावर आकारले जात होते आणि त्यांचे प्रमाणही परकीयांच्या उत्पन्नाच्या तुलनेने जास्त होते. अफूवरील कर, अबकारी कर, शेतसारा, मिठावरील कर, करारनामे तसेच इतर कागदपत्रांवरील कर हे सरकारच्या अप्रत्यक्ष करांचे स्त्रोत होते. अप्रत्यक्ष करांच्या दरात वाढ केल्याने त्याचा प्रत्यक्ष भार हा गरिबांवरच पडत असे. हिंदुस्थानातील कृषीजन्य उद्योग

मंदीकडे वाटचाल करीत होते आणि कृषीपिकांची उत्पादकता कमी होत होती. कृषीक्षेत्राबरोबरच औद्योगिक क्षेत्राचेही उत्पादन कमी झाले होते. संपूर्ण देशात मंदीचे वातावरण निर्माण झाले होते. त्याचबरोबर, १८९६ मध्ये ब्रिटिश सरकारने बर्माच्या जोडणीमुळे उद्‌भवलेली १५ दशलक्ष पौंडची तूट भरून काढण्यासाठी मिठावर कर वाढविला. वाढविलेल्या शेतसाऱ्याचा भार गरिबांवर पडणार असल्यामुळे गोखल्यांनी त्याला तीव्र विरोध दर्शविला होता. १८७९ मध्ये सरकारने कापडावरील ५ टक्के आयातशुल्क काढून टाकले आणि १८९६ मध्ये भारतीय कापसाच्या वस्तूंवर ३१/२ टक्के उत्पादन शुल्क लावले होते. गोखलेंनी या दोन्हींवर हल्ला चढविला आणि स्पष्ट केले की, शेतसाऱ्यामध्ये झालेली वाढ ही शेतकऱ्यांना व गरीब जनतेला भरणे कठीण आहे. त्यापेक्षा सरकारने, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टिने कृषी विकासाकरिता जलसिंचन आणि वैज्ञानिक शेतीसारख्या उपायांचा अवलंब करण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यास सुचविले होते. त्याचबरोबर कापडाची आयात कमी करण्यासाठी त्यावर लादण्यात आलेले आयातशुल्क अयोग्य असल्याचे आणि शेवटी या आयातशुल्काचा भार गरिबांनाच सहन करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले होते.

यावरून आपणास असे दिसून येते की, गोखलेंना शेतकरी आणि गरीबांच्या आर्थिक स्थितीची जाणीव होती. सरकारच्या करनीतीचा परिणाम गरीब जनतेवर अन्यायकारक होत असतो, अशाच प्रकारचे सामाजिक प्रश्न आपल्याला भेडसावत आहेत. आजही आपण शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यास असमर्थ ठरलो आहोत. भारतातील शेतकरी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करीत आहेत आणि प्रत्यक्ष करांपेक्षा अप्रत्यक्ष करांचे प्रमाण जास्त असल्यामुळे गरिबांकरिता ते अन्यायकारकच असल्याचे दिसून येते.

### जमीन महसूल विधेयक

जमीन महसूल संबंधित महत्त्वपूर्ण विधेयक गोखलेंनी मुंबई विधिमंडळापुढे मांडले होते. या विधेयकावरील भाषणात ते म्हणाले होते की, आपण ग्रामीण भागात जन्मलो, तिथे वास्तव्यास होतो, त्याचबरोबर सार्वजनिक महासभेच्या कामाने ग्रामीण भागातील समस्यांचा अभ्यास करण्याची संधीही त्यांना मिळाली होती. याबद्दल खुलासा करण्याचे कारण की, ब्रिटिश अधिकारी नेहमीच आरोप करायचे की भारतातील सुशिक्षित समाज मध्यमवर्गीय असून त्यांना ग्रामीण भागातील लोकांच्या राहणीमानाचा व त्यांच्या समस्यांची कल्पना नसल्याने त्यांनी ह्याबद्दल मत न मांडलेलेच बरे.

सरकारने दर तीस वर्षांनी जमिनीच्या साऱ्याची फेरतपासणी करण्याचे धोरण अवलंबिले होते आणि या फेरतपासणीत शेतसारा वाढविला जात होता. त्याचा भार शेवटी शेतकऱ्यांवरच पडत असल्याने त्यांना ते सहन करणे कठीण जात होते. यावर टीका करून, या विधेयकात शेतसाऱ्याचे प्रमाण एकदाच निश्चित करण्याची मागणी गोखलेंनी केली होती. गोखलेंना शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीची जाणीव होती. तो कर्जबाजारी झाला होता, त्यामुळे सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड वेळेत होत नव्हती. परिणामी, शेतकऱ्यांची जमीन सावकाराकडे जात होती. सावकार ती जमीन स्वतः कसत नसून कुळाकडून कसून घेत होते. हे कूळ म्हणजेच कर्जाची परतफेड न केलेले शेतकरी. पूर्वाश्रमीचा शेतमालक हा कूळ बनत असे. १८८४ मध्ये न्यायमूर्ती रानडे यांनी जमीनदारी ऐवजी रयतवारी पद्धतीचे समर्थन केले होते. रयतवारी पद्धत मुंबई प्रांतात प्रदीर्घ काळापासून चालू होती आणि ग्रामीण भागातील लोकांकरिता हीच पद्धत योग्य आहे; या प्रांतातील लोकांचा शेतसारा हा कायम स्वरूपाचा असावा, एवढीच आमची मागणी आहे.

रानडेंच्या याच मागणीचा पाठपुरावा गोखलेंनी केला होता. शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाची परतफेड वेळेत न झाल्यास सावकार ह्या जमिनींवर ताबा घेत असत. या विरोधात मुंबई प्रांतात सरकारने नवे विधेयक आणले होते. १८९५ मध्ये जमिनी काढून घेण्याच्या अधिकारांवर निर्बंध आणण्यास काँग्रेसने ठराव मांडला होता आणि फिरोज शहा-मेहता यांनीही या ठरावाचे समर्थन केले होते. कारण शेतकऱ्यांना संरक्षण मिळावे आणि ते कर्जबाजारी बनू नये, हाच या ठरावाचा मुख्य उद्देश होता. ह्यामुळे लोकांचे हित तर साधले जाणार नाही, परंतु सावकार, खोत यांच्या अधिकारांवर संक्रांत येईल अशी स्पष्ट भूमिका गोखलेंनी मांडली होती. गोखलेंनी जमीन महसूल व्यवस्थेत काही महत्त्वपूर्ण सुधारणा सुचविल्या होत्या. त्यांचे स्पष्ट मत होते की, रयतवारी भागात जिथे शेतकरी थेट सरकारकडे पैसे देतात त्या ठिकाणी महसूल हा एकूण उत्पादनाच्या २० टक्क्यांपेक्षा अधिक असू नये.

यावरून हे स्पष्ट होते की, त्या काळातही अर्थव्यवस्थेमध्ये शेतकऱ्यांना महत्त्वपूर्ण स्थान होते. परंतु शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यासाठी पतपेढ्या किंवा बँका ह्या जवळजवळ नव्हत्याच. त्यामुळेच वेडरबर्न यांच्या शेतकऱ्यांकरिता बँकांच्या मागणीला रानडे आणि गोखले यांनी मान्य केले होते.

**राष्ट्रीय एकता आणि समानता**

गोखलेंना एकतेच्या आवश्यकतेची आणि शक्तीची जाणीव असल्याने त्यांनी भारताच्या विकासासाठी राष्ट्रीय एकतेचे महत्त्व पटवून दिले होते. त्यांनी जात आणि पंथाच्या वैचारिक भेदभावांना नष्ट करून सर्व लोकांना एकत्र येण्याचे आव्हान केले होते. जातीविषयक भेदभावांबरोबरच धार्मिक विवाद मिटविणेही आवश्यक होते. त्याकरिता त्यांनी हिंदू-मुस्लीम एकतेचे समर्थन केले आणि या दोन धार्मिक समुदायांच्या सहकार्याशिवाय भारताचा विकास होऊ शकत नाही, असा दावा केला होता.

राष्ट्रीय एकता आणि समानता ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याने समानतेचा पुरस्कारही गोखल्यांनी केला होता. जोपर्यंत अंतर्गत वादविवाद मिटविले जात नाहीत तोपर्यंत देशाच्या राष्ट्रीय समस्यांवर मात करणे शक्य होत नाही. कारण त्यामध्ये देशातील सर्वच लोकांचे सहकार्य मिळत नाही. याचाच फायदा घेत इंग्रजांनी देशात जाती व धार्मिक भेदभावांचे शस्त्र अवलंबिले. परंतु ब्रिटिशांच्या या धोरणाला त्यांनी विरोध दर्शविला होता. त्याचबरोबर विदेशात काम करणाऱ्या भारतीय श्रमिकांना मिळणाऱ्या वागणुकीवर टीका केली होती. मार्च १९१२ मध्ये त्यांनी इंपिरीयल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये भारतीय अनुबंधित मजुरांच्या निवड विरोधी शिफारसीचा ठराव मांडला होता. (Venkatachalapathy, 2015)

**समारोप**

मध्यवर्ती विधिमंडळात सतत दहा वर्षे टिकून आर्थिक व राजकीय प्रश्नांवर अभ्यासपूर्ण आणि बेधडक बोलणारे नामदार गोखले हे पहिले भारतीय होते. त्यांनी सामान्य जीवनाशी निगडित आर्थिक व सामाजिक अशी अनेक महत्त्वपूर्ण विधेयके मांडली. यामध्ये त्यांचा वित्तीय प्रशासनासंबंधीचा अभ्यास महत्त्वपूर्ण आहे. त्यांचे अंदाजपत्रक, राजकोषीय धोरण, सत्तेचे विकेंद्रीकरण, लष्करी खर्च, मोफत व सक्तीचे शिक्षण इत्यादींसंबंधी विचार वाखाणण्याजोगे आहेत. सरकारी धोरणांसंबंधी सामान्य जनतेचे मत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी जाणले होते. सरकारी खर्च व्यवस्थित व नियोजन पूर्ण करण्याला त्यांनी महत्त्व दिले होते. त्यांनी आपल्या भाषणातून केलेल्या टीकेमुळे सरकारी धोरणात बदल झाल्याचे दिसून आले. परिणामी आरोग्य, शिक्षण, जलसिंचनाच्या सोयी यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबींवर होणाऱ्या खर्चात वाढ झाली. गोखलेंनी द्रष्ट्याच्या प्रतिभेतून जे विचार मांडले होते त्याचा अवलंब

करण्यास आपण आज दीडशे वर्षांनंतरही असमर्थ ठरलो आहोत. ह्या समस्या अधिक बिकट झाल्या आहेत. त्यामुळे आज आपल्याला गोखलेंनी सुचविलेल्या मार्गाचा अवलंब करावा लागणार आहे. यावरूनच गोखलेंच्या आर्थिक विचारांची सद्यकालीन यथार्थता दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ यादी :**


1) Mathur, D. B. (1961). Gopal Krishna Gokhale, and the Impact of the West. Indian Political Science Association, 301-311.
2) Patwardhan R.P. and Ambekar D.V. (1962), Speeches and Writings of Gopal Krishna Gokhale', Vol. I, Economic, Asian Publishing House, the Deccan Sabha, Poona.
3) Ramachandran, N. (2015, April 20). Gopal Krishna Gokhale: a forgotten Nationalist. Retrieved from Livemint: https://www.livemint.com/Opinion/d7tHBdTidLXoTmKkql5vMO/A-forgotten-nationalist.html
4) Tikekar, Aroon, (2015), 'The Legacy of Gopal Krishna Gokhale', Freedom First, The Liberal Magazine, Mumbai, February.
5) Venkatachalapathy, M. (2015). Gopal Krishna Gokhale - A liberal Thinker. Internatinal Journal of African and Asian Studies, 41-44.
6) संपादक, 'नेक नामदार', दै. लोकसत्ता, ९ मे, २०१५
7) फडके, य. दि., 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र', श्री विद्या प्रकाशन, खंड १, पृष्ठ ६१ पुणे.
8) खांदेवाले श्री. वि., व नेरूलकर अमरजा (१९८४), 'अर्थशास्त्रीय मतप्रणालीचा इतिहास', महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, औरंगाबाद.
9) कुमार सतीश, (१९८५), 'गोपाळ कृष्ण गोखले', महाराष्ट्र सूचना केंद्र, दिल्ली, पृ. १८.
10) तळवलकर गोविंद, (२००३), 'नेक नामदार गोखले', प्रेस्टीज प्रकाशन, पुणे.


◆

---

व्यापाराद्वारे कधीही देश नष्ट झालेला नाही.

**- बेंजामिन फ्रँकलिन**

---

# महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पपूर्तीतील प्रदीर्घ विलंब व प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनातील त्रुटी आणि समस्याः स्थल वास्तव परिप्रेक्षातून पुनर्वसन नियोजनार्थ संक्षिप्त टिपण

ज्ञानदेव तळुले[†], विजय ककडे[††], महादेव देशमुख[†††]

**प्राक्कथन**

हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम सिंचनप्रकल्प हा आजरा तालुक्यातील हिरण्यकेशी नदी खोऱ्यातील सर्फनाल्यावर मौजे पारपोली या गावानजीक बांधणे प्रस्तावित असून ऑक्टोबर १९९८ पासून अद्यापपर्यंत प्रलंबित आहे. प्रकल्पाच्या दीर्घकाळ प्रलंबनामुळे एकूण प्रकल्प व्ययात प्रचंड वृद्धी झाल्याने अंदाजित प्रकल्प व्ययाची रक्कम रुपये ७०० कोटींपेक्षाही अधिक झाली आहे. प्रस्तुत प्रकल्पाचे एकूण बुडीत क्षेत्र २८५.५६ हेक्टर; तर सिंचन क्षमता २६४४ हेक्टर इतकी असून एकूण २० गावांचा प्रस्तावित लाभक्षेत्रात समावेश होणार आहे. प्रकल्प दीर्घकाळ प्रलंबित असण्याची प्रमुख कारणे प्रकल्पग्रस्तांचे उत्पादक व निवासी पुनर्वसन व पर्यायी शेतजमिनी आणि इतर बुडीत मालमत्तांच्या मोबदल्याशी निगडित आहेत. अशा कारणांमुळे प्रकल्पग्रस्तांचे जीवनमान व उदरनिर्वाहाचे प्रश्न निर्माण झाल्यामुळे मौजे पारपोली, पारपोली गावठाण व मौजे खेडगे येथील प्रकल्पबाधितांचा प्रस्तुत प्रकल्पास विरोध आहे.

तंत्रज्ञान व संरचनात्मक पाया भक्कम करून भारतीय कृषीची उत्पादन क्षमता वृद्धिंगत करणे आणि प्रथमतः अन्नधान्याकरिताचे परावलंबित्व संपुष्टात आणणे हे १९६० व १९७० च्या दशकातील पहिल्या भारतीय हरितक्रांतीचे प्रमुख उद्दिष्ट होते. भारतीय कृषिक्षेत्राचा व्यापारीय विस्तार करण्यासाठी उत्पादनानुरूप कृषी क्रांती अवलंबिल्या गेल्या. त्यानंतर धवलक्रांती व गुलाबी क्रांती (White and Pink Revolution) ही या उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने टाकलेली महत्त्वाची पावले होती. अशा सर्व प्रकारच्या कृषी विकास क्रियेत जलस्त्रोतांचे नियोजन करून विविध आकाराची धरणे बांधण्याची कामे १९५० व १९६० च्या दशकात सुरू झाली. अशा विविध क्षमतेच्या धरण बांधणीमागील प्रमुख उद्दिष्ट जरी कृषी पाणीपुरवठा असला तरीही या एकाच उद्दिष्टाशी अशा प्रकल्पांचे

† प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. ८१७, भ्रमणध्वनी :९४२३७५०५५५/९९२१८९०८४४, ई-मेल : dnyanshrinit@gmail.com

†† प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. २४५, भ्रमणध्वनी :९४२२१२३९४१, ई-मेल : vijay382000@gmail.com

††† प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. ११००, भ्रमणध्वनी :९८६९२७६२६५, ई-मेल : deshmukhms@gmail.com

नियोजन सीमित नव्हते. यातूनच 'बहुउद्देशीय जलप्रकल्प' या संकल्पनेचा उदय झाला. देशपातळीवर याची अनेक उदाहरणे देता येतील.  अशा प्रकारची विविध क्षमतेची अनेक धरणे स्वातंत्र्यानंतर भारतात बांधून पूर्ण झाली व अद्यापही अनेक योजना अपूर्ण आहेत. तर अनेक जलयोजना हाती घेणे बाकी आहे.

ब्रिटिशकालीन भारतातही अशा अनेक जलयोजना हाती घेऊन पूर्ण करण्यात आल्या. अशा योजना ब्रिटिशकालीन संस्थानिकांनीही पूर्ण केल्याची उदाहरणे आहेत. या योजनापूर्तीकरिता मोठ्या प्रमाणात भूमिअधिग्रहण व विस्थापितांच्या निवासांचे व उदरनिर्वाहाचे प्रश्न उभे ठाकतात. याकडे मात्र सर्वांगिण दुर्लक्ष झाले. असे दुर्लक्ष फक्त ब्रिटिश काळातच झाले नाही तर स्वतंत्र भारतीय पुनर्वसन व नियोजन त्याला अपवाद नाही असाच इतिहास आहे. बहुउद्देशीय जलप्रकल्प फक्त सरकारी अथवा सार्वजनिक मालकीचेच होते असे नव्हे. तर अनेक खाजगी उद्योगपतींच्या मालकीचेही होते व अद्यापही आहेत. अशा खाजगी जलप्रकल्पांकरिताही अनेक ठिकाणी भूमिअधिग्रहण करण्यात आले. परंतु विस्थापितांच्या पुनर्वसनाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले. अशा भूमिअधिग्रहणास जनतेचा विरोध होऊ लागला. १९२०-२१ साली पुण्याजवळ मुठा नदीवर जेव्हा टाटांचा मुळशी हा मोठा जलप्रकल्प बांधण्याचे ठरले व त्याकरिता ब्रिटिश सरकारने भूमिअधिग्रहणाची प्रक्रिया सुरू केली तेव्हा शेतकऱ्यांचा प्रखर विरोध झाला. सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन उभे राहिले होते. असे खाजगी व सार्वजनिक प्रकल्प की जे सरकारला जनहिताचे वाटतील त्याकरिता १८९४ साली भूमिअधिग्रहण कायदा पारित केला होताच.

प्रस्तुत अधिग्रहण कायद्यात जमिनीचा मोबदला, पुनर्वसन व पुनर्निवासाची कोणतीही जबाबदारी सरकारने स्वत:वर ठेवली नव्हती. इतकेच नव्हे; तर १९११ साली देशाच्या राजधानीसाठी रायसीना गावची जमीन अधिग्रहित केली गेली. ज्या ठिकाणी आज लोकसभा, राज्यसभा व राष्ट्रपती भवन यांसारख्या सर्वोच्च लोकशाही संस्था उभ्या आहेत. परंतु शेतकऱ्यांचा जमीन मोबदला अद्यापही बाकी आहे, असे कागदपत्रांवरून लक्षात येते. २०१४ पर्यंतची अशी सर्व भूमिअधिग्रहणे १८९४ च्या कायद्यातंर्गत झाली असल्याने पुनर्वसनाची समस्या अत्यंत बिकट व दुर्लक्षित राहिली. परंतु २०१३ च्या 'भूमिअधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास' कायद्याने या परिस्थितीत आमूलाग्र बदल होईल, अशी अपेक्षा केली जाते. ज्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य जलसिंचन प्रकल्प संरचनेबाबत देशात अग्रेसर आहे त्याच प्रमाणात जलसिंचन प्रकल्पपूर्ती दिरंगाईतही राज्य संपूर्ण देशात वरच्या क्रमांकावर असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रकल्पपूर्तीचा कालावधी वाढून त्याचे लाभ मिळण्यास विलंब तर होतोच; परंतु प्रकल्पाचा व्यय अनेक पटींनी वाढतो. महाराष्ट्रात जवळजवळ ३०२ प्रकल्पांची कामे गेली १५ वर्षे सुरू अथवा अर्धवट अवस्थेत अपूर्ण आहेत. या सर्व प्रकल्पांच्या प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनात अक्षम्य दिरंगाई झाल्यामुळे प्रकल्प व्ययात ४२८ टक्के इतकी वृद्धी झाल्याचे दिसून येते (CAG, 2012). अशा प्रकारच्या व्ययवृद्धीमुळे इतर विकास कामांवरील खर्च कमी करून तो निधी अशा अपूर्ण प्रकल्पांवर खर्च करावा लागतो. पर्यायाने तात्कालिक गरजेचे प्रकल्प मागे पडून विकास तूट निर्माण होते.

**प्रास्ताविक**

प्रलंबित प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र प्रस्तुत अभ्यासाचा प्राथमिक माहिती स्रोत व प्रकल्पाचे लाभक्षेत्र तसेच चित्रीप्रकल्पाचे लाभक्षेत्र प्रस्तुत अभ्यासाचे नियंत्रण

क्षेत्र आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिमेकडील आजरा तालुक्यात हा भाग येत असून प्रकल्पाचे बुडीत व लाभक्षेत्र या दोन्हीही क्षेत्रातील वार्षिक सरासरी पर्जन्यमान १३०० मि.मी. इतके प्रचंड आहे. त्यामुळे दोन्ही क्षेत्रातील हंगामी व वार्षिक पीक पद्धतीत फारशी किंबहुना जराही तफावत दिसून येत नाही. कारण या सर्व भागात वार्षिक प्रवाही नदी पात्रे आहेत. लाभक्षेत्र (नियंत्रण क्षेत्र) व बाधित क्षेत्राच्या पीक पद्धतीत तफावत नसली तरी उसासारख्या व्यापारी पिकाच्या उत्पादकतेत मात्र तफावत असल्याचे दिसून येते. लाभक्षेत्र (नियंत्रण क्षेत्र) व प्रकल्प प्रभावित क्षेत्राची पीक पद्धती व हंगामी पीक उत्पादन क्षमतेत तफावत नसल्यामुळे महत्त्वाचा निष्कर्ष असा मिळतो तो म्हणजे जेथे-जेथे साठवणक्षम पाणी व धरण बांधण्यायोग्य जागा असेल अशा सर्वच ठिकाणी धरणे बांधलीच पाहिजेत, असा धोरणकर्ते अथवा संबंधित विभागाचा किंवा स्थायी सिंचन लाभाच्या अपेक्षेने जनतेचा आग्रह असण्याची आवश्यकता नसावी. अशा अधिक पर्जन्यमानाच्या भूभागाकडे जलनियोजनाच्या दृष्टिने वेगळा विचार होण्याची आवश्यकता आहे, असे नमूद करणे आवश्यक आहे. किंबहुना अशा भूभागावर कोल्हापूर बंधाऱ्यांप्रमाणे जलनियोजन तंत्राचा वापर केला तर पाटबंधारे प्रकल्पांच्या तुलनेत निम्नतम भांडवलाच्या साहाय्याने जलसिंचन होऊन पुनर्वसनाचा प्रश्न टाळला जाऊ शकतो. हिरण्यकेशी सर्फनाला प्रकल्पाच्या बाबतीत प्रस्तुत पर्याय अधिक प्रभावी ठरला असता. परंतु आता तो भूतकाळ आहे. अशा प्रकारच्या पर्यायी जलनियोजनामुळे सार्वजनिक खर्चात बचत होऊन वित्तीय संसाधने इतरत्र उपयोगी आणता येऊ शकतात. अशा प्रकारच्या पर्यायी जलनियोजनामुळे सार्वजनिक खर्चाची कार्यक्षमता साध्य होऊन भूमिअधिग्रहण व पुनर्वसनाच्या समस्या उपलब्ध होणार नाहीत.

अशा प्रकारच्या पर्यायी जलनियोजनामुळे राष्ट्रीय जल लवादाने देऊ केलेले राज्याच्या हिश्श्याचे पाणी शिल्लक राहून प्रवाह दिशेच्या राज्यात जाऊ शकते. पर्यायाने अशा पाण्याचा मोबदला लाभधारक राज्याने वरच्या राज्यास देऊ करणे अधिक सोयीस्कर पर्याय ठरू शकतो. प्रकल्पपूर्व बिगर सिंचनस्थिती अंतर्गतचे फायदे व प्रकल्पोपरांत सिंचन सुविधानंतरचे फायदे यांचा तुलनात्मक विचार करून जलसिंचन विभागाने दाखविलेले प्रकल्पाचे व्यय : लाभ गुणोत्तर जास्त आहे. प्रकल्पबाधित व नियंत्रण समूह प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित शेतकरी कुटुंबांच्या पीकरचना व पीकनिहाय उत्पादक क्षमतांचा विचार केल्यास प्रस्तुत गुणोत्तर निश्चितच अधिक आहे. नियंत्रण क्षेत्रातील ऊस पिकाची एकरी उत्पादन क्षमता (म्हणजेच प्रस्तावित लाभक्षेत्र असे गृहित धरल्यास) प्रकल्पबाधित क्षेत्राच्या एकरी उत्पादन क्षमतेपेक्षा ३०७.७२ टक्के अधिक आहे. परंतु इतर हंगामी पिकांच्या उत्पादन क्षमतेत फारसा फरक नाही असेच दिसून येते. याचाच अर्थ असा निघतो की, फक्त ऊस पिकाखालील क्षेत्र वाढविणे व उत्पादन घेणे अशा मर्यादित उद्दिष्टांकरिता धरणे बांधून अधिग्रहण व पुनर्वसनाच्या आणि पर्यावरणाच्या समस्या निर्माण करण्यापेक्षा पर्यायी जलनियोजन अधिक प्रभावी निष्पन्न होऊ शकते.

हिरण्यकेशी सर्फनाला पाटबंधारे प्रकल्पामुळे होणारे वनसंपदेचे नुकसान मोठ्या प्रमाणावर असल्याचे प्रस्तुत अभ्यासावरून निष्पन्न होते. परंतु प्रकल्प लाभक्षेत्रात अशा प्रकारची वनसंपदा लागवड होईलच याची खात्री देता येत नाही. कारण प्रकल्पबाधित प्रतिकुटुंब वनसंपदेची सरासरी ८२८.१३ वृक्ष इतकी तर नियंत्रण समूह प्रतिकुटुंब सरासरी ६०.५५ वृक्ष

इतकी असल्याचे दिसून आले. याचाच अर्थ प्रकल्पबाधितांना त्यांच्या वनसंपदेची योग्य मोजदाद होऊन पुनर्वसन मोबदला मिळणे आवश्यक आहे. अर्थात कितीही मोबदला दिला गेला तरी प्रकल्पामुळे वनसंपदेचे होणारे नुकसान कदापि भरून येणार नाही, अशीच परिस्थिती असल्याचे दिसून येते. प्रकल्पबाधित व नियंत्रण समूह (प्रस्तावित लाभधारक असे गृहित धरून) यांच्या उद्दिष्टनिहाय कर्जाच्या आकडेवारीची तुलना करता असा निष्कर्ष निघतो की, प्रकल्प लाभधारक (की ज्यामध्ये प्रकल्पबाधितांचाही भविष्यात समावेश होणार आहे) बिगर लाभधारकांपेक्षा आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम व विविध कृषी भांडवली वस्तूंच्या खरेदीबाबत स्वयंनिर्भर असू शकणार आहेत. प्रकल्पबाधित बिगर सिंचन लाभधारक शेतकऱ्यांची सरासरी कर्ज थकबाकी (१.९३ लक्ष) प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूह शेतकऱ्यांच्या सरासरी कर्ज थकबाकीपेक्षा (८०.९४ हजार) अधिक असल्याचे निदर्शनास येते. यावरून असेच अनुमान निघते की, प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ प्राप्त होऊन (ज्यामध्ये प्रकल्पबाधितांचाही समावेश असणार आहे) उत्पन्नमान बदलू शकते. प्रकल्पबाधितांचे उत्पादक पुनर्वसन कामी म्हणजेच जमिनीच्या मोबदल्यात प्रस्तावित प्रकल्प लाभक्षेत्रात प्रतिकुटुंब कमाल ४ एकर पिकावू जमीन अथवा अधिग्रहित जमिनीच्या बाजारमूल्याच्या चारपट किंमत देणे प्रस्तावित आहे. तसेच पारपोली व पारपोली गावठाण येथील मानववस्ती बुडीत क्षेत्रात येत असल्यामुळे निवास पुनर्वसनाकरिता मौजे शेळप व देवर्डे, ता. आजरा येथे अनुक्रमे १२८ व १०५ अशा एकूण २३३ निवासी भूखंडांची व्यवस्था करण्यात आली आहे. निवासी भूखंड नियोजना व्यतिरिक्त उत्पादक व आर्थिक पुनर्वसनाकरिता कमाल जमीन धारणा कायद्यांतर्गत प्रकल्प लाभक्षेत्रातील जमिनींचे अधिग्रहण करून प्रकल्पबाधितांना अशा जमिनींचे वाटप करण्याची तयारी कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने केली असल्याचे कागदपत्रांवरून निदर्शनास येते. प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाकरिता अधिग्रहित केलेल्या जमिनी कागदोपत्री लाभक्षेत्रात येतात. परंतु प्रत्यक्षात यापैकी अनेक जमिनी उंचवट्याच्या अथवा डोंगर उताराच्या दगडांच्या (खाणी खोदकाम संपलेल्या) परिसरात आहेत. अशा डोंगराळ जमिनी तांत्रिकदृष्ट्या प्रस्तावित प्रकल्प लाभक्षेत्रात येतात. परंतु अशा जमिनींचा फायदा प्रकल्पबाधितांना होत नाही. किंबहुना या जमिनींपर्यंत पाटपाणी पोहचणार नसल्याने प्रकल्पबाधितांना स्वखर्चाने पाईपलाईन व पंपसेटचा खर्च करावा लागणार आहे. त्यामुळे सिंचन प्रकल्प विभागाने हा खर्च करून प्रकल्पबाधितांच्या नवीन पुनर्वसित जमिनींपर्यंत पाणी पोहचवणे आवश्यक आहे. प्रकल्पबाधितांच्या लेखी म्हणण्याप्रमाणे पुनर्वसनार्थ देऊ केलेल्या अनेक जमिनी डोंगर उताराच्या व अपिकावू आहेत. अशा जमिनींची प्रकल्प विभागामार्फत अथवा जिल्हा प्रशासनामार्फत मृदा तपासणी करून उत्पादकता व लागवड क्षमता या भागातील 'कृषी वातावरणानुरूप' (Agro-Climatic) मान्य पीकरचनेप्रमाणे आहे किंवा नाही यासंबंधीचा निर्णय घेणे आवश्यक आहे. कारण या जमिनीसंबंधित पीकरचनेकरिता योग्य आहेत अथवा नाही हे समजल्याशिवाय न्याय्य पुनर्वसन झाले असे म्हणता येणार नाही. पुनर्वसनाकरिता देऊ केलेल्या जमिनी तपासणीअंती अल्प उत्पादनक्षम अथवा लागवड योग्य नसतील तर पर्यायी जमिनींची तरतूद करणे आवश्यक आहे. तसेच लागवडक्षम नसलेल्या जमिनी लागवड योग्य करण्याचा खर्च शासनाने देणे आवश्यक आहे (उदा. सपाटीकरण, मृदाभरण... इत्यादी). निवास

पुनर्वसनाकरिता मौजे शेळप व देवर्डे येथे अनुक्रमे १२८ व १०५ अशा एकूण २३३ निवासी भूखंडांची व्यवस्था केली आहे. परंतु ऐतिहासिक दृष्ट्या गायरान जरी सार्वजनिक अथवा कायद्याने सरकारी मालकीची जमीन असली तरीही त्यावर संबंधित गावाचाच अधिकार मान्य केला जातो. त्यामुळे निवासी पुनर्वसन करत असताना प्रकल्पबाधितांचा गायरानावरील हक्क अबाधित असणे आवश्यक आहे. म्हणून मौजे शेळप व देवर्डे येथे निवासी पुनर्वसन करताना सरकारने गायरान जमिनींची तरतूद करावी की ज्यामुळे आदर्श निवासी पुनर्वसनाची आवश्यकता पूर्ण होऊ शकेल. तसेच गायरान जमिनीसह निवासी पुनर्वसन करताना मूळ प्रकल्प बुडीत गावच्या गायरान जमिनींपेक्षा पुनर्वसन ठिकाणची गायरान जमीन कमी असेल तर तेवढ्या फरकाचा मोबदला गावास मिळणे आवश्यक आहे.

मौजे पारपोली, पारपोली गावठाण व मौजे खेडगे येथील प्रकल्पबाधित जमिनींवर भरपूर प्रमाणात शेतकऱ्यांच्या मालकीची खाजगी वनसंपत्ती आहे. या वनसंपत्तीच्या मोजदातात त्रुटी असल्याचे प्रकल्प-बाधितांचे म्हणणे आहे. अभ्यास समूहासाठी असेच निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा खाजगी वनसंपत्तीची योग्य मोजदात होऊन प्रकल्पबाधितांना त्याबद्दलचा मोबदला मिळणे आवश्यक आहे. प्रकल्पबाधितांच्या खाजगी वनसंपदेचे मूल्य निश्चित करताना बाजारमूल्याचा विचार करण्यात आला नाही असे अभ्यासांती निष्पन्न होते. वनसंपदेचे मूल्यांकन बाजारमूल्यापेक्षा कमी असल्याने प्रकल्पबाधितांचे नुकसान होत असल्याचा निष्कर्ष निघतो. त्यामुळे अशा वनसंपदेचे वर्तमान बाजारमूल्य विचारात घेऊन प्रकल्पबाधितांना मोबदला देऊ करणे आवश्यक आहे. किंबहुना बाजारमूल्यापेक्षा काहीपट अधिक मोबदला मिळणे आवश्यक आहे. प्रकल्पबाधितांना त्यांच्या बुडीत क्षेत्रात जाणाऱ्या जमिनीच्या मोबदल्यात प्रकल्प लाभक्षेत्रात अधिग्रहण करून प्रस्तावित लाभक्षेत्रातील ओलिताखालील जमीन देण्याचे धोरण आहे. परंतु अशा भूमिलाभाची मर्यादा प्रतिकुटुंब ४ एकर एवढी मर्यादित आहे. त्यामुळे ४ एकरपेक्षा जास्त जमीन जर प्रकल्पबाधित होत असेल तरीही अशा कुटुंबास लाभक्षेत्रात फक्त ४ एकर एवढीच पर्यायी जमीन प्राप्त होत असल्याने पुनर्वसन होत असताना प्रकल्पबाधितांचे नुकसानच होत आहे असे दिसून येते. अशा कुटुंबांना अधिक विशेष सानुग्रह अनुदान देणे न्यायाचे असेल.

महाराष्ट्रातील लघु, मध्यम आणि मोठ्या धरणांची संख्या, पाटबंधारे खात्यातील गुंतवणूक आणि पाटबंधारे खात्यातील कार्यस्त मानवी श्रमाचा विचार केला तर राज्याचा जलसिंचन विभाग देशात सर्वात मोठा आहे. देशातील एकूण मोठ्या प्रकल्पांपैकी ३५ टक्के सिंचन प्रकल्प महाराष्ट्रात आहेत. परंतु राज्यातील स्थूल पीक क्षेत्राच्या (GCA) फक्त १८ टक्के एवढेच क्षेत्र सिंचनाखाली असणे हे एक विदारक वास्तव आहे. म्हणजेच देशातील सर्वाधिक गुंतवणूक आणि धरणांची महत्तम संख्या असलेल्या राज्याचे सिंचन क्षेत्र इतर राज्यांच्या व राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेत देशात कमी असल्याचे दिसून येते (नारायण मूर्ती,२०१३). राष्ट्रीय जलआयोगाच्या अहवालानुसार, राज्यातील मध्यम आणि मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांच्या जल उपयोग क्षमतेची राष्ट्रीय जल उपयोग क्षमतेशी तुलना केली तर अत्यंत असमाधानकारक किंवा किमान पातळीवर असल्याचे दिसून येते. याकरिता बेभरोशी पर्जन्यमानालाच फक्त दोष देता येणे शक्य नाही. तर वर्षांनुवर्षे कारक ठरलेल्या इतर कारणांचाही विचार करावा लागेल.

याचे महत्त्वाचे कारण राज्यातील अनावश्यक पीक पद्धती होय. राज्यात पाण्याचे दुर्भिक्ष असूनही ऊस लागवडी खालील क्षेत्रात सातत्याने वाढ होत आहे. १९७१-७२ ते २०११-१२ च्या दरम्यान महाराष्ट्रातील ऊस लागवडी खालील क्षेत्र ६ पटींनी वाढले (नारायण मूर्ती, २०१३). याच काळात देशपातळीवर मात्र ऊस पिकाखालील क्षेत्रात झालेली वाढ १.७८ पट एवढी सीमित असल्याचे दिसून आले. परिणामी ३.५ टक्के उसाखालील क्षेत्र राज्यातील ६० टक्के पाणी वापरते, अशी स्थिती निर्माण झाली आहे. अशी परिस्थिती असल्याने महाराष्ट्रातील जल उत्पादकता अत्यंत किमान पातळीवर राहिली. उत्तर प्रदेशची जल उत्पादकता महाराष्ट्रापेक्षा १०६ टक्के अधिक आहे (CAG, 2012). प्रतिकिलो साखर उत्पादनाकरिता उत्तर प्रदेशापेक्षा महाराष्ट्रात १००० लिटर अधिक पाण्याचा वापर केला जातो. याची प्रमुख कारणे राज्यातील सिंचन पद्धती आणि अनियंत्रित पाणी वापरात सापडतात.

महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाच्या (१९९९) अहवालानुसार १९३० पर्यंत राज्यातील गोदावरी, तापी व कृष्णाखोऱ्यात पाण्याचा तुटवडा अधिक प्रमाणात भासू शकतो. एकंदरीत काय तर महाराष्ट्राची कृषी व जल अर्थव्यवस्था एकंदरीतच अकार्यक्षम राहिल्याचे सिद्ध होते. अशा प्रकारची सरकारनिर्मित सिंचन व्यवस्थेची अकार्यक्षमता एका बाजूला असताना विदर्भात एकूण १.२८ लक्ष हेक्टर सिंचन क्षमताधारित जवळपास ७००० मालगुजारी तळी दुरुस्तीच्या प्रतिक्षेत आहेत. त्याकडे मात्र सर्वदूर दुर्लक्ष झाल्याने विदर्भाच्या सिंचन क्षमतेवर गंभीर मर्यादा आल्या आहेत. याचे प्रमुख कारण म्हणजे निधीचा तुटवडा. विदर्भाची एकूण वित्तीय तूट ४७.६० टक्क्यांपर्यंत पोहचली आहे. (केळकर अहवाल, २०१३). पर्यायाने विदर्भाच्या एकूण जलसिंचन तुटीचे प्रमाणसुद्धा ३५.२६ टक्क्यांपर्यंत पोहोचले (केळकर अहवाल, २०१३). हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम सिंचनप्रकल्प ऑक्टोबर १९९८ पासून प्रलंबित असून प्रलंबनाची प्रमुख कारणे प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, पुनर्स्थापन व प्रकल्पबाधित शेतजमिनी आणि इतर मालमत्तांच्या मोबदल्यांशी निगडित आहेत. एकूणच प्रकल्पबाधितांचे भविष्य व जीवनमान आणि उदरनिर्वाहाचा प्रश्न उपस्थित झाल्याने मौजे पारपोली, पारपोली गावठाण व मौजे खेडगे येथील प्रकल्पबाधितांनी सातत्याने आपला विरोध दर्शविल्यामुळे प्रकल्पाचे काम गेली वीस वर्षे प्रलंबित आहे. या विरोधामुळे प्रकल्पाची इतर कामे जरी पूर्ण झाली असली तरी घळभरणीचे काम पूर्ण करून प्रकल्पात पाणी अडविणे बाकी असल्याने व सततच्या विलंबामुळे प्रकल्पाचा व्ययसुद्धा अनेक पटींनी वाढून ७०० कोटी रुपयांपेक्षा जास्त झाला आहे. मौजे पारपोली व पारपोली गावठाण येथील लोकवस्ती व जमिनी आणि मौजे खेडगे येथील शेतजमिनी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात जाऊन या सर्व बहुतांशी शेतकरी असलेल्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर असल्यामुळे या सर्व कुटुंबांचा प्रकल्पास विरोध असल्याचे कारण म्हणजे त्यांच्या मालमत्तेचा योग्य मोबदला व आदर्श पुनर्वसनाची मागणी असे आहे.

सर्फनाला मध्यम प्रकल्पता. आजरा जिल्हा कोल्हापूर हा हिरण्यकेशी नदीखोऱ्यातील पारपोली या गावानजीक बांधण्यात येत आहे. सदर प्रकल्पाचे बांधकाम ७५ टक्के पूर्ण झाले असून यामध्ये जलरोधी चराचे सर्व काम पूर्ण झाले आहे. तसेच भरावाचे काम पूर्ण झाले असून घळभरणीचे काम प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी २६१.२३ हेक्टर खाजगी व १६.२२ हेक्टर सरकारी (देवस्थान जमीन) व रस्त्यासाठी खाजगी जमीन १.६१ हेक्टर व ६.५०

हेक्टर वनजमीन असे एकूण २८५.५६ हेक्टर क्षेत्र लागणार आहे. सदर प्रकल्पात एकूण २२९ खातेदार प्रकल्पग्रस्त आहेत. त्यापैकी ११ प्रकल्पग्रस्तांनी स्वेच्छा पुनर्वसन घेतलेले आहे. एकूण २१८ प्रकल्पग्रस्तांना २०८ हेक्टर पर्यायी क्षेत्र देय आहे. सद्य:स्थितीत एकूण १५४.७०९ हेक्टर क्षेत्र जिल्हाधिकारी तथा उपसंचालक (पुनर्वसन) यांच्या नावे असून खातेदारांना ९७.८०४ हेक्टर क्षेत्र वाटप झाले आहे. शिल्लक क्षेत्राच्या वाटपाची कार्यवाही महसूल विभागामार्फत प्रगतीत आहे. उर्वरित खातेदारांना ११६.६६६ हेक्टर जमिनीचे वाटप होणे बाकी आहे. प्रकल्पामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील मौजे पारपोली, ता. आजरा व गाव गावठाण वाडी ता. आजरा पूर्णपणे बाधित होत असून यामध्ये बाधित खातेदार २२९ इतके आहेत. यासाठी १) देवर्डे, २) शेळप ही पुनर्वसित गावठाणे विकसित करण्यात येत आहेत. यामध्ये देवर्डेमध्ये १०५, शेळपमध्ये १२८ असे एकूण २३३ भूखंड आहेत. यामधील १४८ भूखंडांचे वाटप झाले आहे व ८५ भूखंड शिल्लक आहेत.

**माहिती संकलन, अभ्यास पद्धती व नमुना निवड**

प्रस्तुत लेखातील निष्कर्ष प्रामुख्याने क्षेत्र पाहणीद्वारा संकलित प्राथमिक माहितीवर निर्भर आहेत. संकलित करावयाची प्राथमिक माहिती अचूक, विश्वासार्ह, पृथक्करणक्षम व पर्याप्त असणे अत्यंत आवश्यक होते. तसेच प्राथमिक माहितीद्वारा प्रकल्पबाधित व प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूहाचे एकूणच तुलनात्मक कृषी संबंधाचे(Agrarian Relations) आकलन होणेही आवश्यक होते. त्यामुळे नमुना निवड करताना समान सामाजिक, आर्थिक, भौगोलिक व कृषिवातावरणीय परिस्थिती असलेले व सिंचन प्रकल्पाचे लाभधारक असलेली शेतकरी कुटुंबे नियंत्रण समूहाच्या स्वरूपात आवश्यक असतात/ होती. त्यामुळे आजरा तालुक्यातील चित्री पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील हाजगोळी (खु) हे गाव निवडून तेथील २१ लाभधारक कुटुंबांची निवड करून सर्वेक्षण करण्यात आले. परंतु प्रकल्पबाधित पारपोली, पारपोली गावठाण व खेडगे स्थितसर्व कुटुंबांचे जनगणना पद्धतीने सर्वेक्षण करण्याची योजना आखली. तथापि, प्रत्यक्ष क्षेत्र पाहणी करताना असे निदर्शनास आले की, एकूण प्रकल्पबाधितांपैकी काही कुटुंबे उदरनिर्वाह अथवा नोकरीच्या निमित्ताने इतरत्र व मुख्यत्वेकरून मुंबईला स्थलांतरित झाली होती. पर्यायाने सापनि (सामाजिक परिणाम निर्धारण) अभ्यास गटाने कुटुंबांचे 'उंबरा सर्वेक्षण' (Household Survey) करण्याचे निश्चित केले. म्हणजे जी कुटुंबे स्थलांतरित झाली नाहीत अथवा सर्वेक्षणा दरम्यान गावात उपलब्ध असतील, अशा सर्व शेतकरी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. असे करताना आम्हास उपरोल्लेखित रहिवासी गावांतील एकूण प्रकल्पबाधितांपैकी १८० कुटुंबांतील व्यक्ती अथवा कुटुंबप्रमुखांना प्रत्यक्ष भेटणे शक्य झाले. अशा प्रकारे प्रकल्पबाधितांपैकी जास्तीत जास्त कुटुंबाचे सर्वेक्षण पूर्ण होऊ शकल्याने आम्ही त्यास जनगणना सर्वेक्षण असे संबोधले आहे. अशा प्रकारे १८० प्रकल्पबाधित व २१ प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूहकुटुंबे मिळून प्रस्तुत अभ्यासाकरिता एकूण २०१ कुटुंबांची नमुना निवड करून प्रत्यक्षपणे घरोघरी जाऊन सर्वेक्षणाचे काम पूर्ण केले आहे. प्रस्तुत सर्वेक्षणातून प्राप्त प्राथमिक माहितीचे पृथक्करण व विश्लेषण करून अहवालात आवश्यक त्या ठिकाणी सविस्तरपणे निष्कर्ष मांडले आहेत. प्राथमिक माहिती संकलन सर्वेक्षणात अधिकाधिक प्रकल्पबाधित कुटुंबांचा समावेश करू शकल्याने प्रस्तुत अभ्यास सत्यतेच्या महत्तम निकषांवर उतरणारा आहे, असा युक्तिवाद केला जाऊ शकतो.

**जलसिंचन धोरण व भूसंपादन विषयक विवेचन**

**जलसंपदा व राज्य सरकार**

संघराज्य प्रशासकीय तरतुदी अंतर्गत राज्य यादी २(१७) अन्वये जलसिंचन हा विषय राज्यसरकारच्या अखत्यारित येतो. त्यामुळे राज्यातील जलस्त्रोतांचे विकास, नियोजन, जपणूक व संवर्धनाची जबाबदारी संबंधित राज्यसरकारची असते. वास्तविक पाहता जलस्त्रोत हा नैसर्गिकदृष्ट्या स्वयंनुतनिकृत सार्वजनिक वस्तू असून ती राज्यातील लोकांच्या उपयोगिते योग्य बनविण्याची राजकोषीय जबाबदारी संबंधित राज्यसरकारची मानली जाते. या कामी राज्यसरकारने जलस्त्रोत व्यवस्थापनाकरिता आवश्यक त्या सर्व बाबींवर पर्याप्त खर्चाचे वेळेवर नियोजन करणे अपेक्षित आहे.

हे सर्व करत असताना राज्य सरकारने पुरेसा निधी वेळेवर उपलब्ध करून त्याचा योग्य विनियोग करणे व प्रस्तावित वेळेत प्रकल्पाची कामे पूर्ण करून सिंचन सुविधांचे जाळे निर्माण करून राज्यातील कृषिक्षेत्राच्या विकासाला चालना देणे अपेक्षित आहे. अलीकडच्या काळात वेगाने होणारे शहरीकरण व ग्रामीण आणि नागरी औद्योगिकरणामुळे पाण्याची गरज अनेक पटींनी वाढली आहे. पर्यायाने पाणी वापराचा अग्रक्रम बदलला गेला. उदाहरणार्थ, दोन दशकांपूर्वी पुणे शहराकरिता खडकवासला धरणातून प्रतिवर्षी चार दशलक्ष घनमीटर इतके पाणी वापरण्याची आवश्यकता भासत असे. त्यात आता किमान चारपट वाढ झाली आहे. अशा प्रकारच्या जलमागणी वृद्धीमुळे एकूणच राज्याच्या निर्मित जलस्त्रोतांवर ताण निर्माण झाला आहे.

पर्यायाने उर्वरित जलक्षमतेचा पूर्णपणे वापर करण्याकरिता राज्य सरकारने पर्याप्त अर्थिक तरतूद करून राज्यातून वाहून जाणारे पाणी अडविणे आवश्यक आहे. तसेच राष्ट्रीय जल लवादाच्या निवाड्याप्रमाणे आंतरराज्य नदीखोऱ्यातील आपल्या वाट्याचे पाणी अपेक्षित वेळेत अडविणे आवश्यक असल्याने प्रत्येक नदीखोऱ्यातील धरणे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे आव्हानही राज्यासमोर आहेच.

**प्रकल्पपूर्तीस विलंब व व्ययवृद्धीची समस्या**

ज्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य जलसिंचन प्रकल्प संरचनेबाबत देशात अग्रेसर आहे, त्याच प्रमाणात जलसिंचन प्रकल्पपूर्ती दिरंगाईतही राज्य संपूर्ण देशात वरच्या क्रमांकावर असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रकल्पपूर्तीचा कालावधी वाढून त्याचे लाभ मिळण्यास विलंब तर होतोच; परंतु प्रकल्पाचा व्यय अनेक पटींनी वाढतो. महाराष्ट्रात जवळजवळ ३०२ प्रकल्पांची कामे गेली १५ वर्षे सुरू अथवा अर्धवट अवस्थेत अपूर्ण आहेत. या सर्व प्रकल्पांच्या प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनात अक्षम्य दिरंगाई झाल्यामुळे प्रकल्प व्ययात ४२८ टक्के इतकी वृद्धी झाली (CAG, 2012).

अशा प्रकारच्या व्ययवृद्धीमुळे इतर विकास कामांवरील खर्च कमी करून तो निधी अशा अपूर्ण प्रकल्पांवर खर्च करावा लागतो. पर्यायाने तात्कालिक गरजेचे प्रकल्प मागे पडून विकास तूट निर्माण होते. प्रकल्पपूर्तीच्या विलंबास अनेक कारणे दिली जातात. एक तर सिंचन प्रकल्पांना मोठा निधी आवश्यक असतो. परंतु सरकारकडून सुरुवातीस उपलब्धतेनुसार शक्य तितक्या निधीची तरतूद केली जाते. परिणामी प्रकल्पाचे काम पूर्ण क्षमतेने सुरू होऊ शकत नाही. त्यामुळे वेळेचा अपव्यय होऊन मूळ व्ययात वृद्धी होणे अपरिहार्य बनते. तसेच जलसिंचन प्रकल्पांना लागणारी जमीन व त्या अनुषंगाने करावे लागणारे भूमिअधिग्रहण हा तर प्रकल्पपूर्तीच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा मानला जातो. कारण पूर्वीच्या प्रकल्पबाधितांचा अनुभव चांगला नसल्याने संभाव्य प्रकल्पबाधित शेतकरी सहजासहजी जमीन देण्यास तयार होत नाहीत. जमीन अधिग्रहण, मूल्यांकन व

पुनर्वसन कामी सरकारचा महसूल विभाग जबाबदार असतो. परंतु जलसिंचन आणि महसूल विभागातील अधिकाऱ्यांचे अनेक बाबींवर एकमत होत नसल्यामुळे याकामी अधिकच विलंब झाल्याची उदाहरणे सर्वश्रुत आहेत. लोकशाही व्यवस्थेत प्रकल्पातील राजकीय हस्तक्षेप शक्यतो टाळला जात नाही. नव्हे तशी अपेक्षाही करणे योग्य नाही. अनेकदा राजकीय अनुनयापोटी मूळ प्रकल्पाची क्षमता नंतरच्या टप्प्यावर वाढवून अधिक पीक क्षेत्र लाभक्षेत्रात समाविष्ट करण्याकरिता राजकीय हस्तक्षेप होतो. परिणामी प्रकल्प खर्च आणि पुनर्वसनाची समस्या गंभीर स्वरूप धारण करून प्रकल्पपूर्तीस अक्षम्य विलंब लागतो, अशी अनेक उदाहरणे देता येतील. तत्सम समस्येपासून सरदार सरोवर प्रकल्पही अलिप्त राहू शकला नाही.

त्यामुळे प्रकल्पपूर्तीत अनेक दशकांचा विलंब झाला. प्रकल्प आकारमान, लाभक्षेत्रात तद्नंतर केलेला बदल व पाणी वाहून नेण्यासाठी पाट व चाऱ्यांची लांबी नंतरच्या टप्प्यात वाढविल्यामुळे प्रकल्प व्यय, भूमिअधिग्रहण व पुनर्वसनाच्या समस्या अधिकच गंभीर स्वरूप धारण करतात. परिणामी प्रकल्पबाधितांची आंदोलने उभी राहून प्रकल्पपूर्तीत काही वर्षेच नव्हे; तर दशकांचाही विलंब लागतो. अशा दीर्घकालीन विलंबामुळे प्रकल्पपूर्तीचा व्यय अनेक पटींनी वाढतो. काही बहुउद्देशीय मोठे प्रकल्प राज्य व केंद्र सरकारच्या सामायिक खर्चातून साकारत असतात. अशा प्रकल्पामधील केंद्राच्या हिश्श्याचा निधी येण्यास काही वेळा विलंब लागतो. अशा वेळी प्रकल्प वेळेत मार्गी लावण्यासाठी जर राज्याने स्वत:च्या वित्तीय तरतुदीतून हा खर्च पूर्ण करण्याचा प्रयत्न केला तर प्रस्तुत प्रकल्प मार्गी लागण्यास मदत होते. परंतु त्या बरोबरचे राज्यातील इतर प्रकल्प मागे पडतात. राजकीय हस्तक्षेपाचे हे एक नमुनेदार उदाहरण मानले जाते. अनेकदा तर प्रशासकीय बाब म्हणून एका प्रकल्पावरील अधिकारी तथा अभियंते बदलून इतरत्र प्रकल्पावर रवानगी केले जातात. अशा कर्मचाऱ्यांच्या जागी नवीन कर्मचारी तात्काळ दिला जात नाही. त्यामुळे प्रकल्पपूर्तीत अक्षम्य विलंब झाल्याचीही अनेक उदाहरणे आहेत. पर्यायाने व्ययवृद्धी तर होतेच; परंतु पुनर्वसनाची समस्याही उग्रस्वरूप धारण करते. प्रशासकीय सहकार्य आणि सरकारच्या विविध विभागांतील बेबनाव प्रकल्प दिरंगाईस अनेक ठिकाणी व अनेकवेळा कारणीभूत ठरल्याचाही अनुभव नवीन नाही. अशा अनेक कारणांमुळे महाराष्ट्रातील बहुउद्देशीय सिंचनप्रकल्प प्रदीर्घ काळ रखडले असून अशा प्रकल्पांच्या मूळ व्ययात हजारो कोटींची वृद्धी झाली आहे. त्यामुळेच राज्यातील कार्यपूर्तीत दिरंगाई झालेल्या प्रकल्पांचा समस्यानिहाय आढावा घेऊन संबंधित प्रकल्प शक्य तितक्या वेगाने पूर्ण होणे सरकारच्या अंदाजपत्रकीय खर्च, पुनर्वसन व कृषी, औद्योगिक व नागरी विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रस्तुत सर्फनाला सिंचनप्रकल्प गेली वीस वर्षे प्रलंबित आहेच. त्यामुळे प्रकल्प खर्चात झालेली वृद्धी हे एक निर्विवाद सत्य आहे. परंतु वीस वर्षांपासून प्रस्तावित अधिग्रहण शेतजमिनीवर प्रकल्पबाधित शेतकरी काहीही गुंतवणूक अथवा सुधारणा करू न शकल्यामुळे संपूर्ण एका पिढीचे अक्षम्य आर्थिक नुकसान तर झाले आहेच; परंतु प्रस्तावित लाभ क्षेत्रापर्यंत पाणी न पोहचल्यामुळे लाभक्षेत्रात येऊ शकणाऱ्या शेतीचाही विकास होऊ शकला नाही. प्रस्तावित लाभक्षेत्रात रोजगाराच्या कृषी व्यतिरिक्त इतर संधी निमार्ण होऊ शकल्या. अशा सर्व समस्यांचा ऊहापोह करून प्रस्तुत सर्फनाला प्रकल्प पूर्णत्वास जाऊन विस्थापितांचे आदर्श पुनर्वसन कसे होऊ शकेल इत्यादी सर्व घटकांचा विचार करून

प्रस्तुत प्रकल्पाचा सामाजिक परिणाम मूल्यांकन अभ्यास शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागामार्फत पूर्ण केला असून सदरचा अहवाल यानंतरच्या विविध प्रकल्पांच्या दृष्टीने समस्यांचा लेखाजोखा करून उपाय सुचविण्याचा प्रयत्न करू इच्छित आहे.

**न्याय्य विस्थापन आणि पुनर्वसनाच्या दिशेने**

बहुउद्देशिय नदीप्रकल्पपूर्तीकामी धरणांचे बांधकाम, जलाशय नियोजन, पाट व चारीखुदाई इत्यादींकरिता मोठ्या प्रमाणात जमिनीची व पर्यायाने अधिग्रहणाची आवश्यकता भासते. त्यामुळे विस्थापन व पुनर्वसनाचे नियोजनही एक मोठी समस्या मानली जाते. भूमिअधिग्रहणात फक्त शेतकऱ्यांच्या खाजगी मालकीच्या जमिनींचाच समावेश नसतो; तर केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागांच्याही जमिनींचे कित्येकदा अधिग्रहण करावे लागते. त्याकरिता प्रत्येक विभागाची उद्दिष्टे व जबाबदाऱ्या भिन्न असल्यामुळे एक विभाग दुसऱ्या विभागास प्रकल्पपूर्ती कामी आवश्यक भूमि अधिग्रहणाकरिता सहकार्य करेलच असे नाही. वन विभागाचे उदाहरण या बाबतीत विशेष महत्त्वाचे ठरते. इतर सरकारी विभागाच्या प्रकल्पपूर्तीकरिता जर वनविभागाची जमीन अधिअग्रहित करावी लागणार असेल तर त्याबदल्यात इतर ठिकाणची वनजमिनीच वनविभागाला पर्याय म्हणून देऊ कराव्या लागतात. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिश व स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने जलसिंचन, औद्योगिकीकरण, शहरीकरण, संरक्षण विभाग, रेल्वे इत्यादिंकरिता अनेकदा भूमिअधिग्रहण केले. परंतु मूळ मालक असलेल्या शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न बहुतांश प्रकल्पांच्या बाबतीत अनुत्तरितच राहिला. अशा अनुभवामुळे आणि कृषि क्षेत्रासमोरील इतर समस्यांमुळे भारतात विविध शेतकरी चळवळी उभ्या राहून त्यांनी सरकारसमोर आपले म्हणणे मांडण्यास व प्रसंगी आंदोलनाची तयारी करण्यास प्रारंभ केला. यातूनच नंतरच्या काळात आदर्श पुनर्वसन व अधिग्रहण आणि अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्याची समस्या अधिक तीव्र स्वरूप धारण करू लागली. प्रकल्पबाधितांच्या रोजगार समस्येची जाणीव पूर्वी सरकारला नव्हती असेच काहीसे झाले. त्यामुळे नंतरच्या प्रकल्पबाधितांनी रोजगार समस्येकडे अंगुलीनिर्देश करून सरकारला विचार करण्यास भाग पाडले. अनेकदा तर जलसिंचन प्रकल्प आणि औद्योगिकीकरणाकरिता भूमिअधिग्रहण केलेल्या प्रकल्पबाधितांना मूलभूत रोजगाराच्या संधी अथवा पर्यायी जमिनी न मिळाल्याने त्यांना स्थलांतर करून शहरी झोपडपट्टी व दारिद्र्याचे जीवन जगावे लागले. पर्यायाने सरकारला न्याय्य विस्थापन व पुनर्वसन धोरणाचा मसुदा तयार करण्याची निकड भासली. साधारणपणे १९८० च्या दशकात भारत सरकारने सर्व प्रकल्पबाधितांच्या न्याय्य पुनर्वसनाकरिता विचार करणे सुरू केले. या विषयावर अनेकवेळा मंत्रिमंडळ व सार्वजनिक पातळीवर चर्चा झाल्या (Ramaswami Iyer, 2007). तसेच याकरिता मंत्रीगटाची स्थापना करून विचारविनिमय घडवून आणला (Ramaswami Iyer, 2007). तब्बल दोन दशके चर्चा व मसुदा आणि पुनर्मसुदा तयार करण्यात गेली. परंतु योग्य मार्ग निघू शकला नाही. पर्यायाने मसुदा तयार होण्यात अक्षम्य दिरंगाई झाली. शेवटी ऑक्टोबर२००६ मध्ये 'राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००६' चा मसुदा चर्चेकरिता समोर आला. त्यानंतर आलेल्या सूचनांची दखल घेऊन भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने शेवटी राष्ट्रीय पुनर्वसन कायद्याचा मसुदा तयार करण्याचे काम हाती घेतले. यातूनच नंतर 'नॅशनल रिहॅबिलिटेशन अँड रिसेटलमेंट पॉलिसी २००७' चा

अंतिम मसुदा तयार झाला (Walter Fernandez, 2104).

तद्नंतर पुढे ७ सप्टेंबर, २०११ रोजी नवीन भूमिअधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनर्निवास कायद्याचा मसुदा लोकसभेत मांडला गेला. एकूण २३५ सदस्यांपैकी २१६ सदस्यांनी मसुद्याच्या बाजूने तर १९ सदस्यांनी विरोधात मतदान केल्याने मसुदा मंजूर झाला. दिनांक २९ ऑगस्ट, २०१३ रोजी मसुदा लोकसभेत तर दिनांक ४ सप्टेंबर, २०१३ रोजी राज्यसभेत पारित झाल्याने दिनांक २७ सप्टेंबर, २०१३ रोजी राष्ट्रपतींनी त्यावर सही केली आणि दिनांक १ जानेवारी, २०१४ रोजी कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. प्रस्तुत कायदा पारित होऊन प्रत्यक्ष अंमलात येईपर्यंत देशात सार्वजनिक अथवा सरकारला सामाजिक व आर्थिक दृष्टीने लोककल्याणकारी वाटणाऱ्या खाजगी व सार्वजनिक प्रकल्पांकरिता ब्रिटिश पारित सन १८९४ च्या कायद्यांतर्गतच जमिनीचे अधिग्रहण करण्याची तरतूद अंमलात आणली जात असे. परंतु सन १८९४ च्या कायद्यांतर्गत प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाची कोणतीही जबाबदारी सरकारवर असत नव्हती. कारण सन १८९४ च्या ब्रिटिश कायद्यात भूमिअधिग्रहण, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व पुनर्स्थैर्याच्या बाबतीत जबाबदारीचे उत्तरदायित्व सरकारवर नव्हते. परंतु अशा उत्तरदायित्वाची जबाबदारी सन २०१३ च्या राष्ट्रीय पुनर्वसन धोरणामुळे सरकारवर व पर्यायाने प्रकल्प विभागावर आली. इतकेच नव्हे; तर या धोरणाअंतर्गत प्रकल्पबाधितांना पुनर्वसनाबरोबरच योग्य मोबदला देण्याचीही जबाबदारी संबंधित राज्य अथवा केंद्र सरकारच्या प्रकल्प विभागावर देण्यात आली. तसेच या कायद्यामुळे भूमिअधिग्रहण आणि मोबदल्याच्या बाबतीत पारदर्शकतेचा आग्रह धरण्यात आला हे विशेष.

प्रस्तुत कायद्यात विस्थापितांच्या पुनर्वसनाकरिता संबंधित प्रकल्प विभागाने मध्यस्थाची (Ambudsman) नेमणूक करणे बंधनकारक करण्यात आले. परंतु या कायद्याअंतर्गत प्रकल्पग्रस्तांना न्यायालयीन प्रक्रियेत जाण्याकरिता फारशी संधी उपलब्ध नसल्याने त्यांचे सरकारवरचे अवलंबित्व अधिक राहते. तथापि, प्रस्तुत कायद्याच्या अधिन राहून महाराष्ट्र शासनाने भूमिअधिग्रहण व पुनर्वसन कामी सकारात्मक भूमिका घेऊन प्रकल्प विस्थापितांना मोबदला व पुनर्वसन आणि पुनर्निवासाकरिता विशेष प्रयत्न करण्याचे आरंभिले आहे हे नक्कीच. प्रकल्पग्रस्तांना मोबदला देताना जमिनीच्या वर्तमान बाजारमूल्याच्या चारपट किंमत व पुनर्निवासाकरिता भूखंड तसेच शक्य असेल तेथे प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीच्या मोबदल्यात जमीन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो हे विशेष.

प्रस्तुत सर्फनाला मध्यम पाटबंधारे प्रकल्पात पारपोली व पारपोली गावठाण अशा दोन रहिवासी वस्ती बुडीत क्षेत्रात येतात. तर मौजे खेडगे गाव बुडीत क्षेत्रात येत नाही. परंतु गावातील शेतकऱ्यांची शेती मात्र प्रकल्प बुडीत क्षेत्रात येते. या सर्व ग्रामस्थांना त्यांच्या बुडीत जमिनींच्या मोबदल्यात प्रकल्प लाभक्षेत्रात जमिनी देण्याची तरतूद कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने केल्याचे कागदपत्र पडताळणी व प्रत्यक्ष स्थान भेटींवरून आमच्या लक्षात आले. तसेच प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या पुनर्निवासाकरिता मौजे शेळप व देवर्डे अशा दोन ठिकाणी वसाहतींकरिता भूखंड विकसित केले आहेत. प्रस्तुत वसाहतींमध्ये शाळा, दवाखाना, समाज मंदिर इत्यादी सामाजिक सुविधा उभारण्याची तयारी प्रशासनाने केली आहे. परंतु तरीही प्रकल्पबाधितांना आपली शेतजमीन आणि गाव सोडताना सामाजिक व आर्थिक समूळोच्चाटनाची

(Cultural Genocide) जाणीव भेडसावत असल्याने त्यांच्या अद्यापही काही तक्रारी किंवा अडचणी असल्याने प्रस्तुत सर्फनाला पाटबंधारे प्रकल्प गेली दोन दशके प्रलंबित राहिला आहे. उपरोल्लेख केल्याप्रमाणे अशा दीर्घकाळ प्रकल्प प्रलंबनामुळे एकतर प्रकल्प व्ययवृद्धी होते. तसेच प्रकल्प लाभक्षेत्रात सर्वांगिण संक्रमण होऊन अपेक्षित विकासाच्या संधी दीर्घकाळ पुढे ढकलल्या जातात किंवा कायमस्वरूपी गमवाव्या लागतात. प्रकल्प दिरंगाईच्या समस्या व्ययवृद्धी अथवा विकास दिरंगाई इतक्याच सीमित नसतात तर अशा दिरंगाईमुळे प्रकल्पबाधितांच्याही जीवन विकासात अडथळे निर्माण होतात. कारण अधिग्रहणाची घोषणा झाल्यानंतर संबंधित प्रकल्पबाधितांची गुंतवणूक व कृषी सुधारणा क्षमता आपोआप कुंठित होऊन संपुष्टात आल्याचे दिसून येते. सरकारवरही व्ययवृद्धीचा ताण येतो. इतकेच नव्हे; तर यामुळे इतर प्रकल्पांवरील गुंतवणुकीवरही त्याचा दूरगामी परिणाम होतच असतो.

**पृथक्करण व विश्लेषण**

**पूर्वपीठिका**

हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम पाटबंधारे प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता ऑक्टोबर १९९८ मधील आहे. परंतु पुनर्वसन, जमीन मोबदला व पुनर्निवासाशी निगडित प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनामुळे हा प्रकल्प तब्बल वीस (२०) वर्षांनंतर अद्यापही प्रलंबित आहे. त्यामुळे प्रकल्प व्ययवृद्धी होऊन एकूण अंदाजित प्रकल्प व्यय सुमारे ७०० कोटी रुपयांपेक्षा अधिक झाला. एकंदरीतच भूमिअधिग्रहण व पुनर्वसन आणि पुनर्निवासातील समस्यांमुळे भूमिअधिग्रहण होऊन प्रकल्प पूर्णत्वास जाऊ न शकल्यामुळे प्रस्तुत

**क्षेत्र पाहणीचे निष्कर्ष**

**तक्ता १: प्रकल्पबाधित व नियंत्रण समूहसिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या जिरायत तथा बागायत जमीन वापरासंबंधीचे विवेचन**

| जमिनीचे प्रकार | विस्थापित कुटुंबे | | नियंत्रण समूह कुटुंबे | | निव्वळ तफावत |
|---|---|---|---|---|---|
| | एकूण (एकर) | टक्के | एकूण (एकर) | टक्के | |
| जिरायत | ५०४.३७ (५०.१६) | २.८० | २०.३६ (२१.२०) | ०.९७ | १.८३ |
| बागायत | २७२.४९ (२७.११) | १.५१ | ३२.९९ (४७.३१) | १.५७ | - ०.०६ |
| पडीक | २३०.६४ (२२.९४) | १.२८ | १६.३७ (३४.४७) | ०.७८ | ०.५० |
| एकूण | १००५ | ५.५८ | ६९.७२ | ३.३२ | २.२६ |

**संदर्भ :** क्षेत्र सर्वेक्षण

**टीप :** कंसातील आकडे एकूणाशी प्रमाण/टक्केवारी दर्शवितात.

प्रकल्पाच्या भूमिअधिग्रहण व पुनर्वसन कामी डिसेंबर २०१३ चा भूमिअधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायदा लागू झाला असल्याने व प्रस्तुत कायद्यातील तरतुदीप्रमाणे सामाजिक परिणाम निर्धारण (SIA) करणे क्रमप्राप्त झाले आहे. प्रस्तुत अहवालावर प्रामुख्याने प्रकल्पग्रस्त शेतकरी कुटुंबे व नियंत्रण समूह स्वरूपात नजिकच्या चित्री पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभधारक शेतकरी कुटुंबांच्या प्राथमिक माहितीच्या पृथक्करण व विश्लेषणावर बेतला आहे. यामध्ये प्रामुख्याने प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबे व संभाव्य प्रकल्प लाभार्थींवरील प्रलंबित प्रकल्पपूर्ततेचे संभाव्य आर्थिक व सामाजिक परिणाम तपासण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात २०१३ च्या 'अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास' कायद्यान्वये सर्फनाला प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या शेतजमिनीच्या मोबदल्यात प्रकल्प लाभक्षेत्रात शेतजमिनी देण्याची तयारी कोल्हापूर महसूल विभाग/जिल्हा प्रशासनाने केली असल्याने प्रकल्पग्रस्तांचे रूपांतर प्रकल्प लाभधारकांत होण्याचा मार्ग खुला झाला आहे. तथापि, पुनर्वसित जमिनीबाबत प्रकल्पग्रस्तांच्या अनेक तक्रारी आहेत हा भाग वेगळा. त्यामुळे प्रकल्पग्रस्त व नियंत्रण समूह चित्रीप्रकल्प लाभधारक कुटुंबांच्या प्राथमिक माहितीच्या साहाय्याने विना प्रकल्प व प्रकल्पपूर्णत्वोपरांत प्रामुख्याने आर्थिक व सामाजिक तफावत मापनाचा प्रयत्न केला आहे. कोणत्याही सिंचन प्रकल्पाचा पहिला व महत्त्वाचा परिणाम म्हणजे लाभक्षेत्रातील पीक पद्धती आणि जिरायत व बागायत जमिनीच्या प्रमाणात घडून येणारा बदल होय. असा बदल तपासताना प्रकल्पबाधित व चित्रीप्रकल्प लाभक्षेत्रातील जमीन धारणेचे वर्गीकरण केले असता वरील तक्ता क्रमांक १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे स्थितीसमोर येते. प्रकल्प विस्थापित शेतकरी की, ज्यांची शेती पूर्णपणे पर्जन्यमानावर अथवा स्वयंनिर्मित सिंचन साधनांवर अवलंबून आहे त्यांच्या एकूण धारण क्षेत्रांपैकी अर्ध्यापेक्षा अधिक (५०.१६ टक्के) धारणक्षेत्र जिरायत तर साधारणपणे एक चतुर्थांश (२७.११ टक्के) एवढे धारणक्षेत्र स्वयंनिर्मित बागायत क्षेत्र असल्याचे दिसून येते. याउलट प्रकल्प लाभधारक मौजे हाजगोळी (खु) स्थित नियंत्रण समूह शेतकऱ्यांच्या धारणक्षेत्राचा विचार केला तर प्रकल्प लाभामुळे एकूण धारणक्षेत्रांपैकी जवळजवळ अर्धे (४७.३२ टक्के) धारणक्षेत्र बारमाही बागायत झाले आहे. तर याउलट एक तृतीयांश (३२.२० टक्के) इतके धारणक्षेत्र अद्यापही जिरायत अवस्थेत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे आजरा तालुक्यातील जमिनीचा उंच-सखलपणा. कारण डोंगराळ प्रदेश असल्यामुळे उंच/टेकडीवरील शेतांपर्यंत पाटपाणी पोहोचू शकत नाही आणि बहुतांश शेतकऱ्यांनी ठिबक अथवा तुषार सिंचनाचा अवलंब केलेला नाही. याच कारणामुळे प्रकल्पबाधित २२.९५ टक्के व चित्री लाभक्षेत्रामधील नियंत्रण समूह शेतकऱ्यांच्या २३.४८ टक्के (एकूण धारण क्षेत्रापैकी) पड जमिनीचा विचार केला तर त्यात फारशी तफावत दिसून येत नाही. तसेच पर्जन्यमान समाधानकारक असल्याने हंगामी धाणपीके मुबलक प्रमाणात येतात. त्यामुळे उंच शेतांपर्यंत पाटपाणी नेण्याची आवश्यकता भासत नाही. त्यामुळे जिरायतीचे प्रमाण जास्त आहे. कारण आजरा तालुक्याचे वार्षिक पर्जन्यमान साधारणपणे १३०० मि.मी. इतके असल्याने हंगामी पाण्याची भरघोस उपलब्धता असते. त्यामुळे पावसावर येणारी पिके ही चांगली येतात. उत्तम उत्पादकता देतात. त्यामुळे अशा उंचीवरील शेतात पाईपलाईनचा खर्च करून पाणी पोहोचविण्याची गरज या शेतकऱ्यांना भासत नसावी.

जिरायत आणि बागायत परिक्षेत्रातील सरासरी धारणक्षेत्राचा विचार केला तर जिरायतपेक्षा बागायत

परिक्षेत्रातील सरासरी कृषी धारणक्षेत्राचे आकारमानही कमी असते, याची अनेक कारणे असू शकतात. यापैकी महत्त्वाचे कारण म्हणजे बागायत परिक्षेत्रातील जमिनीचे खरेदी-विक्रीच्या माध्यमातून हस्तांतरण होण्याचे प्रमाण नेहमीच कमी अथवा अत्यल्प असल्याने कुटुंबाच्या वारसाहक्काने सातत्याने त्याच जमिनीचे विभाजन व तुकडीकरण होत राहते. त्याचप्रमाणे बागायत परिक्षेत्रातील लोकांच्या स्थलांतरणाचे प्रमाणही कमी असते. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांना स्वत:च्या शेतावर उपजीविकेची साधने निर्माण झालेली असल्याने रोजंदारीकरिता स्थलांतर होत नसल्याने धारणक्षेत्राचे आकारमान सतत कमी होताना दिसून येते. तसेच बागायत परिक्षेत्रामधील पीक पद्धती आपोआपच व्यापारी स्वरूपाची होत जाते व त्यातून अधिकचे उत्पादन व उत्पन्न मिळण्याची शक्यता वाढते. त्यामुळे पडजमीन लागवडी योग्य करून पिकाखाली आणल्यामुळे अशा पडजमिनीचे प्रमाण जिरायत परिक्षेत्रापेक्षा आपोआपच कमी होते. प्राथमिक माहितीचा विचार केला तर नियंत्रण समूहाचे सरासरी धारणक्षेत्र (३.३२ एकर) विस्थापितांच्या सरासरी (५.५८ एकर) धारणक्षेत्रापेक्षा २.२६ एकरने कमी असल्याचे दिसून येते. अशीच माहिती सरासरी जिरायत (२.८० एकर व ०.९७ एकर) धारण क्षेत्राबाबतही दिसून येते. परंतु सरासरी बागायत धारणक्षेत्राचा विचार केला तर नियंत्रण समूहाचे धारणक्षेत्र (१.५७ एकर) हे प्रकल्पबाधितांच्या सरासरी बागायत धारणक्षेत्रापेक्षा (१.५१ एकर) जास्त असल्याचे निदर्शनास येते.

कोल्हापूर जिल्ह्याचा पश्चिमेचा भाग कोकणाशी प्रत्यक्षपणे जोडला गेलेला आहे. कोकण घाट माथ्यापासूनच कोल्हापूर जिल्ह्याचा भूभाग सुरू होत असल्याने या प्रदेशाची भूरचना, वनसंपदा, पीकरचना, पर्जन्यमान व एकंदरीतच जीवनमान कोकण सदृश्य असल्याचे दिसून येते. हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम पाटबंधारे जलप्रकल्पाचे पाणलोट व लाभधारक ही दोन्ही क्षेत्रे आजरा तालुक्यात येतात. या तालुक्याचा भूप्रदेश कोकणसंलग्न घाटमाथ्यावरच असल्याने व पर्जन्यमान भरपूर असून (१३०० मि.मी.) येथील नदीनालेही वार्षिक प्रवाही असल्याचे दिसून येते. त्यामुळे एकंदरीतच पीक पद्धती बागायत प्रदेश सदृश्य आहे. तसेच चित्रीप्रकल्प लाभ नियंत्रण क्षेत्रही आजरा तालुक्यातच येते. त्यामुळे पाण्याचा वर्षभर तुटवडा नसल्याने नियंत्रण समूह व प्रकल्पबाधित क्षेत्राच्या पीकरचनेत बदल नसल्याचे दिसून येते. दोन्ही विभागातील पीकरचनेचा विचार केला तर खरीप व रब्बी पिकांत भात, नाचणी व भुईमूग आणि वार्षिक पिकांच्या यादीत ऊस, आंबा, चिक्कू, नारळ, फणस, काजू, जांभूळ, पेरू, रातंबा इत्यादी फळपिके व जनावरांसाठी चाऱ्याच्या पिकांचा समावेश असल्याचे दिसून येते. त्यामुळे धरणापूर्वी व धरणानंतरच्या पीक पद्धतीत कोणताही बदल असल्याचे ठळक निरीक्षण नोंदविता येणे शक्य नाही.

याचाच अर्थ अथवा महत्त्वाचे अनुमान असे की, जेथे-जेथे पाणी व धरणायोग्य जागा आहे अशा सर्वच ठिकाणी धरणे झालीच पाहिजेत; असा धोरणकर्त्यांचा व पाटबंधारे विभागातील तज्ज्ञांचा किंवा जललाभाच्या अपेक्षेने जनतेचा आग्रह असण्याची आवश्यकता नाही. किंबहुना अशा भूभागाकडे वेगळे लक्ष देऊन कोल्हापूर बंधाऱ्यासारख्या पायाभूत सुविधा निर्माण करून उन्हाळी पिकांसाठी पाणीपुरवठा निर्माण करण्यास हरकत नसावी. यामुळे सार्वजनिक खर्चात प्रचंड बचत होऊन झालेली बचत इतर विकास कामांवर तसेच तुटीच्या प्रदेशाकडे वळविता येऊ शकेल. यातून सार्वजनिक खर्चाची कार्यक्षमता साधता येऊ शकेल.

इतकेच नव्हे; तर जलप्रकल्पांकरिता करावे लागणारे भूमिअधिग्रहण टाळता येऊ शकेल. तसेच प्रकल्प विस्थापितांचा व पुनर्वसनाचा तिढा निर्माण होणार नाही. येथे असेही नमूद करणे आवश्यक आहे की राष्ट्रीय जल लवादाने देऊ केलेले राज्याच्या हिश्श्याचे काही पाणी धरणे न बांधल्यामुळे दुसऱ्या राज्यात गेले तरी त्यात फारसे नुकसान मानण्याचे कारण नाही. कारण संघराज्यीय पद्धतीचा विचार केला तर भूभागाच्या दृष्टिने भारतासारख्या खंडप्राय देशात असे घडणे स्वाभाविकच आहे. यावर एक व्यवहार्य उपाय असा असू शकतो व तो म्हणजे जर नदीखोऱ्याच्या वरच्या राज्यातील असे धरण न बांधता व पर्यायी पायाभूत सुविधा उभारल्यामुळे शिल्लक राहिलेल्या व प्रवाहाच्या खालच्या राज्यात गेलेल्या पाण्याच्या मोबदल्यात अशा अतिरिक्त जल लाभधारक राज्याने वरच्या राज्याला त्याची वार्षिक आर्थिक भरपाई देऊ करावी. तसेच वरच्या राज्याने धरण बांधण्याऐवजी कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचा वापर केला तर अशा बंधाऱ्यांच्या बांधकामाचा खर्च खालच्या राज्याने देण्यास हरकत नसावी. यातून आंतरराज्यीय सलोखाही वृद्धिंगत होऊ शकतो आणि वरच्या राज्याच्या धरणावरील खर्च, भूमिअधिग्रहण, विस्थापन व पुनर्वसन यांसारख्या समस्या तर मार्गी लागतीलच; परंतु पर्यावरणाचेही नुकसान टाळता येणे शक्य होईल.

आजरा तालुक्याचे पर्जन्यमान कोकणाप्रमाणेच जास्त असल्याने (१३०० मि. मी.) व बहुतांशी

**तक्ता २: प्रकल्पबाधित व नियंत्रण समूहसिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबांच्या पिकवार एकरी उत्पादन क्षमतेचे विवेचन**

| पिके | विस्थापित कुटुंबे | | नियंत्रण समूह कुटुंबे | |
|---|---|---|---|---|
| | प्रतिएकर उत्पादकता | | (क्विंटल/मेट्रिक टन) | |
| | खरीप | रब्बी | खरीप | रब्बी |
| भात | ७.५६ | १३.६४ | ७.२१ | १३.०० |
| नाचणी | ३.४० | ३.२४ | २.१४ | ३.३३ |
| भुईमूग | १.७७ | १.८६ | ३.०० | ३.०० |
| ऊस (मे.टन) | ११.२६ | | ३४.६५ | |

**संदर्भ :** क्षेत्र सर्वेक्षण

वर्षभर पाण्याचे दुर्भिक्ष नसल्यामुळे पाटपाण्याची व्यवस्था नसली तरी शेतकरी स्वखर्चाने वार्षिक पीकपद्धती विकसित करतात असेच दिसून येते. त्यामुळे प्रकल्पबाधित व नियंत्रण समूह प्रकल्प लाभधारक या दोन्हीही समूहांकडील फळबाग लागवडीची चौकशी केली असता पीकरचनेप्रमाणेच याबाबतही फारशी तफावत निदर्शनास येत नाही. एकूण सर्वेक्षित प्रकल्पबाधितांपैकी ४३.८९ टक्के कुटुंबांची स्वत:ची फळ लागवड आहे तर नियंत्रण समूह कुटुंबांचे हेच प्रमाण ४७.६२ टक्के इतके असल्याचे निदर्शनास आले. अर्थात, प्रकल्प लाभधारक शेतकऱ्यांकरवी वार्षिक पीकरचनेचा अवलंब होणे सहज शक्य असल्याने अशा कुटुंबांचे फळबाग लागवड प्रमाण प्रकल्पबाधितांपेक्षा अधिक असणे अगदीच सहज शक्य आहे. परंतु प्रकल्पबाधितांचेही फळबाग लागवडीचे प्रमाण अगदीच अल्प आहे असेही नाही.

## उत्पादनक्षमता

पीकरचनेप्रमाणेच प्रकल्पबाधित व प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूह कुटुंबांच्या पीक उत्पादन क्षमतेतही फारशी तफावत दिसून येत नाही. याचे मुख्य कारण वर उल्लेख केल्याप्रमाणे व एकंदरीतच जास्त पर्जन्यमान, दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांना पाण्याची वर्षभर उपलब्धता आणि समान 'कृषिवातावरण' विषयक (Agro Climatic) परिस्थिती होय.

रब्बी व खरीप या दोन्ही हंगामातील भात, नाचणी व भुईमूग या पिकांच्या एकरी उत्पादकतेत प्रकल्पबाधित व लाभधारक नियंत्रण समूह अशी शक्यतो तफावत दिसून येत नाही. कारण ही पिके ३-४ महिने अशा अल्पकालावधीची पिके आहेत. या कालावधीत प्रकल्पबाधित व प्रकल्प लाभधारक या दोन्हीही समूहाकडे पाण्याची मुबलक उपलब्धता असते. परंतु उसासारख्या वार्षिक पिकाच्या एकरी उत्पादन क्षमतेत मात्र आमूलाग्र तफावत दिसून आली. याचे कारण ऊस पिकाला उन्हाळ्यातही पाण्याची आवश्यकता असते आणि उन्हाळ्यात मात्र बिगर सिंचन लाभधारक क्षेत्रात पाणी उपलब्ध करणे शक्य होत नाही किंवा बहुतेकदा उन्हाळ्यात पाणी कमी पडते. एकरी ऊस उत्पादनाच्या सरासरीचा विचार केला तर प्रकल्पबाधित कुटुंबांची उसाची सरासरी एकरी उत्पादन क्षमता ११.२६ तर नियंत्रण समूह प्रकल्प लाभधारक शेतकऱ्यांची एकरी ऊस उत्पादन क्षमता ३४.६५ मेट्रिक टन इतकी दिसून आली. म्हणजेच या दोन्ही क्षेत्रातील ऊस उत्पादन क्षमतेचा विचार केला तर प्रकल्प लाभधारक क्षेत्रातील ऊस उत्पादन क्षमता बिगर लाभधारक प्रकल्पबाधित क्षेत्राच्या ३०७.७२ टक्के जास्त आहे. अशा प्रकारे वार्षिक व्यापारी पिकाच्या उत्पादन क्षमतेबाबत शाश्वत पाणीपुरवठा किती महत्त्वाचा कृषी आदान घटक आहे, हे लक्षात येते. अर्थात, शेतीचे बागायतीकरण म्हणजे फक्त ऊस उत्पादनावर भर देणे असा त्याचा अर्थ होत नाही. जर ऊस पिकाव्यतिरिक्त इतर सर्व पिकांची सरासरी उत्पादन क्षमता प्रकल्पबाधित व प्रकल्प लाभधारक या दोन्ही समूहांबाबत जवळजवळ समान असेल तर फक्त लौकिक अर्थाने ऊस बागायत करण्यासाठी धरण निर्मिती करून विस्थापन, पुनर्वसन, पर्यावरण विषयक आणि सार्वजनिक खर्चाची अकार्यक्षमता यांसारख्या समस्यांना आमंत्रण देण्याचे काहीही कारण नाही (तक्ता २).

विस्थापित व प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूह शेतकऱ्यांची वनसंपदेची तुलना केली तर प्रकल्प विस्थापितांची वनसंपदा नियंत्रण समूहापेक्षा अनेक पटींनी अधिक आहे. कारण प्रकल्पबाधित कुटुंबांची एकूण वनसंपदा १४९०६४ (सरासरी प्रतिकुटुंब ८२८.१३) तर नियंत्रण समूहाची एकूण वनसंपदा १२११ (सरासरी प्रतिकुटुंब ६०.५५) इतकी असल्याचे दिसून येते. म्हणजेच प्रस्तुत प्रकल्पात मोठ्या प्रमाणात खाजगी वनसंपदेचे नुकसान होणार यात शंका नाही. या सर्व प्रकारच्या बाधित वनसंपदेकरिता प्रकल्पग्रस्तांना रकमेच्या स्वरूपात नुकसान भरपाई मिळणार असली तरीही वनसंपदा कायमस्वरूपी नष्ट होणार असल्याने पर्यावरणाचे नुकसान निश्चित आहे. तसेच हा सर्व परिसर पश्चिम घाटास संलग्न असल्याने वनसंपदेबरोबरच इतर नैसर्गिक नुकसान अधिक जास्त असू शकते (तक्ता ३).

सर्फनाला प्रकल्पग्रस्त परिसरात मुबलक वनसंपदा असल्याचे दिसून आले. तसेच अनेक प्रकल्पबाधित शेतकऱ्यांकडे स्वत:च्या मालकीच्या फळबागा आहेत. यात प्रामुख्याने काजू, आंबा, पेरू इत्यादी प्रकारच्या फळपिकांचा समावेश आहे. ज्या प्रकल्पग्रस्तांनी अशी

**तक्ता ३: प्रकल्पबाधित व नियंत्रण समूहसिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाची फळ लागवड**

| फळझाडे | विस्थापित कुटुंबे | | नियंत्रण समूह कुटुंबे | |
|---|---|---|---|---|
| | सरासरी | लागवडदार | सरासरी | लागवडदार |
| काजू | २१३ | २० | ७५ | ४ |
| आंबा | ८ | १ | ० | ० |
| पेरू | २० | ३ | ० | ० |
| एकूण | २४१ | २४ | ७५ | ४ |

**संदर्भ :** क्षेत्र सर्वेक्षण

फळबाग लागवड केली आहे, त्यांची सरासरी संख्या व फळझाडे काजू २१३ (२०), आंबा ८ (१) व पेरू २० (३) अशी असल्याचे दिसून येते. प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूहाच्या बाबतीत हा आकडा जरासा वेगळा दिसून येतो. यामध्ये फक्त ४ शेतकऱ्यांनी काजूची लागवड केली असून प्रत्येकी ७५ काजू झाडे त्यांच्याकडे आहेत. प्रकल्प लाभक्षेत्रात फळपिकांऐवजी उसासारख्या तुलनेने कमी कष्ट व विक्रीची समस्या नसलेल्या पिकास प्राधान्य दिले जाते. तसेच जेव्हा सिंचन प्रकल्पांचे लाभ मिळतात तेव्हा शक्यतो ऊस पिकाकडेच शेतकऱ्यांचे अनावश्यक आकर्षण असल्याचा सर्वदूर महाराष्ट्राचा अनुभव येथेही येतो व नियंत्रण समूह प्रकल्प लाभधारक कुटुंबांच्या बाबतीत सत्यतेत उतरतो. वर नमूद केल्याप्रमाणे एकंदरीतच आजरा तालुक्याचे पर्जन्यमान मुबलक व कोकणसदृश्य असल्याने या तालुक्यात सरकारी व

**तक्ता ४: प्रकल्पबाधित व नियंत्रण समूहसिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे कृषी जलस्त्रोत**

| पाण्याचा स्त्रोत | विस्थापित कुटुंबे | | नियंत्रण समूह कुटुंबे | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| विहीर | १६ | ८.८९ | १ | ४.७६ |
| बोअरवेल | १३ | ७.२२ | १ | ४.७६ |
| नदी | २७ | १५.०० | ० | ०० |
| शेततळे | ० | ०० | ० | ०० |
| तलाव | १ | ०.५६ | ० | ०० |
| नदीपाट | ५९ | ३२.७८ | ० | ०० |
| नदीसमांतरचारी | ० | ०० | २१ | १०० |
| इतर | २५ | १३.८९ | ० | ०० |
| आधार | १८० | २१ | | |

**संदर्भ :** क्षेत्र सर्वेक्षण

खाजगी मालकीची वनसंपदाही पुष्कळ असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे सरकारी वनविभागा व्यतिरिक्त खाजगी वनसंपदाही धरणाच्या बुडीत क्षेत्रात येते. यात काही आश्चर्य नाही असेच आम्हाला क्षेत्रभेटी व आकडेवारीवरून लक्षात आले. परंतु अशा वनसंपदेचे नुकसान प्रचंड आहे असे निश्चित.

विस्थापित व प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूह शेतकऱ्यांची वनसंपदेची तुलना केली तर प्रकल्प विस्थापितांची वनसंपदा नियंत्रण समूहापेक्षा अनेक पटींनी अधिक आहे. कारण प्रकल्पबाधित कुटुंबाची एकूण वनसंपदा १४९०६४ (सरासरी प्रतिकुटुंब ८२८.१३) तर नियंत्रण समूहाची एकूण वनसंपदा १२११ (सरासरी प्रतिकुटुंब ६०.५५) इतकी असल्याचे दिसून येते. म्हणजेच प्रस्तुत प्रकल्पात मोठ्या प्रमाणात खाजगी वनसंपदेचे नुकसान होणार यात शंका नाही. या सर्व प्रकारच्या बाधित वनसंपदेकरिता प्रकल्पग्रस्तांना रकमेच्या स्वरूपात नुकसान भरपाई मिळणार असली तरीही वनसंपदा कायमस्वरूपी नष्ट होणार असल्याने पर्यावरणाचे नुकसान निश्चित आहे. तसेच हा सर्व परिसर पश्चिम घाटास संलग्न असल्याने वनसंपदेबरोबरच इतर नैसर्गिक नुकसान अधिक असू शकते.

**तक्ता ५: प्रकल्पबाधीत व नियंत्रण समूहसिंचन प्रकल्पलाभ पट्ट्यातील सरासरी भूजल पातळी**

| प्रकार | विस्थापित कुटुंबे | नियंत्रण समूह कुटुंबे |
|---|---|---|
| | भूजल पातळी (फूट) | भूजल पातळी (फूट) |
| विहीर | २२ | ४० |
| बोअरवेल | २२१ | २५० |

**संदर्भ :** क्षेत्र सर्वेक्षण

**जलनियोजन**

महाराष्ट्राच्या एकूण लागवडी योग्य जमिनींपैकी (GCA) जलसिंचनाचे प्रमाण साधारणपणे १८ टक्के इतके सीमित आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांची स्वयं गुंतवणुकीतून विहिरी, बोअरवेल यांसारख्या मार्गांनी निर्माण केलेले जलस्त्रोतही महत्त्वाची भूमिका पार पाडतात. पारपोली प्रकल्पग्रस्त शेतकरी सिंचन नियोजनाकरिता प्रामुख्याने विहीर (८.८९ टक्के), बोअरवेल (७.२२ टक्के), नदी (१५ टक्के), तलाव (०.५६ टक्के) व नदीतून काढलेल्या समांतरचारीवर (३२.७८ टक्के) अवलंबून आहेत. याउलट प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूहाचा विचार केला तर अल्प प्रमाणातील अनुक्रमे विहीर (४.७६ टक्के) व बोअरवेल (४.७६ टक्के) असे अवलंबित्व वगळता? सर्व लाभधारकांना वार्षिक पाटपाण्याची (१०० टक्के) सुविधा उपलब्ध आहे. यावरून असे अनुमान निघते की, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे जलव्यवस्थापन पूर्णपणे स्वयंखर्चावर व स्वयंगुंतवणुकीवर निर्भर असून प्रकल्प लाभधारक मात्र सरकारनिर्मित जलस्त्रोतांचा लाभ घेत आहेत. प्रकल्पबाधितांपैकी तीन ठिकाणच्या म्हणजेच मौजे पारपोली, पारपोली गावठाण व मौजे खेडगे स्थित उपलब्ध सर्व १८० कुटुंबांचे जनगणना पद्धतीने सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण केले असता जलस्त्रोतांबाबत असे दिसून आले की, एकूण १८० पैकी ३५ कुटुंबांनी स्वत:च्या विहिरी खणून त्यावर डिझेल अथवा विद्युत पंपसेट बसविलेले होते. तर

इतर १९ कुटुंबांनी बोअरवेल खोदून त्यावर पाणबुडी पंप (Submersible Pump) बसविलेले होते. परंतु नियंत्रण समूहकुटुंबांच्या बाबतीत विचार केला तर प्रत्येकी एका कुटुंबानेच विहीर व बोअरवेल खोदल्याचे दिसून आले. याचाच अर्थ लाभधारक शेतकऱ्यांना कृषी पाणी पुरवठ्याकरिता स्वत:च्या खाजगी गुंतवणुकीची आवश्यकता नाही.

विस्थापित क्षेत्रातील विहीर खोदकामाची सरासरी भूजल पातळी २२ फूट तर बोअरवेलकरिता २२१ फूट आहे. याउलट प्रकल्प लाभ क्षेत्रात या दोन्ही जलस्त्रोतांकरिताच्या भूजल पातळी अनुक्रमे ४० व २८० फूट खोल असल्याचे दिसून येते. याची दोन कारणे संभवतात. एक म्हणजे प्रकल्प लाभक्षेत्रात उसासारख्या विक्रमी पाणीवापराच्या व्यापारी पीक लागवडीमुळे जलस्त्रोतांचा अनियंत्रित वापर व उपसा होत राहतो व दुसरे कारण म्हणजे उसासारख्या व्यापारी पिकामुळे वर्षभर पाणी उपसा होत राहिल्याने भूगर्भातील पाणी पातळी खोल जाते. म्हणजेच प्रकल्प लाभक्षेत्रातील पीक पद्धती व अनियंत्रित पाणीवापर हे दोन्ही पर्यावरणाच्या दृष्टिने काहीसे हानीकारकच असल्याचे दिसून येते.

जलसिंचन प्रकल्पाचे लाभधारक नसलेली शेतकरी कुटुंबे उदरनिर्वाहासाठी स्वत:च्या शेती व्यतिरिक्त इतर साधनांवर अवलंबून असणे अगदी अपरिहार्य असते. कारण अशा कुटुंबांना आपल्या पावसावर अवलंबून असणाऱ्या व व्यापारी पिके नसणाऱ्या शेत लागवडीतून पर्याप्त उत्पन्न मिळू शकत नाही.

**बिगर कृषी रोजगारविषयक विवेचन**

पाणीपुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध झाल्यामुळे बिगर कृषी अथवा पूरक उत्पन्नाचे मार्ग आपोआपच निर्माण होतात. अथवा तसे मार्ग निर्माण करण्याची क्षमता लाभक्षेत्रातील शेतकरी कुटुंबांत तयार होते. अशा बिगर कृषी अथवा जोड उत्पन्नाच्या मार्गांमुळे शेतकऱ्यांच्या एकूण उत्पन्नात वृद्धी होऊन त्यांचे जीवनमान सुधारणे शक्य बनते. उदाहरणार्थ, दुधाचा व्यवसाय करण्यासाठी महत्त्वाचा घटक म्हणजे वर्षभर ओल्याचाऱ्याची उपलब्धता असावी लागते. असा ओलाचारा उपलब्ध होण्याच्या मार्गातील एकमेव अडथळा म्हणजे वर्षभर पाण्याची उपलब्धता नसणे. परंतु जलसिंचन प्रकल्प लाभक्षेत्रात हा प्रमुख अडथळाही दूर होणे शक्य असल्यामुळे अशा भागातील शेतकरी दुधाचा जोडधंदा सुरू करू शकतात. गाय, म्हैस, शेळी किंवा मेंढी यांसारखे प्राणी पाळून जोडउत्पन्नाचे मार्ग निर्माण करू शकतात. परंतु अशी परिस्थिती मात्र आम्ही केलेल्या सर्वेक्षणात दिसून आली नाही. कारण एकूणच आकडेवारीवर दृष्टिक्षेप टाकला तर असे निदर्शनास येते की, सिंचन प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूह शेतकरी कुटुंबाचा असा जोडधंदा करण्याचा मानस प्रकल्पबाधितांपेक्षा कमी असल्याचे दिसून येते. कदाचित पीक पद्धतीतील बदल, उत्पादकता व उत्पन्नातील वृद्धीमुळे त्यांना अशा कृषिजोडधंद्याची आवश्कता वाटत नसावी, असेही असू शकते. परंतु शाश्वत पाणी पुरवठ्याच्या ठिकाणी देशात इतरत्र कोठेही अध्ययन केले तर कृषि जोडधंद्यात निश्चितपणे वृद्धी झाल्याचीच उदाहरणे व अनुभव आहेत. आकडेवारीवर दृष्टिक्षेप टाकला असता असे निदर्शनास येते की, दुभती जनावरे अथवा शेळी, मेंढी किंवा कुक्कुटपालनाच्या कामी व त्यापासून मिळणाऱ्या उत्पादन व मिळकती संदर्भात प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूहातील शेतकरी कुटुंबे प्रकल्पबाधित कुटुंबांच्या मागे आहेत. अथवा अशा पूरक व्यवसायात आजरा तालुक्यातील प्रकल्प लाभधारक शेतकऱ्यांची इच्छा नाही असेच निदर्शनास येते.

**वित्तीय निर्देशांक**

वित्तीय सेवांमध्ये प्रामुख्याने बचत, कर्ज व विमासेवा व त्यांचा वापर इत्यादी विषयक निर्देशाकांचा

समावेश होतो. गेल्या दोन दशकांत वित्तीय सेवाक्षेत्रात बचत गटांचे अस्तित्व अधिक प्रभावीपणे जाणवू लागले आहे. ग्रामीण भागात अशा प्रकारच्या वित्तीय सेवांचा वापर प्रामुख्याने त्यांच्या उपलब्धतेवर अवलंबून असतो, आणि अशा सेवांची उपलब्धता; उदा. बँक शाखा उघडणे संबंधित ग्रामीण भागाच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून असते. जर ग्रामीण भागाची कृषी व बिगर कृषी अर्थव्यवस्था सुधारलेली असेल व उत्पन्नाचे प्रमाण वाढून बचतीसाठी लोकांकडे नगद उपलब्ध असेल तेव्हा त्यांना बँक, पोस्ट अथवा विमाखात्याची आवश्यकता जाणवते. तसेच जेव्हा संबंधित भागातील नागरिकांकडे पुरेशी बचत क्षमता निर्माण होते तेव्हा बँकांनाही आपल्या शाखा सुरू करणे आर्थिकदृष्ट्या परवडते. विशेषतः ग्रामीण भागाबाबत ही बाब अतिशय ठळकपणे महत्त्वाची असते. ग्रामीण भागात जेव्हा पाणी पुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध होतात तेव्हा एकंदरीतच पीकरचनेत व उत्पादन क्षमतेत बदल होऊन कास्तकारी किफायतशीर होण्यास मदत होते. तसेच कृषी विकासामुळे अशा ग्रामीण भागात बिगर कृषी रोजगार व व्यवसाय सुरू होऊन त्यांचीही लोकांच्या उत्पन्नवृद्धीत महत्त्वाची भूमिका बनते. शेतकऱ्यांना उत्पादक व अनुत्पादक अशा दोन्ही प्रकारच्या कर्जाची गरज भासते. काही कारणामुळे पिके खराब झाली तर शेतकऱ्यांना अनुत्पादक म्हणजे उपभोगाकरिता कर्जाची आवश्यकता भासते. इतरवेळी शेतीच्या कामाकरिता उत्पादक कर्ज काढावे लागते. कृषीकर्जाचे दोन प्रकार पडतात. एक; अल्पकालीन पीक कर्ज आणि दोन; दीर्घकालीन गुंतवणूक व शेती विकास कर्ज. हिरण्यकेशी सर्फनाला प्रकल्पबाधित सर्वेक्षित १८० पैकी एकूण ११२ शेतकऱ्यांनी (कुटुंबांनी) विविध प्रकारची अल्प व दीर्घकालीन अशी १.९५ कोटी रकमेची कर्जे घेतली आहेत.

तर प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूह २१ पैकी १६ कुटुंबांनी एकूण १९.९९ लक्ष रुपयांची कर्जे घेतली असल्याचे दिसून आले. या सर्व कर्जांची आम्ही प्रतिकुटुंब व प्रतिएकर अशी सरासरी काढून या दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांची तुलना केली असता असे दिसून आले की, ट्रॅक्टरसारखे भांडवली कर्ज नियंत्रण समूह शेतकरी प्रकल्पबाधितांपेक्षा प्रतिएकर व प्रतिकुटुंब जास्त रकमेची घेतात असे दिसून आले. अशाच प्रकारचे निरीक्षण खावटी कर्जाच्या संदर्भातही दिसून येते. याचाच अर्थ असा की, जलसिंचन प्रकल्पांमुळे जो शाश्वत पाणीपुरवठा निर्माण होतो, त्यामुळे उत्पादन व उत्पन्न वृद्धी होऊन शेतकऱ्यांची कर्ज (Credit Ability) क्षमता वाढते. परिणामे, वेळेवर परतफेड करण्याची क्षमताही वाढल्याने बँकांचा त्यांच्याप्रती विश्वास वाढून अशा शेतकऱ्यांना अधिकचा कर्जपुरवठा होऊन तो प्रवाह अविरत सुरू राहू शकतो. प्राथमिक माहितीवरून दुसरे महत्त्वाचे निरीक्षण असे मिळते की ज्या कारणांसाठी प्रकल्पबाधित निसर्गावलंबी शेतकऱ्यांना कर्जावर निर्भर राहावे लागते. उदा. विहीर, पाईपलाइन व बोअरवेल अशा भांडवली साधनांची खरेदी अथवा निर्मिती करताना प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूहातील शेतकरी स्वयंनिर्भर असल्याचे दिसून येते. यावरून असेच सिद्ध होते की, प्रकल्प लाभधारक शेतकऱ्यांची आर्थिकस्थिती निश्चितच प्रकल्पबाधितांपेक्षा सक्षम आहे. म्हणजेच शाश्वत कृषीकरिता वर्षभर शाश्वत पाणीपुरवठा असणे अत्यंत आवश्यक आदान मानले जावे. नव्हे तसे ते आहे सुद्धा (तक्ता ६).

संस्थात्मक अथवा बिगर संस्थात्मक खाजगी मार्गांनी कर्ज काढले व त्या कर्जाची वेळेवर परतफेड केली तर नवीन कर्ज मिळण्याची क्षमता अबाधित राहते. प्रामुख्याने अशी क्षमता कृषी उत्पादकता, उत्पादन व उत्पन्नाच्या शाश्वततेवर निर्भर असते. अशा प्रकारच्या निर्धारणात वार्षिक व अखंडित पाणीपुरवठा

**तक्ता ६: प्रकल्पबाधित व नियंत्रण समूहसिंचन प्रकल्प लाभधारक उद्दिष्टनिहाय एकूण, सरासरी कौटुंबिक व सरासरी प्रतिएकर कर्जाचे विवेचन**

| कर्ज प्रकार | विस्थापित कुटुंबे | | नियंत्रण समूह कुटुंबे | |
|---|---|---|---|---|
| | कर्ज (रुपये) | टक्के | कर्ज (रुपये) | टक्के |
| पीककर्ज | ११११९००० | ५७.३२ | ७९४००० | ३९.७१ |
| खावटी | ३५००१ | १.८ | १००००० | ५ |
| विहीर | ५०००० | ०.२६ | ० | ०० |
| पाईपलाईन | ४७४४९९ | २४.३७ | ० | ०० |
| ट्रॅक्टर | ६५०००० | ३.३४ | १०२५००० | ५१.२७ |
| बोअरवेल | ६५०००० | ३.३४ | ० | ०० |
| इतर | १८६५००० | ९.५८ | ८०००० | ४ |
| एकूण | १९४६९००० | १०० | १९९९००० | १०० |
| आधार | ११२ कर्जदार | | १६ कर्जदार | |
| **प्रतिकुटुंब सरासरी** | | | | |
| पीककर्ज | ९९६३३.३९ | ५७.३२ | ४९६२५ | ३९.७१ |
| खावटी | ३१२५.०१ | १.८ | ६२५० | ५ |
| विहीर | ४४६.४३ | ०.२६ | ० | ०० |
| पाईपलाईन | ४२३६६.०६ | २४.३७ | ० | ०० |
| ट्रॅक्टर | ५८०३.५७ | ३.३४ | ६४०६२.५ | ५१.२७ |
| बोअरवेल | ५८०३.५७ | ३.३४ | ० | ०० |
| इतर | १६६५१.७९ | ९.५८ | ५००० | ४ |
| एकूण | १७३८३०.३६ | १०० | १२४९३७.५ | १०० |
| आधार | ११२ कर्जदार | | १६ कर्जदार | |
| **प्रतिएकर सरासरी** | | | | |
| पीककर्ज | २४६७८.७७ | ५७.३२ | २६६५.३ | ३९.७२ |
| खावटी | ७७४.०५ | १.८ | ३३०७.९७ | ५ |
| विहीर | ११०.५८ | ०.२६ | ० | ०० |
| पाईपलाईन | १०४९३.८४ | २४.३७ | ० | ०० |
| ट्रॅक्टर | १४३७.५१ | ३.३४ | ० | ०० |
| बोअरवेल | १४३७.५१ | ३.३४ | ३३९०६.७२ | ५१.२८ |
| इतर | ४१२४.५५ | ९.५८ | २६४६.३८ | ४ |
| एकूण | ४३०५६.८१ | १०० | ६६१२६.३६ | १०० |
| आधार | ४५२.१७ (एकर) | | ३०.२३ (एकर) | |

**संदर्भ :** क्षेत्र सर्वेक्षण

महत्त्वाची भूमिका बजावतो. कारण त्यामुळे शेतकऱ्यांना व्यापारी पिके घेणे तर शक्य होतेच. परंतु वर्षाकाठी तीन पिके अथवा वार्षिक पिकाखाली जास्तीत जास्त जमीन आणून त्यांचे उत्पादनही वाढते. अशा प्रकारच्या सुधारणा जलसिंचन प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात शक्य असल्यामुळे अशा शेतकऱ्यांची कर्जक्षमता वाढते व बँकांकडील कर्ज सुरळीतपणे मिळण्याचा मार्ग सुकर बनतो. वर दिलेल्या तक्ता

## तक्ता ७ : प्रकल्पबाधित व नियंत्रण समूहसिंचन प्रकल्प लाभधारक सर्वेक्षित कुटुंबाचे कर्ज, परतफेड, व्याज, थकबाकी विषयक विवेचन

| अ. क्र. | वित्तीय निर्देशांक (२) | विस्थापित कुटुंबे (३) | नियंत्रण समूह कुटुंबे (४) | फरक (३-४) |
|---|---|---|---|---|
| १ | एकूण कर्ज (रुपये) | १९४६९००० | १९९९००० | १७४७००००.०० |
| २ | कर्जदार कुटुंबाचे एकूण धारण क्षेत्र (एकर) | ४५२.१७ | ३०.२३ | |
| ३ | सर्वेक्षित कुटुंबाचे एकूण धारण क्षेत्र (एकर) | १००५ | ६९.७२ | |
| ४ | सर्वेक्षित कुटुंबाचे सरासरी धारण क्षेत्र (एकर) | ५.४९ | ३.३२ | |
| ५ | कर्जदार कुटुंबाचे सरासरी धारण क्षेत्र (एकर) | ४.०३ | १.८८ | |
| ६ | कर्ज परतफेड (रुपये) | ५९७८९३० | ७९६६०१.५ | |
| ७ | शिल्लक/थकबाकी कर्ज (रुपये) | २१६४१७४० | १२९५१२५ | |
| ८ | एकूण कर्जदार कुटुंबे | ११२ | १६ | |
| ९ | कर्जदार कुटुंबाचे प्रमाण % | ६१.२ | ७६.१९ | |
| १० | कर्जावरील एकूण व्याज (रुपये) | १३४९००७०.०० | १२०२३९८.५० | |
| | **महत्त्वाचे निर्देशांक** | | | |
| ११ | कुटुंबाचे सरासरी कर्ज (रुपये) | १७३८३०.३६ | १२४९३७.५० | ४८८९२.८६ |
| १२ | कर्ज : जमीन प्रमाण (रुपये : एकर) | ४३०५६.८१ | ६६१२६.३६ | -२३०६९.५५ |
| १३ | कर्ज परत फेड : जमीन प्रमाण (रुपये : एकर) | १३२२२.७५ | २६३५१.३६ | -१३१२८.६१ |
| १४ | थकबाकी : जमीन प्रमाण (रुपये :एकर) | ४७८६१.९५ | ४२८४२.३८ | ५०१९.५८ |
| १५ | कुटुंब सरासरी थकबाकी (रुपये) | १९३२२९.८२ | ८०९४५.३१ | ११२२८४.५१ |
| १६ | कुटुंब सरासरी परतफेड (रुपये) | ५३३८३.३० | ४९७८७.५९ | ३५९५.७१ |
| १७ | कर्ज : परतफेड प्रमाण (%) | ३.२६ | २.५१ | ०.७५ |
| १८ | कर्ज : थकबाकीप्रमाण (%) | ०.९० | १.५४ | -०.६४ |
| १९ | थकबाकी : परतफेड प्रमाण (%) | ३.६२ | १.६३ | १.९९ |
| २० | कौटुंबिक सरासरी व्याज (रुपये) | १२०४४७.०५ | ७५१४९.९१ | ४५२९७.१५ |
| २१ | कर्ज : व्याजप्रमाण (%) | १.४४ | १.६६ | -०.२२ |
| २२ | व्याज : परतफेड प्रमाण (%) | ०.४४ | ०.६६ | -०.२२ |
| २३ | व्याज : धारणक्षेत्र प्रमाण(रुपये : एकर) | २९८३४.०७ | ३९७७५.०१ | -९९४०.९४ |
| २४ | थकबाकी : व्याज प्रमाण (%) | १.६० | १.०८ | ०.५३ |

**संदर्भ :** क्षेत्र सर्वेक्षण

क्रमांक १४ मधील पृथक्करित आकडेवारीवरून असे दिसून येते की, एकूण २१ प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूह कुटुंबांपैकी १६ कुटुंबांनी कर्ज काढले व परत करण्याचा मार्ग अवलंबला आहे. तर प्रकल्पबाधित १८० सर्वेक्षित कुटुंबांपैकी ११२ कर्जदार शेतकरी आहेत. या सर्वांच्या एकूण कर्ज, कौटुंबिक सरासरी कर्ज, सरासरी प्रतिएकर कर्ज व कर्ज परतफेड इत्यादी निर्देशांकाचा विचार करता असे निदर्शनास येते की, बहुतांश निर्देशांकाबाबत प्रकल्प लाभधारक कुटुंबे प्रकल्पबाधितांपेक्षा आघाडीवर आहेत. तसेच कर्ज परतावा आणि कर्ज थकबाकीबाबतही अशीच काहीशी परिस्थिती जाणवते. प्रतिएकर कर्जाच्या बाबतीत असे दिसून येते की, प्रकल्पबाधितांचे प्रमाण एकरी ४३.०३ तर प्रकल्प लाभधारकांचे प्रमाण ६६.१२ हजार रुपये तर एकरी परतफेडीचे प्रमाण अनुक्रमे १३.२२ व २६.३५ हजार रुपये असून या दोन्ही निर्देशांकांबाबत प्रकल्प लाभधारक कुटुंबे प्रकल्पबाधित कुटुंबांपेक्षा अग्रेसर आहेत (तक्ता ७).

कुटुंबाची सरासरी कर्ज थकबाकीची आकडेवारी असे दर्शविते की, प्रकल्पबाधित कुटुंबांची थकबाकीची सरासरी (१.९३ लक्ष रुपये) प्रकल्प लाभधारकांच्या सरासरीपेक्षा (८०.९४ हजार रुपये) अधिक आहे. असेच प्रमाण प्रतिएकर सरासरी कर्ज थकबाकीबाबतही (अनुक्रमे ४७.८६ व ४२.८४ हजार रुपये) दिसून येते. अशा प्रकारच्या वित्तीय निर्देशांकावरून असे स्पष्ट होते की, प्रकल्प लाभधारक नियंत्रण समूहांची वित्तीय क्षमता प्रकल्पबाधित कुटुंबांपेक्षा जास्त असल्यामुळे त्यांची भविष्यातील कर्जक्षमताही आपोआपच जास्त राहते. परिणामी, अशा शेतकरी कुटुंबांना भविष्यात कर्जमाफीसारख्या योजनांची आवश्यकता कमीत कमी भासते. परंतु वित्तीय निर्देशांकाबाबत विचार केला तर असे निष्पन्न होते की, बिगर जलसिंचन लाभधारकांची कर्जक्षमता असमाधानकारक राहिल्याने त्यांना मात्र व्यक्तिगत कर्जाची परतफेड करण्यासाठी कर्जमाफीसारख्या योजनांची आवश्यकता भासते (तक्ता ७).

**निष्कर्ष व अनुमान**

हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम सिंचनप्रकल्प ऑक्टोबर १९९८ पासून प्रलंबित असून प्रलंबनाची प्रमुख कारणे प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, पुनर्स्थापन व प्रकल्पबाधित शेतजमिनी आणि इतर मालमत्तांच्या मोबदल्यांशी निगडित आहेत. एकूणच प्रकल्पबाधितांचे भविष्य व जीवनमान आणि उदरनिर्वाहाचा प्रश्न उपस्थित झाल्यामुळे प्रकल्पाचे काम गेली वीस वर्षे प्रलंबित आहे. या विरोधामुळे प्रकल्पाची मौजे पारपोली, पारपोली गावठाण व मौजे खेडगे येथील प्रकल्पबाधितांनी सातत्याने आपला विरोध तर कामे जरी पूर्ण झाली असली तरी घळभरणीचे काम पूर्ण करून प्रकल्पात पाणी अडविणे बाकी असल्याने व सततच्या विलंबामुळे प्रकल्पाचा व्ययसुद्धा अनेकपटींनी वाढून ७०० कोटी रुपयांपेक्षा जास्त झाला आहे. मौजे पारपोली व पारपोली गावठाण येथील लोकवस्ती व जमिनी आणि मौजे खेडगे येथील शेतजमिनी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात जाऊन या सर्व बहुतांशी शेतकरी असलेल्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर असल्यामुळे या सर्व कुटुंबांचा प्रकल्पास विरोध असल्याचे कारण म्हणजे त्यांच्या मालमत्तेचा योग्य मोबदला व आदर्श पुनर्वसनाची मागणी असे आहे. सर्फनाला मध्यम प्रकल्प, ता. आजरा, जिल्हा कोल्हापूर हा हिरण्यकेशी नदीखोऱ्यातील पारपोली या गावानजीक बांधण्यात येत आहे. सदर प्रकल्पाचे बांधकाम ७५ टक्के पूर्ण झाले असून यामध्ये जलरोधीचराचे सर्व काम पूर्ण झाले आहे. तसेच भरावाचे काम पूर्ण झाले असून घळभरणीचे काम

प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी २६१.२३ हेक्टर खाजगी व १६.२२ हेक्टर सरकारी (देवस्थान जमीन) व रस्त्यासाठी खाजगी जमीन १.६१ हेक्टर व ६.५० हेक्टर वनजमीन असे एकूण २८५.५६ हेक्टर क्षेत्र लागणार आहे. सदर प्रकल्पात एकूण २२९ खातेदार प्रकल्पग्रस्त आहेत. त्यापैकी ११ प्रकल्पग्रस्तांनी स्वेच्छा पुनर्वसन घेतलेले आहे. एकूण २१८ प्रकल्पग्रस्तांना २०८ हेक्टर पर्यायी क्षेत्र देय आहे. सद्य:स्थितीत एकूण १५४.७०९ हेक्टर क्षेत्र जिल्हाधिकारी तथा उपसंचालक (पुनर्वसन) यांचे नावे असून खातेदारांना ९७.८०४ हेक्टर क्षेत्र वाटप झाले आहे. शिल्लक क्षेत्राच्या वाटपाची कार्यवाही महसूल विभागामार्फत प्रगतीत आहे. उर्वरित खातेदारांना ११६.६६६ हेक्टर जमिनीचे वाटप होणे बाकी आहे.

प्रकल्पामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील मौजे पारपोली, ता. आजरा व गावठाणवाडी, मौजे पारपोली, ता. आजरा पूर्णपणे बाधित होत असून एकूण प्रकल्पबाधित खातेदार २२९ आहेत. यासाठी अनुक्रमे १) देवर्डे व २) शेळप ही पुनर्वसित गावठाणे विकसित करण्यात येत आहेत. यामध्ये देवर्डे येथे १०५, तर शेळप येथे १२८ असे एकूण २३३ भूखंड विकसित केले आहेत. यामधील १४८ भूखंडांचे वाटप झाले आहे व उर्वरित ८५ भूखंड शिल्लक आहेत. प्रलंबित प्रकल्प सन १९९७-९८ मध्ये मंजूर झाला होता. २००२ मध्ये धरण पायाचे अवॉर्ड मंजूर झाले. वीस वर्षांहून अधिक काळ हा प्रकल्प शासनाकडून धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत आहे. यामुळे धरणग्रस्त कुटुंबांना मोठ्या प्रमाणात आर्थिक, सामाजिक व मानसिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. एकंदरीतच धरणग्रस्त त्रासलेल्या मन:स्थितीत असल्याचे आमच्या लक्षात आले. प्रकल्पग्रस्त कुटुंबांची पाहणी तसेच गटचर्चा केल्यानंतर त्यांच्या अडचणी समजून घेणे शक्य झाले. तसेच प्रकल्पग्रस्तांपैकी अनेक प्रतिनिधींनी लेखी स्वरूपात केलेल्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. या सर्व सूचनांमधून पुनर्वसन, पर्यायी जमिनी, वनसंपदेचे मूल्यांकन, निवासी पुनर्वसनाच्या समस्या इत्यादी विषयक अनेक अडचणी अद्यापही असल्याने प्रकल्पग्रस्तांच्या मनात असमाधानाची भावना असल्याचे निष्पन्न झाले. प्रकल्पग्रस्तांना दिला जाणारा मोबदला हा पर्यायी जमीन, घरासाठी भूखंड तसेच त्यांची मालमत्ता उदा. फळझाडे व वनसंपदा इत्यादींचे मूल्यांकन करून त्यांना देय असलेल्या मोबदल्या संदर्भात पुढील बाबी निदर्शनास आल्या. प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनार्थ वाटप करण्यासाठी लाभक्षेत्रात संपादित केलेल्या जमिनींपैकी ७० (सत्तर) हेक्टर जमीन अशी आहे की त्या जमिनीवर पीक लागवड करणे दुरापास्त आहे. कारण यापैकी अनेक जमिनी दगडखाणीच्या किंवा डोंगरउताराच्या असल्याने अशा जमिनींना संभाव्य लाभक्षेत्रातील बागायती जमीन म्हणून संबोधणे शक्य नाही. त्यामुळे अशा जमिनींची कृषी तज्ज्ञांमार्फत तपासणी करून पीक लागवड योग्यता निश्चितीनंतरच जमिनींचे प्रकल्पबाधित लाभार्थींना वाटप करण्याची आवश्यकता अधोरेखित करणे आवश्यक वाटते. प्रस्तुत प्रकल्पग्रस्तांच्या खाजगी वनसंपदेची हानी अपरिमित स्वरूपाची आहे. अशा वनसंपदेच्या बुडितामुळे वातावरण व जैविक हानीची मोजदाद जवळजवळ अशक्य आहे. परंतु हा विषय प्रस्तुत अहवालाच्या अभ्यासकक्षेत येत नाही याची आम्हास कल्पना आहे. प्रकल्पग्रस्तांच्या खाजगी वनसंपदेचे मूल्यांकन करताना गंभीर त्रुटी राहिल्या आहेत, हे मात्र ठामपणे नोंदविता येऊ शकते. अशा खाजगी वनसंपदेचे मूल्यांकन करताना वर्तमान बाजारमूल्य गृहित धरणे आवश्यक होते. परंतु तसे

मात्र करण्यात आलेले नाही. तसेच प्रस्तुत वनसंपदा (उदा. बांबू, मेसकाठी व फळझाडे) या शेतकऱ्यांना दरवर्षी उत्पन्न प्राप्त होण्याचा एक मार्ग होता. तो मात्र कायमस्वरूपी नष्ट होणार आहे. म्हणून या वनसंपदेचे प्रत्येकी (प्रकारानुसार) वर्तमान किमतीनुसार बाजार मूल्यांकन करून त्याच्या किमान चारपट रक्कम आदा करणे न्याय असेल.

जर प्रकल्पग्रस्तांकरिता लागवडी योग्य लाभक्षेत्रामध्ये संपादन करण्यास जमीन उपलब्ध नसेल तर भूसंपादन कायदा २०१३ च्या तरतुदीनुसार त्यांना मोबदला देण्यात यावा. परंतु १९९८ मधील प्रकल्प अधिसूचनेनंतर प्रकल्पबाधित क्षेत्रातील जमीन खरेदी विक्रीचे व्यवहार ठप्प असल्यामुळे जमिनींचे सद्य बाजारमूल्य मिळणे शक्य नाही. याकरिता प्रकल्प लाभक्षेत्र प्रकल्पबाधित क्षेत्राच्या पंचक्रोशीत असल्यामुळे प्रकल्पलाभ क्षेत्रातील जमिनींचे खरेदीविक्री व्यवहार दर तपासून त्या आधारे प्रकल्पबाधितांच्या जमिनींचे मूल्य बाजारमूल्याच्या चारपट निश्चित करून त्याप्रमाणे प्रकल्पबाधितांना रोख मोबदला आदा करता येऊ शकतो. हेच सूत्र स्वेच्छा पुनर्वसनास तयार असलेल्या प्रकल्पबाधितांचा जमीन मोबदला ठरविताना लागू करणे आवश्यक आहे. प्रकल्पबाधित कुटुंबांना सिंचन खात्यामार्फत १) देवर्डे व २) शेळप या ठिकाणी घरांकरिता भूखंड, रस्ते, सांडपाणी व्यवस्था, समाज मंदिर, शाळा, स्मशानभूमी, पिण्याच्या पाण्याची टाकी, इत्यादी सुविधा समितीच्या क्षेत्रभेटीत निदर्शनास आल्या आहेत. परंतु गायरानाची तरतूद मात्र केलेली नसल्याने त्याकामी विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे. प्रकल्पग्रस्तांना धरणाची सुरुवात करताना जे जमिनीचे संपादन केले त्यासाठी जुन्या कायद्याप्रमाणे एकरी रुपये ३५००० इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून आदा केली गेली. तथापि, प्रकल्पग्रस्तांना देऊ केलेली सदर नुकसान भरपाई निश्चितच अत्यल्प स्वरूपाची आहे. या संदर्भात उपरोल्लेख केल्याप्रमाणे जमीन नुकसान भरपाईची रक्कम ठरविणे आवश्यक आहे. प्रकल्पग्रस्तांचे रोजगार व उत्पन्न याबाबत गेली २० वर्षे मोठे नुकसान झाले आहे. त्याची भरपाई करण्यासाठी प्रत्येक कुटुंबांस सानुग्रह अनुदान देण्यात यावे. कारण ऑक्टोबर १९९८ मध्ये सर्फनाला प्रकल्पाची अधिसूचना निघाल्यानंतर प्रकल्पग्रस्त जमिनींवरील सुधारणा व शेतकरी खाजगी कृषि-गुंतवणुकीची प्रक्रिया कुंठित झाली. पर्यायाने बिगर कृषीरोजगाराचे मार्ग उपलब्ध होऊ शकले नाहीत किंवा प्रकल्पबाधित क्षेत्रातील शेतीचा विकास मार्गी लागणे अशक्य झाले. पर्यायाने गेली वीस वर्षे या सर्व प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले व बदलत्या आर्थिक स्थित्यंतरांद्वारे (१९९१ नंतर) निर्मित आर्थिक प्रगतीची संधी चुकली. त्यामुळे या सर्व शेतकऱ्यांचे गेली वीस वर्षे झालेले आर्थिक नुकसान लक्षात घेऊन पुनर्वसन नियोजन करताना पर्यायी जमिनी व रहिवासी संकुल जागा देण्याबरोबरच त्यांना अतिरिक्त आर्थिक मोबदला देणे सरकारची जबाबदारी बनते.

प्रकल्पबाधित कुटुंबातील सदस्यांना त्यांच्या शैक्षणिक कुवतीनुसार व्यवसाय प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य पुरवून स्वयंरोजगार निर्भर करणे अत्यावश्यक आहे. पारंपरिक ग्रामीण कृषी अर्थव्यवस्थेचा विचार केला तर शेतकऱ्यांच्या कृषी संलग्न व बिगर कृषीव्यवसायांकरिता तसेच गोठा, साठवणगृह, चारासाठवण व्यवस्था, कंपोस्ट खताकरिताची जागा इत्यादींकरिता प्रत्येक गावाची स्वत:ची गायरान जमीन असणे आवश्यक मानले जाते. नव्हे तशी परंपरागत व्यवस्था अस्तित्वात असल्याचा प्रत्येक गावाचा

इतिहास आहे सुद्धा. त्यामुळे प्रकल्पग्रस्त गावांची गायरान जमीन ही सरकारी मत्ता असल्याचे गृहित धरता कामा नये. तर गायरान जमिनीवरचा शेतकरी-गावकऱ्यांचा हक्क मान्य करणे आवश्यक आहे. त्यामुळे निवासी पुनर्वसनाच्या ठिकाणी (अनुक्रमे मौजे शेळप व देवर्डे) गायरान जमिनीची व्यवस्था करणे हे निवासी पुनर्वसनाचे आद्य उद्दिष्ट असावे. निवासी पुनर्वसन करताना महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारच्या सन १९१३ च्या भूमिअधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायद्यातील तरतुदीप्रमाणे देऊ केलेल्या २५ (पंचवीस) सुविधांऐवजी सन १९९८च्या कायद्याप्रमाणे देय १८ (अठरा) सुविधा मान्य केल्या आहेत. प्रत्यक्ष निवासी पुनर्वसनाचा तपशील पाहता यापैकी ही काही सुविधा देऊ केलेल्या नाहीत. याचे कारण असे सांगितले गेले की, तत्सम सुविधा जवळच्या गावात उपलब्ध आहेत. परंतु निश्चितच सुविधा न देण्याचे असे कारण संयुक्तिक नाही. तसेच धर्मनिरपेक्ष व्यवस्थेचे उदाहरण देऊन पुनर्वसित गावात मंदिर किंवा तत्सम व्यवस्था देणे नाकारले जाते. तसा नकार प्रस्तुत प्रकल्पासंदर्भातही दिसून येतो. परंतु प्रकल्पबाधितांच्या जमिनी व घरांसहित त्यांची धार्मिक स्थळेही प्रकल्पबाधित झाल्याने प्रकल्पबाधितांना एक प्रकारे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक समूळोच्चाटनाचा (Cultural Genoicide) सामना करावा लागतो. म्हणून त्यांच्या सांस्कृतिक व धार्मिक पुनर्वसनाचाही विचार होणे आवश्यक आहेच व यात शंका नसावी. याकरिता सरकारी अधिकाऱ्यांनी कर्नाटकातील पुनर्वसित रामनगर येथे भेट देऊन 'आदर्श पुनर्वसनाचे' आकलन करून घेणे आवश्यक आहे.

**ताजा कलम (Posts Script)**

नवीन आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीनंतर देशात अनेक खाजगी व सार्वजनिक प्रकल्प हाती घेऊन विकास प्रक्रिया गतिशील करण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्याचा एकंदरीत परिणाम देशाच्या विकास/वृद्धिदरावर दिसून आला. परिणामे खुल्या व्यापार धोरणाच्या अंमलबजावणीच्या पहिल्या टप्प्यात औद्योगिक व एकंदरीतच विकासदर झपाट्याने वाढला. या सर्व प्रक्रियांना गती देताना जे अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले. (उदा. विशेष आर्थिक क्षेत्रे, औद्योगिक महामंडळांचा विस्तार, बहुउद्देशीय सिंचन/जलप्रकल्प, बहुपदरी महामार्ग, शहर व निवासी परिसर विस्तार इत्यादी) अशा सर्व प्रकल्पांकरिता विविध राज्यांत हजारो हेक्टर शेतजमिनींचे संपादन करण्यात आले. परंतु जमीन संपादन करताना संबंधित शेतकऱ्यांच्या रोजगार पुनर्वसनाकडे दुर्लक्ष झाल्याने देशात आर्थिक दरी निर्माण होऊन ती सतत वाढत असल्याचे गेल्या अडीच दशकांच्या (२५ वर्षे) काळात निष्पन्न झाले. परिणामे शेतकरी वर्गाने कधी संघटित तर अनेकदा असंघटित स्वरूपाचे लढे उभारले. प्रामुख्याने हे लढे आर्थिक व निवासी पुनर्वसन आणि भूसंपादन मोबदला इत्यादी संदर्भात असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील तीन लक्ष कोटी रुपये गुंतवणुकीचा तेल शुद्धीकरण प्रकल्पाविरोधात तेथील शेतकऱ्यांनी उभारलेले लढे याची ज्वलंत उदाहरणे आहेत. प्रस्तुत प्रकल्पविरोधामुळे महाराष्ट्र शासनाने भूसंपादन मोबदल्याविषयीचे बाजारमूल्याच्या चारपट मूल्य धोरण बदलून समृद्धी महामार्ग विस्थापित जमीन मालक शेतकऱ्यांना प्रतिएकर किमान एक कोटी रुपये (१ कोटी) मोबदला देण्याची तयारी दर्शविली. नाणार तेल शुद्धीकरण प्रकल्पाबाबतही राज्य शासनाने असेच धोरण स्वीकारण्याची तयारी दर्शविली असल्याचे दिसून आले. नाणार प्रकल्प मार्गी लावण्यासाठी राज्य शासनाने सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल तयार

करण्याचे काम गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे यांचेकडे सोपविले होते. उपरोल्लेखित प्रकल्प अथवा प्रकल्पबाधित शेतजमीन मूल्यांकनाविषयी राज्यसरकारने घेतलेल्या भूमिकेकडे अंगुलीनिर्देश करता असे निष्पन्न होते की, ज्याठिकाणी प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचा विरोध तीव्र आहे अशा ठिकाणी राज्यसरकार जमीन मूल्याचा पुनर्विचार करून शेतकऱ्यांचा विरोध होणार नाही, अशा प्रकारचे मूल्य निर्धारण करते असे दिसून येते. या सर्व बाबींचा व प्रस्तुत अभ्यासगटाने प्रत्यक्ष क्षेत्र भेटीतून अवलोकन केलेल्या बाबींवरून प्रकल्पनिहाय मोबदला, जमीन मूल्यांकन, कमाल जमीन धोरण इत्यादी भिन्न असल्याचे स्पष्ट होते.

परिणामे, महाराष्ट्रातील जलसिंचन प्रकल्प भूसंपादन व जमीन मूल्यांकनाविषयी ही राज्यसरकारने मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाप्रमाणे धोरण अंगिकारण्यास हरकत नसावी. तसेच जमीन मूल्यांकन धोरण जलसिंचन खाते भूमिअधिग्रहणार्थ लागू करून प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्यास (एकरी एक कोटी रुपये) हरकत नसावी. याच्या पुष्ट्यर्थ असा युक्तिवाद असू शकतो की, स्वेच्छा पुनर्वसन घेणाऱ्या शेतकऱ्यांचे उदरनिर्वाह व रोजगाराचे साधन कायमस्वरूपी संपुष्टात येते. तसेच ज्या प्रकल्पबाधितांना प्रकल्प लाभक्षेत्रात पर्यायी जमिनी देऊ केल्या जातात. त्यांनाही अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, असे प्रस्तुत अभ्यास गटास कटाक्षाने केलेल्या क्षेत्रभेटींवरून निदर्शनास आले आहे.

सारांशात; मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाकरिता राज्य शासनाने अवलंबिलेल्या अथवा प्रस्तावित नाणार तेल शुद्धीकरण प्रकल्पाकरिता अवलंबू इच्छित असलेल्या प्रकल्पबाधित जमीन मूल्यांकनाचे 'एक कोटी रुपये प्रतिएकर' मूल्याचे धोरण राज्यातील सिंचन प्रकल्पांकरिता व प्रकर्षाने प्रस्तुत सर्फनाला प्रकल्पाकरिता अवलंबिले तर ते राज्यातील विविध/सर्व प्रकारच्या प्रकल्पबाधितांकरिता समान पुनर्वसन मूल्याचे व न्याय्य पुनर्वसनाचे धोरण असेल. अन्यथा, विविध प्रकल्पबाधित जमिनींकरिता विविध मूल्य धोरण प्रकल्पग्रस्तांच्या मनात भेदभावाची भावना निर्माण करणारे व पर्यायाने निम्नमूल्य प्रकल्पबाधितांकरिता अन्यायकारक ठरेल.

**संदर्भ ग्रंथ सूची**


1. A Narayanmoorthy (2013), Diagnosing Maharashtra'a Water Crisis, Economic and Political Weekly, Oct. 12, 2013, Vol. VLVIII, No. XXXXI, PP. 23.
2. Govt. of India (2012), Comptroller and Accountant General of India.
3. Govt. of Maharashtra (1999), Maharashtra Irrigation Commission.
4. Govt. of Maharashtra (2013), Vijay Kelkar, Chairman, Report of the High Level Committee on Balanced Regional Development Issues in Maharashtra, GoM, Plannind Department, Oct. 2013.
5. Ramaswami Iyer (2007), Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, July 28, 2007, PP. 3103.
6. Walter Fernandez (2004), Rehabilitation Policy for the Displaced, Economic and Political Weekly, March 20, 2004, PP. 1191.


◆

# स्थानिक व स्थलांतरित संघर्षाचे सैद्धांतिक विश्लेषण

**अविनाश कुलकर्णी** †

**प्रस्तावना**

शिक्षण, रोजगार, सुरक्षितता यांसारख्या वेगवेगळ्या कारणांसाठी अगदी प्राचीन काळापासून २१व्या शतकातही मानवी स्थलांतर होत असल्याचे आढळून येते. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या काळात स्थानिक आणि स्थलांतरित झालेल्या लोकांमध्ये संघर्ष झाल्याचेही इतिहात सांगतो. त्यामागची कारणे मात्र काळानुरूप वेगवेगळी असल्याचे आढळून येते. परंतु लोकसंख्या आणि त्यात होणारे बदल यांचा अभ्यास करताना लोकसंख्येच्या रचनेवर परिणाम करणाऱ्या स्थलांतर ह्या महत्त्वपूर्ण घटकाचा काळानुरूप अभ्यास करणे अधिक उपयुक्त ठरते. त्या दृष्टिकोनातून या शोधनिबंधाचे विवेचन आणि विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्ट्य व आवश्यकता**

रोजगारासाठी परराज्यातून महाराष्ट्रातील मुंबई, पुणे यांसारख्या शहरांमध्ये स्थलांतरित झालेले लोक आणि स्थानिक यांच्यामध्ये संघर्ष झाल्याचे आपणास आढळून आले आहे. त्याचप्रमाणे गुजरात राज्यातही असा संघर्ष झाल्याचे वृत्तवाहिन्यांद्वारे प्रसारित करण्यात आले होते. असा संघर्ष फक्त भारतातील काही विशिष्ट शहरांमध्येच होत असल्याचे आढळून येत असले तरी जगातील अनेक भागातही असा संघर्ष होत आहे. परंतु त्यामागची कारणे अथवा पार्श्वभूमी महत्त्वाची आहे. अशी पार्श्वभूमी स्पष्ट करणे अर्थात या संघर्षामागील सैद्धांतिक विश्लेषण करण्याच्या उद्दिष्टाने हा शोधनिबंध महत्त्वपूर्ण ठरतो.

**समस्या सूत्रण**

गुजरात राज्यात एका अल्पवयीन मुलीच्यासंदर्भात घडलेल्या घटनेनंतर तेथे परराज्यातील विशेषत: उत्तरप्रदेश, बिहार यांसारख्या राज्यातून स्थलांतरित झालेल्या लोकांना गुजरात सोडण्यासाठी भाग पाडण्यात आले होते. तत्पूर्वी महाराष्ट्रातील मुंबई व इतर शहरांतूनही उत्तर भारतीय लोकांना वेगवेगळ्या घटनांवरून अशा संघर्षास सामोरे जावे लागले होते. स्थानिक व स्थलांतरित यांच्यातील संघर्षाची तत्कालीन कारणे वेगवेगळी असल्याचे आपणास प्रथम दर्शनी आढळून येते. परंतु त्याची ठोस पार्श्वभूमी, कारणे व परिणाम यांचे विश्लेषण करणे महत्त्वाचे आहे.

**व्याप्ती व मर्यादा**

हा शोधनिबंध दुय्यम संदर्भ साधनांवर आधारित आहे. यामध्ये प्रामुख्याने वृत्तपत्र आणि वृत्त वाहिन्यांवरील वृत्त यांचा संदर्भ आहे. यामध्ये कोणत्याही एका संघर्षाची विशिष्ट घटना अभ्यासण्यात आली

†पुणे, आजीव सभासद क्र. : १५२५ , भ्रमणध्वनी : ९८२२२०३१८७ , ई-मेल : dravikul@gmail.com

नसून विविध घटनांच्या संदर्भात स्थलांतर आणि लोकसंख्याशास्त्रातील सैद्धांतिक पार्श्वभूमी तपासून त्याची संघर्षाच्या संदर्भात सांगड घालण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**सैद्धांतिक व संकल्पनात्मक पार्श्वभूमी**

ह्यामध्ये प्रामुख्याने स्थलांतराचे नियम, माल्थस यांचे लोकसंख्याशास्त्रातील सैद्धांतिक विचार आणि नव-माल्थसवादी लोकसंख्या लाभांश यांसारख्या संकल्पनांचे स्थानिक आणि स्थलांतरित यांच्यातील संघर्षाच्या संदर्भात विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

सामान्यत: स्थलांतर ही एक मानवी घटना आहे. यामध्ये व्यक्ती एका विशिष्ट भूप्रदेशातून दुसऱ्या भूप्रदेशात कायमचे किंवा बराच काळासाठी वास्तव्य करतो. हे स्थलांतर कधी देशांतर्गत असते तर कधी आंतरराष्ट्रीय असते. तसेच ते ग्रामीण-शहरी असते, तर कधी नागरी-नागरी अशा स्वरूपाचे असते. स्थलांतर या मानवी प्रक्रियेचा अर्थ व व्याख्या पुढीलप्रमाणे.

केनेथ कोमेथर यांच्या मतानुसार, एका विशिष्ट भौगोलिक किंवा राजकीय विभागातून दुसऱ्या भौगोलिक किंवा राजकीय विभागात दीर्घकालीन किंवा अल्पकालीन वास्तव्य करण्याच्या उद्देशाने केल्या जाणाऱ्या मानवी हालचालीस स्थलांतर असे म्हणतात.

डेव्हिड हीर यांच्या मतानुसार, व्यक्तीचे आपल्या मूळ निवास स्थानापासून दूर होणे म्हणजे स्थलांतर होय.

डॉ. एस.सी. दुबे यांच्या मतानुसार, स्थलांतर ही एक सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे की ज्याद्वारे लाकसंख्येची वृद्धी किंवा घट होऊ शकते.

लोकसंख्याशास्त्रानुसार, विशिष्ट कालावधीत एका भौगोलिक भागातील अथवा प्रदेशातील निवास किंवा वास्तव्य सोडून त्या ठिकाणा व्यतिरिक्त इतर ठिकाणी किंवा प्रदेशामधे वास्तव्यासाठी केलेले निर्गमन किंवा आगमन म्हणजे स्थलांतर होय.

थोडक्यात, स्थलांतर म्हणजे मानवी समूहाचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी होणारे आगमन अथवा निर्गमन होय.

**सैद्धांतिक विवेचन व विश्लेषण**

रॅव्हेन्स्टाईन या समाजशास्त्रीय विचारवंतांनी त्यांच्या Journal of the Royal Stastical Society या प्रबंधिकेत स्थलांतरविषयक नियमांची मांडणी केली आहे. हे नियम मांडताना त्यांनी ग्रेट ब्रिटन आणि इतर युरोपियन देशांचा अभ्यास केला होता. त्यांनी मांडलेल्या विविध नियमांपैकी पुढील दोन नियम या शोधनिबंधातील विषयाच्या अनुषंगाने अधिक महत्त्वपूर्ण वाटतात.

(१) तंत्रज्ञानातील प्रगतीची पातळी उंचावली की स्थलांतर वाढू लागते.

(२) स्थलांतराला कारणीभूत ठरणाऱ्या सर्व घटकांमध्ये आर्थिक घटक सर्वाधिक प्रभावी घटक आहे. तंत्रज्ञानातील प्रगती, नोकरी-व्यवसाय, शिक्षण, प्रशासन यासर्व घटकांचे प्रचलन शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर असते. त्यामुळे शहरांमध्ये रोजगाराच्या संधीही ग्रामीण भागापेक्षा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत असतात. त्याचा परिणाम म्हणून ग्रामीण लोकसंख्येचे नागरी क्षेत्राकडे स्थलांतर झपाट्याने होऊ लागते. परंतु स्थलांतराच्या प्रक्रियेवर इतरही अनेक घटक परिणाम करत असतात.

**स्थलांतराचा आंतरराष्ट्रीय कल**

आंतरराष्ट्रीय स्थलांतरित दिवसाच्या निमित्ताने संयुक्त राष्ट्रसंघाने (UN DESA) प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, सन २००० सालापासून जगातील स्थलांतरामध्ये ४९ टक्के इतकी वाढ झाली आहे. सन २०१७ च्या आंतरराष्ट्रीय स्थलांतर अहवालात (The International Migration Report 2017) जगात ३.४ टक्के लोक आंतरराष्ट्रीय स्थलांतरित आहेत. उच्च उत्पन्न देशांमधे सन २००० साली ९.६% लोकसंख्या

स्थलांतरित होती, ती सन २०१७ मध्ये १४% इतकी वाढली आहे. तसेच या अहवाल वर्षात २/३ आंतरराष्ट्रीय स्थलांतरित हे फक्त २० देशांत राहात होते आणि एकूण आंतरराष्ट्रीय स्थलांतरितांपैकी निम्मे लोक दहा देशांत वास्तव्य करीत होते. सर्वात अधिक आंतरराष्ट्रीय स्थलांतरित लोक हे उत्तर अमेरिकेत (US) होते (जगातील एकूण स्थलांतरितांपैकी ४९.८ दशलक्ष किंवा १९%). तर सौदी अरेबिया, जर्मनी आणि रशियन संघ यांचा याबाबतीत दुसरा क्रमांक लागतो. त्यानंतर स्थलांतरितांपैकी युकेमध्ये (UK) जवळपास ९ दशलक्ष लोक राहतात. सन २०१७ मध्ये आंतरराष्ट्रीय स्थलांतरितांपैकी सर्वाधिक स्थलांतरित आशिया आणि युरोप (अनुक्रमे १०६ दशलक्ष व ६१ दशलक्ष) या प्रदेशातील मूळ निवासी होते. तर त्यापाठोपाठ दक्षिण अमेरिका व कॅरेबियन (३८ दशलक्ष आणि अफ्रिका ३६ दशलक्ष) येथील मूळ निवासी होते.

जागतिक पातळी आणि देश पातळीवरील स्थलांतराचा एकूण कल पाहता रॅव्हेन्स्टाईन यांनी मांडलेल्या वरील नियमांची प्रचिती येते. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे अविकसित/विकसनशील राष्ट्रातील तंत्रज्ञानातील कुशल कामगार अमेरिका व युरोपातील अनेक प्रगत देशांमध्ये स्थलांतरित झालेले आढळून येतात. यामध्ये प्रामुख्याने भारतासारख्या विकसनशील देशातील कुशल तंत्रज्ञ स्थलांतरित झाल्यामुळे भारतात बुद्धिवहन (Brain Drain) झाल्याचे म्हटले जाते. तर तंत्रज्ञानातील प्रगत राष्ट्रांनी या बुद्धिवहनाचा फायदा (Brain Drain Gain ) करून घेतला आहे.

रॅव्हेन्स्टाईन यांनी मांडलेल्या स्थलांतराच्या नियमांचा संबंध लोकसंख्याविषयक सिद्धांताशी असल्याचेही आढळून येते. म्हणूनच लोकसंख्याशास्त्र किंवा लोकसंख्या शिक्षणामध्ये स्थलांतराचाही अभ्यास केला जातो. अभिमत विचारवंत थॉमस रॉबर्ट माल्थस यांनी इ.स. १७९८ मध्ये मांडलेल्या लोकसंख्यावाढीच्या सिद्धांतानुसार, 'निर्वाह साधनांच्या तुलनेने वेगाने होणारी लोकसंख्यावाढ हे दारिद्र्याचे कारण असून मानवी प्रगतीला त्यामुळे अडथळा निर्माण झालेला आहे.' परिणामी, आर्थिक घटकांच्या प्रभावाने स्थलांतर घडून येत असल्याचे दिसून येते. उदा. उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, प. बंगाल इ. राज्यांतून लोकांचे उदरनिर्वाहासाठी स्थलांतर होत आहे. दुसऱ्या बाजूस नव-माल्थसवादी विचारसरणी वाढत्या लोकसंख्येतील उत्पादक लोकसंख्या गृहित धरून लोकसंख्या लाभांशाची मांडणी करते आहे. या लोकसंख्या लाभांशामधे चांगले आरोग्य, गुणवत्तापूर्ण शिक्षण, आणि कौशल्यानुरूप रोजगार (Decent Employment) याबाबीसुद्धा गृहित धरणे आवश्यक आहे.

माल्थस आणि रॅव्हेन्स्टाईन यांच्या सैद्धांतिक विचाराचे प्रतिबिंब जागतिक लोकसंख्यावाढ आणि स्थलांतरामध्ये उमटत असल्याचे दिसून येते. भारतही या सैद्धांतिक विचारांना अपवाद नाही. २०११ च्या जनगणनेनुसार भारताच्या लोकसंख्यावाढीचा दर घटल्यामुळे भारत आता लोकसंख्या संक्रमण सिद्धांताच्या तिसऱ्या अवस्थेकडे वाटचाल करत असल्याचे म्हटले जात आहे. परंतु भारताच्या लोकसंख्यावाढीमध्ये विविधता दिसून येते, लोकसंख्यावाढीमध्ये उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान व मध्यप्रदेशातील लोकसंख्यावाढीचा दर अधिक असल्याचे दिसून येते. कारण या प्रदेशातील २०१२ सालचा जन्मदर अनुक्रमे ३.३, ३.५, २.९ व २.९ इतका असल्याचे दिसून येते.

माल्थस यांचे सैद्धांतिक विचार आणि स्थलांतराच्या नियमांचा विचार करता असे आढळून येते की, भारतामध्ये २००१ च्या जनगणनेनुसार एकूण ३१४ दशलक्ष लोक स्थलांतरित आहेत. त्यापैकी २६८ दशलक्ष लोक हे राज्यांतर्गत स्थलांतरित आहेत . देशात आर्थिक वा औद्योगिक प्रगतीच्या बाबतीत महाराष्ट्र

राज्य अग्रेसर आहे. त्यापाठोपाठ गुजरातचा क्रम आहे. त्यामुळे देशांतर्गत स्थलांतरचा कलही तंत्रज्ञानातील प्रगती आणि निर्वाह साधने या स्थलांतराच्या नियमांप्रमाणेच दिसून येतो. देशात २.३ दशलक्ष स्थलांतरितांसह महाराष्ट्र राज्याचा अव्वल क्रमांक आहे, तर त्यापाठोपाठ दिल्ली (१.७ दशलक्ष), गुजरात (०.६८ दशलक्ष) आणि हरियाणा (०.६७ दशलक्ष) यांचा क्रम आहे. तर राज्याबाहेर स्थलांतरित झालेले सर्वाधिक लोक उत्तर प्रदेश (२.६ दशलक्ष) आणि बिहार (१.७ दशलक्ष) येथील आहेत. तसेच जागतिक पातळीवरील स्थलांतर विचार करता असे आढळून येते की, जगामध्ये सर्वाधिक भारतामध्ये जन्मलेल्या व्यक्ती देशाबाहेर वास्तव्यास आहेत. २०१७ मध्ये भारतात जन्मलेले १७ दशलक्ष लोक देशाबाहेर राहात होते. आंतरराष्ट्रीय स्थलांतरामध्ये भारतानंतर मेक्सिको (१३ दशलक्ष) या देशाचा क्रम आहे.

लोकसंख्यावाढ आणि स्थलांतराचा हा कल पाहता लोकसंख्यावाढ आणि स्थलांतर यातील सैद्धांतिक विचारांमध्ये परस्परसंबंध असल्याचे दिसून येते. परंतु २१व्या शतकाच्या पूर्वार्धात जागतिक पातळीवर असणारी आर्थिक अस्थिरता आणि त्यातून निर्माण झालेली बेरोजगारीची समस्या ही स्थलांतराच्या प्रक्रियेवर परिणामकारक ठरत असल्याचेही आता दिसून येऊ लागले आहे. जागतिक पातळीवर आणि देशांतर्गतही स्थलांतरित आणि स्थानिक अशी विचारसरणी जोर धरू लागली आहे. त्यामुळे या घटकांमध्ये संघर्षही निर्माण होऊ लागले आहेत. उदा. 'अमेरिकेला मेक्सिकन, आफ्रिकी तसेच भारतीय स्थलांतरित नको आहेत. इंग्लंडला पोलिश मजुरांनी ग्रासले आहे. इतर युरोपीय देशांना पश्चिम आशियाई देशातील स्थलांतरित नको आहेत. वीजाची मुदत संपलेले अमेरिकेने परत पाठविलेले स्वदेशातीलच नागरिक पाकिस्तानला नको आहेत. तर भारताला बांगलादेशी स्थलांतरित व रोहिंग्या शरणार्थी नको आहेत.' जागतिक पातळीवरची आर्थिक अस्थिरता आणि बेरोजगारीच्या समस्येची हीच स्थिती भारतामध्ये राज्यांतर्गतही दिसून येते आहे. त्यातून स्थलांतरित आणि स्थानिक यांच्यामध्ये संघर्ष घडून येत असल्याचे आढळून येते. आज महाराष्ट्रात विशेषतः मुंबईला उत्तर भारतीय नको आहेत, तर आता महाराष्ट्रापाठोपाठ गुजरातही त्याच दिशेने जात आहे. त्यातूनच महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये उत्तर भारतीय स्थलांतरित आणि स्थानिक यांच्यामधील संघर्ष तीव्र होऊ लागला आहे. वरील नव-माल्थसवादी लोकसंख्या लाभांश विचारसरणीचा कानोसा घेताना असे दिसून येते की, स्थलांतरामुळे नागरीकरण, प्रदूषण यांसारख्या समस्यांनी गंभीर रूप धारण केले आहे. त्यामुळे चांगले आरोग्य, आणि कौशल्यानुरूप रोजगार हे प्रश्नही गंभीर बनले आहेत. अनेक उच्चशिक्षित तरुण अगदी अभियांत्रिकेचे शिक्षण घेतलेले तरुण अकुशल किंवा अर्धकुशल रोजगाराकडे वळलेले दिसून येत आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतातील अनेक तरुण सुरुवातीच्या काळात शॉपिंग मॉल, रेस्टॉरंटमध्ये काम करतात तर काहीजण ड्रायव्हर म्हणूनही रोजगारात आहेत. हीच परिस्थिती भारतातील मुंबई, पुण्यासारख्या शहरांमध्ये आहे. उदा. मूळचा लातूर जिल्ह्यातील रहिवासी असलेला अजित केरूरे हा तरुण मेकॅनिकल इंजिनिअर आहे. चांगली नोकरी मिळत नसल्यामुळे त्याने पुण्यातील सदाशिव पेठेत 'कडक चहा'चे दुकान थाटले आहे. अजित केरूरे प्रमाणेच विविध क्षेत्रांतील कौशल्य व शिक्षण प्राप्त केलेले अनेक तरुण अकुशल व अर्धकुशल रोजगारात गुंतले आहेत. कोणी कॅब ड्रायव्हर, कोणी कुरिअर, तर कुणी हॉटेलमधील 'फूड टू होम'मधील डिलेव्हरीच्या कामात गुंतलेले आहे. मग यास नव-माल्थसवादी लोकसंख्या लाभांश विचारांमधील Decent Employment म्हणावयाचे काय? संसदेच्या

सभागृहातही देशातील तरुणांनी पकोडे विकले तर गैर काय? म्हणून त्याचे समर्थन केले जाते. हाच तो लोकसंख्या लाभांश आहे काय? शासकीय, निमशासकीय आणि खासगी क्षेत्रातील कंत्राटी कामगारांचे वर्षांनुवर्षे १० ते १५ हजार रुपयांच्या वेतनावर शोषण सुरू आहे. त्यांना मिळणाऱ्या अत्यल्प भविष्यनिर्वाह निधीच्या सुविधेतून भविष्यात शिधापत्रिकेवरील धान्यसुद्धा विकत मिळेल की नाही अशी शक्यता आहे. अशाप्रकारच्या कंत्राटी रोजगारास Decent Employment समजावयाचे काय? थोडक्यात काय तर लोकसंख्या वाढ ही समस्या मानावयाचे की उत्पादक लोकसंख्या वाढते म्हणून लोकसंख्या लाभांश गृहित धरावयाचा? याचे सैद्धांतिक विश्लेषण करताना लोकसंख्या वाढीची सांगड निर्वाह साधनांच्या उपलब्धतेशी घातली जात नसल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. बेरोजगारीच्या समस्येवर ज्या तत्परतेने आपण सर्वजण गांभीर्याने विचार करतो त्याच तत्परतेने मात्र लोकसंख्यावाढीवर गांभीर्याने विचार करताना दिसून येत नाही.

**निष्कर्ष व सूचना**

स्थलांतरित लोकांमुळे स्थानिक कुशल, अर्धकुशल व अकुशल लोकांच्या रोजगारावर परिणाम झाला आहे. त्यातून क्षुल्लक घटनासुद्धा स्थानिक व स्थलांतरित यांच्यामधील संघर्षास कारणीभूत ठरत आहे. या अध्ययनातून रोजगार निर्मितीबाबत निष्कर्ष मांडावयाचा झाल्यास निर्वाह साधनांच्या पर्याप्त उपलब्धतेशिवाय लोकसंख्यावाढ ही लोकसंख्या लाभांश नसून छुपी बेरोजगारीच आहे, असे निदर्शनास येते. १९९०च्या दशकापर्यंत बँकींग क्षेत्रामध्ये प्रत्यक्षात न कमविलेला नफा ज्यास अनुत्पादक मालमत्ता असे म्हटले जाते, असा नफा ताळेबंदास दाखवून प्रत्यक्षात लाभांशाचे वाटप केले गेले आणि अनेक बँका व वित्तसंस्था बंद पडल्या. त्याचप्रमाणे लोकसंख्याशास्त्रातील अभ्यासातही प्रत्यक्षात न कमविलेल्या (अनुत्पादक) लोकसंख्या लाभांशाचे समर्थन करणे घातक ठरू शकते. वाढती लोकसंख्या उत्पादक गटातील असूनही कौशल्यानुरूप रोजगाराशिवाय अनुत्पादक ठरू शकते. त्यामुळे भारतातील सर्वच राजकीय पक्षांनी मतभेद दूर ठेवून लोकसंख्या नियंत्रण कायदा करून त्याची नि:पक्षपातीपणे अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक आहे. आभासी लोकसंख्या लाभांशाच्या प्राप्तीसाठी लोकसंख्या वाढीचे समर्थन करणे भारताच्या विकासातील अडथळा ठरू शकते.

वरील विवेचन आणि विश्लेषणातून असे निदर्शनास येते की, नव-माल्थसवादी विचारवंत लोकसंख्या लाभांशाची मांडणी करताना दिसत असले तरी लोकसंख्या लाभांशामधील विचारसरणीत अभिप्रेत असणारे चांगले आरोग्य, गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्यानुरूप रोजगार (Decent Employment) याबाबींवरील वाढत्या लोकसंख्येचा ताण गांभीर्याने घेणे गरजेचे आहे. स्थलांतरामुळे वाढते नागरीकरण आणि नागरीकरणाच्या समस्या यांचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. त्यामुळेच स्थानिक आणि स्थलांतरित यांच्यातील संघर्ष व त्याची लोकसंख्यात्मक पार्श्वभूमी हा माल्थस आणि नव-माल्थसवादी विचार मांडणीतील संघर्ष आहे असे म्हणण्यास वाव आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१) नागरी समाजशास्त्र, भाग-१, प्रकाशक - कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, सप्टेंबर २००१.

२) भारताची जनगणना २०११.

३) http://censusindia.gov.in.

४) http://www.un.org/development/desa/publications/international-migration-report-2017.

५) The International Migration Report 2017.


◆

# महाराष्ट्रातील शालेय आरोग्य कार्यक्रमाचा आढावा

**तृप्ती कवाळे** †

**प्रस्तावना**

'आरोग्याचे अर्थशास्त्र' ही अर्थशास्त्र या विषयाची नूतन व महत्त्वाची शाखा असून अलीकडील काळात या शाखेला अत्यंत महत्त्व प्राप्त झालेले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे जनतेच्या निरोगी आरोग्याचा राष्ट्राच्या प्रगतीवर सकारात्मक परिणाम होतो. केवळ राष्ट्राच्याच नव्हे तर वैयक्तिक व सामाजिक प्रगतीत आरोग्य महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत असते. म्हणूनच मानव विकास निर्देशांक तयार करताना 'आरोग्य' या महत्त्वपूर्ण प्राचलाचा समावेश केला जातो. विकसित व विकसनशील राष्ट्रांमधील मानवी निर्देशांकात फरक असण्याचे मुख्य कारण म्हणजे या राष्ट्रांमध्ये असणारी शैक्षणिक आणि आरोग्यविषयक स्थितीतील तफावत हे होय. देशातील जनतेचे आरोग्य सुदृढ ठेवायचे असेल तर आरोग्याच्या चांगल्या सवयी बालपणापासूनच असाव्या लागतात. त्याचप्रमाणे नियमित आरोग्य तपासणी केल्यास वेळीच आजारांवर नियंत्रण ठेवता येते. बालकांना विविध आजारांचा संसर्ग होण्याची संभावना अधिक असते. त्यामुळे बालकांची नियमित आरोग्य तपासणी केल्यास त्यांना झालेल्या आजारांवर उपचार करून त्यांना आरोग्य शिक्षण दिल्यास देशाची भावी पिढी निरोगी होईल. यासाठी केंद्र शासनाने २००८ मध्ये शालेय आरोग्य कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली. प्रस्तुत लेखामध्ये महाराष्ट्रातील शालेय आरोग्य कार्यक्रमाचा आढावा घेणे आणि आरोग्यविकासात शालेय आरोग्य कार्यक्रमाची भूमिका तपासणे ही दोन मुख्य उद्दिष्टे असून हा अभ्यास पूर्णपणे दुय्यम सांख्यिकीय माहितीवर आधारित आहे.

**आरोग्याचे आर्थिक विकासातील महत्त्व**

कोणत्याही अर्थव्यवस्थेचा विकास हा जनतेच्या आरोग्यावर अवलंबून असतो. देशातील जनतेचे आरोग्य निरोगी असल्यास ते अधिक कार्यक्षमपणे काम करू शकतात, त्यामुळे उत्पादकता वाढून त्यांच्या वैयक्तिक उत्पन्नात व राष्ट्रीय उत्पादनात व पर्यायाने राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येते. या वाढीव उत्पन्नामुळे व्यक्ती, कुटुंब व समाज शिक्षण, राहणीमान, पोषक आहार, चांगल्या वैद्यकीय सुविधांवर अधिकाधिक खर्च करू शकते. चांगल्या आरोग्यामुळे व्यक्तींच्या शैक्षणिक प्रगतीत सकारात्मक बदल घडून येतात की, ज्याचा परिणाम पुन्हा उत्पन्न वाढीवर होताना दिसून येतो. हे चक्र असेच चालू राहते आणि राष्ट्राचा विकास होतो. म्हणूनच आरोग्य व आर्थिक विकास यांच्यामध्ये सकारात्मक

† संशोधक विद्यार्थीनी, अर्थशास्त्र विभाग, एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ, कर्वे पथ, पुणे - ४११०३८.
आजीव सभासद क्र. : १३५९, भ्रमणध्वनी : ९६९९९४४७७१, ई-मेल : trupti6009gmail.com

सहसंबंध आहे असे म्हटले जाते. बार्लो, रॉबर्ट फाजेल, ब्लूम, कॅनिंग व सेविल्ला यांनी हा सहसंबंध आपापल्या प्रतिमानांमधून नमूद केला आहे.

**महाराष्ट्रातील आरोग्याची सद्यस्थिती**

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. गेल्या ५९ वर्षांमध्ये राज्यातील आरोग्य स्थितीचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. याकरिता भारतातील विविध राज्यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास आपणास राज्यांची स्थिती समजण्यास मदत होते. तक्ता क्र. १ मध्ये भारतातील निवडक राज्यांतील तुलनात्मक आरोग्य स्थिती दर्शविली आहे.

तक्ता क्र. १ नुसार, मानव विकास निर्देशांकाच्या

**तक्ता क्र. १ : भारतातील निवडक राज्यांतील तुलनात्मक आरोग्य स्थिती**

| अ. क्र. | निकष | वर्ष | राज्य | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | केरळ | दिल्ली | महाराष्ट्र | छत्तीसगड |
| १ | मानव विकास निर्देशांक गुणानुक्रमांक | २०१२ | १ | २ | ७ | २३ |
| २ | साक्षरता (टक्केवारी) | २०११ | ९३.९१ | ८६.३ | ८२.९१ | ७१.०४ |
| ३ | सरासरी आयुर्मान (वय वर्षे) | २०१०-१४ | ७४.९ | ७३.२ | ७१.६ | ६४.८ |
| ४ | अर्भक मृत्युदर (दरहजारी) | २०१६ | १० | १८ | १९ | ३९ |
| ५ | माता मृत्युदर (प्रतिलक्ष) | २०१४-१६ | ४६ | १०४ | ६१ | १७३ |
| ६ | ढोबळ मृत्युदर (टक्केवारी) | २०१६ | ७.६ | ४.० | ५.९ | ७.४ |
| ७ | जन्मदर (टक्केवारी) | २०१६ | १४.३ | १५.५ | १५.९ | २२.८ |
| ८ | लिंग गुणोत्तर (दरहजारी) | २०१३-१५ | ९६७ | ८६९ | ८७८ | ९६१ |

**स्रोत -** 1. https://www.census2011.co.in , 2. https://www.niti.gov.in

गुणानुक्रमांकानुसार भारतात केरळ राज्याचा प्रथम क्रमांक, दिल्लीचा दुसरा, महाराष्ट्र राज्याचा सातवा तर छत्तीसगड राज्याचा २३ वा क्रमांक लागतो. या चार राज्यांच्या तुलनात्मक विवेचनावरून हे स्पष्ट होते की, २०११ च्या साक्षरतेच्या टक्केवारीनुसार केरळमध्ये ९३.९१ टक्के, दिल्लीत ८६.३ टक्के, महाराष्ट्रात ८२.९१ टक्के; तर छत्तीसगड ७१.०४ टक्के लोक साक्षर होते. म्हणजेच साक्षरतेच्या बाबतीत राज्याची स्थिती तशी चांगली आहे. तर सरासरी आयुर्मान, अर्भक मृत्युदर, माता मृत्युदर व जन्मदर याबाबत केरळ अग्रेसर असून ढोबळ मृत्युदराबाबत दिल्ली राज्याचा प्रथम क्रमांक लागतो महाराष्ट्राचा ढोबळ मृत्युदर देखील कमी म्हणजेच ५.९ एवढा असलेला दिसून येतो. तर स्त्री-पुरुष प्रमाणाचा अभ्यास करता महाराष्ट्र राज्याची स्थिती चिंताजनक आहे. म्हणजेच दरहजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या केवळ ८७८ एवढी कमी आहे.

इतर राज्यांशी तुलना करता राज्याची स्थिती समाधानकारक असल्याचे दिसून येते. परंतु ही नाण्याची एकच बाजू असून दुसऱ्या बाजूचा अभ्यास करता हे स्पष्ट होते की, राज्यातील कुपोषण, महिलांवरील अत्याचार, स्त्री-पुरुष यांच्या आरोग्यामध्ये आणि नागरी व ग्रामीण भागातील आरोग्य सुविधांच्या उपलब्धतेमध्ये टोकाची विषमता आहे. त्याचबरोबर राज्याचा आरोग्यावरील खर्च हा २०१५-१६ नुसार राज्याच्या

उत्पन्नात केवळ ०.२३ टक्के एवढा अल्प होता. तसेच आरोग्य व्यवस्थेतील भ्रष्टाचार, राजकारण, डॉक्टरांवर होणारे हल्ले, औषधे खरेदीतील दिरंगाई आणि शासकीय रुग्णालयातील डॉक्टर, विशेष तज्ज्ञ व इतर कर्मचारी यांची कमतरता इत्यादींमुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची स्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे दिसून येते. (आचार्य संदीप)

**महाराष्ट्रातील बालकांचे आरोग्य :**

राष्ट्राचा विकासामध्ये सर्वात मोठा वाटा हा लोकांचा असतो. जर लोक निरोगी व दीर्घायुषी असतील तर राष्ट्राचा विकास झपाट्याने होतो. राष्ट्रातील आजची बालके ही उद्याची भावी पिढी होय. त्यामुळे बालकांचे आरोग्य चांगले असेल तर राष्ट्राची भावी पिढी निरोगी असेल. म्हणूनच ही बालके उद्याच्या विकासाची दिशा दर्शवितात. त्यामुळे त्यांच्या आरोग्य स्थितीचा आढावा घेणे महत्त्वपूर्ण वाटते. बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांच्यासाठी पूरक पोषण आहार कार्यक्रम हा एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत राबविण्यात येतो. यामध्ये ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील मुले, गरोदर स्त्रिया, स्तनदा माता आणि किशोरवयीन मुले यांना महिन्यातील २५ दिवस आणि वर्षातील ३०० दिवस पूरक पोषण पुरविले जाते. याचा परिणाम म्हणजे बालकांची आरोग्य स्थिती सुधारते. राज्यातील बालकांच्या आरोग्याच्या स्थितीचे वर्णन तक्ता क्र. २ मध्ये नमूद केली आहे.

तक्ता क्र. २ मध्ये,जागतिक आरोग्य संघटनेच्या

**तक्ता क्र. २ : ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांची पोषण श्रेणी निहाय टक्केवारी**

| वर्ष | क्षेत्र | सर्वसाधारण वजनाची बालके | साधारण कमी वजनाची बालके | अति कमी वजनाची बालके |
|---|---|---|---|---|
| २०१०-११ | ग्रामीण | ७६.९ | २०.३ | २.८ |
| | आदिवासी | ६४.८ | २९.३ | ५.९ |
| | नागरी | ६७.१ | २९.२ | ३.७ |
| | एकूण | ७३.५ | २३.१ | ३.४ |
| २०१३-१४ | ग्रामीण | ९२.५ | ६.४ | १.१ |
| | आदिवासी | ८०.९ | १५.६ | ३.५ |
| | नागरी | ८८.२ | १०.३ | १.५ |
| | एकूण | ८८.९ | ९.६ | १.५ |
| २०१६-१७ | ग्रामीण | ९२.९ | ६.१ | १.० |
| | आदिवासी | ८१.७ | १५.१ | ३.२ |
| | नागरी | ८३.८ | १५.२ | १.० |
| | एकूण | ८९.७ | ९.० | १.३ |

**स्रोत -** महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल २०११-१२ आणि २०१७-१८.

मानकानुसार वर्ष २०१०-११ नुसार, बालकांचे सर्वसाधारण वजनाची, साधारण कमी वजनाची आणि अति कमी वजनाची बालके असे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार वर्ष २०१०-११ ते २०१६-१७ या वर्षांचा अभ्यास करता हे स्पष्ट होते की ग्रामीण, आदिवासी व नागरी बालकांबाबत सामान्य वजन असलेल्या बालकांच्या टक्केवारीमध्ये वाढ झाली. तर अति कमी वजनाच्या बालकांच्या टक्केवारीमध्ये घट घडून आलेली दिसून येते ही बाब समाधानकारक आहे. असे असले तरीही आदिवासी भागातील अति कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण २०१६-१७ मध्ये ३.२ टक्के एवढे होते. हे प्रमाण जरी कमी झाले असले तरीदेखील त्यात अजून घट होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे साधारण कमी वजन असणाऱ्या बालकांच्या प्रमाणात देखील घट झाल्याचे दिसते. परंतु, नागरी भागातील २०१३-१४ मध्ये १०.३ टक्के असणारे प्रमाण २०१६-१७ मध्ये १५.२ टक्के एवढे वाढल्याचे दिसून येते. याचाच अर्थ एकंदरित पोषण कार्यक्रमाचा लाभ बालकांना होताना दिसून येतो.

**महाराष्ट्रातील शालेय विद्यार्थ्यांची संख्या :**

राज्यातील शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येचा अभ्यास करता आपणास राज्यातील शैक्षणिक स्थितीचा अंदाज येईल. आपल्या देशामध्ये ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत अधिकार आहे. हा कायदा देशात १ एप्रिल २०१० पासून लागू करण्यात आला आहे.

तक्ता क्र. ३ नुसार, १९६०-६१ ते २०१६-१७ या दरम्यान प्राथमिक शाळांच्या संख्येत ३.०३ पटीने वाढ झाली असून, या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये ३.८२ पटीने वाढ झाल्याचे स्पष्ट होते. तर माध्यमिक शाळांच्या संख्येत १०.४२ पटीने व विद्यार्थ्यांमध्ये ७.७१ पटीने वाढ झाल्याचे स्पष्ट होते. याचाच अर्थ महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून शाळांच्या व विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झालेली दिसून येते. त्यामुळे शिक्षणाबरोबरच त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली गेली तर उद्याची पिढी सुदृढ व निरोगी असेल. याकरिताच जगभरामध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्यात येते.

**तक्ता क्र. ३ : महाराष्ट्रातील प्राथमिक व माध्यमिक शाळांची व विद्यार्थ्यांची संख्या**

| अ.क्र. | निकष | १९६०-६१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक शाळा | ३४५९४ | ६५९६० | ७५६९५ | १०४९७१ |
| २ | प्राथमिक शाळेतील विद्यार्थी (हजारात) | ४१७८ | ११८५७ | १०६२६ | १५९८६ |
| ३ | माध्यमिक शाळा | २४६८ | १५३८९ | २१३५७ | २५७३७ |
| ४ | माध्यमिक शाळेतील विद्यार्थी (हजारात) | ८५८ | ९२६७ | १०७११ | ६६१५ |

**स्रोत** - महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल २०१७-१८

**शालेय आरोग्य कार्यक्रम आणि महाराष्ट्र राज्य :**

बालकांच्या आरोग्याचा त्यांच्या वैयक्तिक व शैक्षणिक प्रगतीवर त्याचप्रमाणे देशाच्या विकासावर देखील परिणाम होतो. आजची बालके ही उद्याचे नागरिक असतात. त्यामुळेच जगातील जवळपास सर्वच देश बालकांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देतात. फ्रेंच सरकारने १८३३ मध्ये सर्वप्रथम 'शालेय आरोग्य सेवा' राबविली. त्यानंतर १८६८ मध्ये स्विडन, १८६९ मध्ये जर्मनी, १८७१ मध्ये रशिया आणि १८९४ मध्ये अमेरिकेने ही सेवा राबविण्यास सुरुवात केली. (सोनावणे) भारतात सर्वप्रथम बडोदा येथे १९०९

या वर्षात शालेय वैद्यकीय तपासणी केली गेली. त्यानंतर १९१३ मध्ये 'बॉम्बे महानगरपालिकेने' देखील शालेय वैद्यकीय तपासणीला सुरुवात केली.

भारतात विविध राज्ये शालेय मुलांच्या आरोग्यासाठी विविध कार्यक्रम राबवित होते. परंतु, त्यात एकसूत्रीपणा नव्हता. म्हणूनच भारत सरकारने २००८ या वर्षात 'शालेय आरोग्य कार्यक्रम' राबविण्यास सुरुवात केली. हा कार्यक्रम 'राष्ट्रीय आरोग्य अभियाना' मार्फत राबविण्यात येतो. शालेय आरोग्य कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांना व पालकांना आरोग्य विषयक शिक्षण देणे, विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी करणे, पोषण विषयक कार्यक्रम राबविणे, आजारांचे वेळीच निदान करून त्यावर उपचार करणे आणि मुलांमध्ये चांगल्या आरोग्यविषयक सवयी लावणे इत्यादी. या कार्यक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांची म्हणजेच ६ ते १६ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी केली जाते.

महाराष्ट्र राज्यात फेब्रुवारी २००८ या वर्षापासून हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. शिक्षण विभाग व आरोग्य विभाग एकत्रितपणे हा कार्यक्रम राबवितात. या कार्यक्रमाचा महाराष्ट्र राज्यातील सविस्तर आढावा तक्ता क्र. ४ मध्ये घेण्यात आला आहे.

तक्ता क्र.४ नुसार,शालेय आरोग्य कार्यक्रमात

**तक्ता क्र. ४ : महाराष्ट्र राज्यातील शालेय आरोग्य कार्यक्रमाचा आढावा**

| अ. क्र. | वर्ष | समाविष्ट शाळांची संख्या | तपासणी झालेली विद्यार्थी संख्या (लाखात) | उपचार केलेली विद्यार्थी संख्या (लाखात) | संदर्भ सेवेसाठी पाठविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या (लाखात) | मोठ्या शस्त्रक्रि या झालेली विद्यार्थी संख्या | हृदय शस्त्रक्रिया झालेली विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००८-०९ | ७३९८९ | ९७.६९ | २३.२५ (२३.८०) | २.५५ (२.६१) | २,८२८ (१.११) | १,०५३ (०.४१) |
| २ | २०१२-१३ | ८२००३ | ११२.८२ | १८.११ (१६.०५) | ०.८३ (०.७४) | ५,७३० (६.९०) | ८२३ (०.९९) |
| ३ | २०१६-१७ | ८४८२८ | १२३.८३ | ११.५३ (९.३१) | ०.९२ (०.७४) | १३,१८८ (१४.३३) | १,९५२ (२.१२) |

**स्रोत -** महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल (२०१२-१३, २०१४-१५, २०१७-१८)

**टिप -** कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

समाविष्ट शाळांची संख्या २००८-०९ मध्ये ७३९८९ होती त्यात २०१६-१७ पर्यंत ९४८२८ पर्यंत वाढ झाली आहे. याचाच अर्थ गेल्या काही वर्षांपासून जास्तीत जास्त शाळांना या कार्यक्रमामध्ये सहभागी करून घेऊन विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमांचा लाभ घेतलेला दिसून येतो. २००८-०९ मध्ये ९७.६९ लाख विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. २०१६-१७ पर्यंत त्यात १२३.८३ लाख विद्यार्थी एवढी वाढ झाली. हा कार्यक्रम राबविताना आरोग्य तपासणीमध्ये ज्या विद्यार्थ्यांना किरकोळ आजार असल्यास त्यावर शाळेत तात्काळ उपचार केले जातात. हे आजार फारसे गंभीर नसतात. २००८-०९ मध्ये अशा २३.८० टक्के

विद्यार्थ्यांवर शाळेत उपचार केले गेले. त्यात घट होऊन २०१२-१३ मध्ये हे प्रमाण १६.०५ टक्क्यांवर व २०१६-१७ मध्ये ९.३१ टक्के एवढे कमी झाले. तर ज्या विद्यार्थ्यांचे आजार गंभीर स्वरूपाचे आहेत व त्यांना पुढील उपचारांची गरज आहे अशांना संदर्भ सेवेकरिता पाठविण्यात येते. अशा विद्यार्थ्यांचे प्रमाण २००८-०९ मध्ये २.६१ टक्के होते ते २०१६-१७ पर्यंत ते ०.७४ टक्क्यांपर्यंत कमी झाले. परंतु मोठ्या शस्त्रक्रिया व हृदय शस्त्रक्रिया या दोहोंमध्ये बरीच वाढ झालेली दिसून येते. २००८-०९ मध्ये मोठ्या शस्त्रक्रियांचे प्रमाण १.११ टक्के होते, ते २०१६-१७ मध्ये १४.३३ टक्क्यांपर्यंत वाढले. तर हृदय शस्त्रक्रियांचे प्रमाण अनुक्रमे ०.४१ टक्क्यांवरून २.१२ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. याचाच अर्थ अधिकाधिक बालकांना या कार्यक्रमाचा लाभ होत आहे.

**शालेय आरोग्य कार्यक्रमाच्या मर्यादा :**

शालेय आरोग्य कार्यक्रमाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी करून किरकोळ आजारांवर तात्काळ उपचार केले जातात. तर गंभीर आजारांवर आवश्यक ते उपचार व गरजेनुसार शस्त्राक्रिया केल्या जातात. याबाबतीतील यश हे समाधानकारक आहे. मात्र या कार्यक्रमाचा लाभ केवळ शालेय विद्यार्थ्यांनाच होतो. डिसेंबर २०१७-१८ पर्यंत राज्यात ४८३७९ मुले शाळा बाह्य होती. अशा शाळा बाह्य मुलांना या योजनेचा लाभ होत नाही. त्याचप्रमाणे ही शालेय तपासणी वर्षातून दोनदा करणे अपेक्षित आहे. परंतु, कुशल मनुष्यबळाच्या अभावामुळे ही तपासणी वर्षातून केवळ एकदाच केली जाते. त्याबरोबरच कुपोषण, बालमृत्यू तसेच शासकीय रुग्णालयातील डॉक्टर, विशेष तज्ज्ञ, इतर कर्मचारी यांची कमतरता, केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या आरोग्य निधीचा अपुरा वापर (उदा. महाराष्ट्र शासनाला राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम' राबविण्यासाठी २०१४ ते २०१८ या कालावधीमध्ये रु.३,००० कोटींचा निधी केंद्र सरकारकडून मंजूर होऊन देखील हा निधी तसाच पडून आहे.) इत्यादींमुळे या कार्यक्रमाच्या यशाला मर्यादा येताना दिसतात.

**सारांश :**

राष्ट्राचे भविष्य हे आजच्या बालकांच्या आरोग्य व शैक्षणिक स्थितीवर अवलंबून असते. त्यामुळे उद्याची पिढी निरोगी हवी असेल तर बालपणापासूनच तसे संस्कार त्यांच्यावर व्हायला हवेत. म्हणजेच आरोग्य शिक्षणाचे धडे बालपणीच मनात बिंबवले तर ते निरोगी आयुष्य जगू शकतील. निरोगी जनता अधिक कार्यक्षमपणे काम करू शकेल. त्यामुळे देशाची प्रगती वेगाने होण्यास मदत होईल. परंतु याकरिता आजच्या बालकांचे आरोग्य निरोगी असणे महत्त्वाचे आहे. यासाठी देशभरामध्ये शालेय आरोग्य कार्यक्रम राबविण्यात येतो. राज्यातील शालेय आरोग्य कार्यक्रमाचा माध्यमातून अधिकाधिक बालकांची तपासणी केली जात आहे व त्यांच्यावर गरजेनुसार मोफत उपचार केले जात आहेत. त्याचबरोबर त्यांना शाळेतच आरोग्य शिक्षण दिले जात आहे. याचा फायदा निश्चितच त्यांना होत आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शासकीय धोरणांची प्रभावी अंमलबजावणी होणे व वर नमूद केलेल्या मर्यादांचे निराकरण होणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**


१. आचार्य संदीप (२०१८), 'आरोग्याची ऐशीतैशी', दैनिक लोकसत्ता, २२ मे २०१८.

२. आचार्य संदीप (२०१८), 'राष्ट्रीय आरोग्य अभियान' चे ३००० कोटी वापराविना', दैनिक लोकसत्ता, १२ ऑगस्ट २०१८.

३. कवळे व पाटील (२०१८), 'महाराष्ट्रातील आरोग्यविषयक सद्य:स्थिती व आव्हाने', अर्थात, स्मरणिका, मराठी अर्थशास्त्र परिषद ४२ वे राष्ट्रीय अधिवेशन, चंद्रपूर.

४. जहागिरदार दि. व्य.(१९९६), 'महाराष्ट्रातील

सार्वजनिक आरोग्याचे अर्थशास्त्र', अर्थसंवाद, जानेवारी-मार्च, खंड १९, अंक ४.

५. पाटील सुभाष (२०१६),'भारतातील आरोग्यविषयक सद्य:स्थिती', अर्थमीमांसा, विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची संशोधन पत्रिका, खंड ९, अंक २.

६. महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल (२०११-१२, २०१२-१३, २०१४-१५ आणि २०१७-१८), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

७. School Health Program, Ministry of Health and Family Welfare, Government of India

८. Sonavane Nilima, "School Health Services in India', (https://www.likedin.com/pulse/school-health-services-india-dr-nilima-sonavane)

९. http://www.census2011.co.in

१०. https://www.niti.gov.in

◆

## भावपूर्ण श्रध्दांजली

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य, मराठवाडा अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष, पीपल्स कॉलेज नांदेडचे माजी अर्थशास्त्र विभाग प्रमुख व अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ. एस. एल. पेडगावकर यांचे सोमवार दि. १३/०५/ २०१९ रोजी दुःखद निधन झाले. मराठी अर्थशास्त्र परिषदेमार्फत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**- आर. बी. भांडवलकर**
कार्यवाह खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

अर्थशास्त्राचा अंतिम हेतू म्हणजे कल्याण वाढीची जाणीव
आणि प्रोत्साहन निर्माण करणे होय.

**- बेन बर्नान्के**

# विकास दृष्टिकोनातून सार्वजनिक अंदाजपत्रक : विशेष संदर्भ केंद्रीय आणि महाराष्ट्र अंदाजपत्रक २०१९-२०

**पी. एस. कांबळे** †

सार्वजनिक अंदाजपत्रक हे देशाच्या जलद आणि सर्वांगिण विकासाचे प्रभावी साधन असते. त्यामुळेच सर्व स्तरातील अंदाजपत्रकाकडे अभ्यासकांचे, लोकांचे लक्ष असते. एकूण विकासाचे सर्व साधारणपणे सामाजिक आणि आर्थिक विकास असे वर्गीकरण केले जाते. कोणत्याही देशाचा विकास त्या देशाच्या सरकारच्या विकास धोरणावर अवलंबून असतो. सरकार आपल्या धोरणाच्या साहाय्याने आपल्या अर्थव्यवस्थेचा विकास गतिमान करण्याचा प्रयत्न करत असते. विकास धोरणाचे चलनविषयक, राज्यवित्तीय, व्यापार, शेती, उद्योग अशा अनेक घटकांत वर्गीकरण केले जाते. असाच अंदाजपत्रकीय धोरण असा एक भाग असतो; जो देशाच्या राज्यवित्तीय धोरणाचा एक अत्यंत महत्त्वाचे अंग असते. १ फेब्रुवारी, २०१९ रोजी केंद्रीय अर्थमंत्र्यांनी भारताचे केंद्र सरकारचे वर्ष २०१९-२० साठीचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी संसदेत सादर केले आहे. त्याचा अभ्यास केल्यास असे म्हणता येईल की, केंद्रीय अंदाजपत्रक २०१९-२० सामाजिक विकासाकडे झुकणारे मात्र आर्थिक विकासाकडे दुर्लक्ष करणारे केंद्रीय अंदाजपत्रक आहे. या अंदाजपत्रकाचे मूल्यमापन करताना सामाजिक विकासास प्राधान्य देणारे मात्र शिक्षणाकडे दुर्लक्ष करणारे केंद्रीय अंदाजपत्रक २०१९-२० आहे, असे म्हणता येईल.

सार्वजनिक अंदाजपत्रकाकडे विकास धोरणाचे साधन आणि व्यवस्था म्हणून पाहणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी २७ फेब्रुवारी २०१९ रोजी सादर केलेले २०१९-२० साठीचे अंदाजपत्रकाचे विश्लेषण केल्यास हे अंदाजपत्रक राज्याच्या शेती विकासास प्राधान्य देणारे, मात्र औद्योगिक आणि सर्वांगिण विकासाकडे दुर्लक्ष करणारे वाटते. या अंदाजपत्रकात सामाजिक विकासाकडे लक्ष दिल्याचे दिसून येते, मात्र त्याच वेळेला शिक्षणाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले असून, महसूल संकलनाचा अजिबात विचार न झाल्याने हा विकास म्हणजे घोषणाच अधिक वाटल्याने येत्या काळात लागणाऱ्या निवडणुकांचे ठळक प्रतिबिंब या अंदाजपत्रकात दिसून येते.

**सामाजिक विकासाकडे झुकणारे केंद्रीय अंदाजपत्रक २०१९-२०** (Union Budget 2019-20 Prefers Social Development) :

केंद्रीय अंदाजपत्रक २०१९-२० मध्ये सामाजिक विकासाच्या निश्चितपणे काही तरतुदी आहेत. यात

†प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र.: ४८७ , भ्रमणध्वनी : ९४२३०३३१७९ , ई-मेल : pskamble2006@gmail.com

शेतकरी कल्याण, आरोग्य सेवा विकास, स्त्री व बालकल्याण, अनुसूचित जाती आणि जमातीचे कल्याण या घटकांकडे लक्ष देण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात झाला आहे. प्रथमच लघु आणि सीमांत शेतकऱ्याना वर्षाला ६००० रुपये मदत दोन हप्त्यांत दिली जाणार आहे. यासाठी २०१८-१९ मध्ये २०,००० कोटी रुपये आणि २०१९-२० साठी ७५,००० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. अर्थात प्रतिवर्षी ६,००० रुपये ही छोटी रक्कम आहे, हे आपणास विसरता येणार नाही. मात्र अशी शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याचा पहिलाच प्रसंग आहे. या अंदाजपत्रकात वेळेवर कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना व्याजात ३% सूट दिली जाणार आहे. आरोग्यक्षेत्राकडे या अंदाजपत्रकाने विशेष लक्ष दिले आहे. २२ वी आरोग्य संशोधन संस्था स्थापन केली जाणार आहे. आयुष्यमान भारत ही योजना अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात दिसतो. या योजनेचा लाभ आतापर्यंत १० लाख लोकांनी घेतला आहे. तो ५० कोटींपर्यंत वाढविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. औषधे परवडणाऱ्या किमतीला उपलब्ध करून दिली जाणार आहेत. तसेच आवश्यक औषधे, स्टेन्स, गुडघा शस्त्रक्रिया यांच्या किमती कमी केल्या जाणार आहेत. एस. सी., एस. टी. यांच्या कल्याणासाठीची तरतूद वाढविली आहे. अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी तरतूद ५६,६१९ कोटी रुपये वरून ७६,८०१ कोटीपर्यंत वाढविली आहे. तर अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी तरतूद ३९,१३५ कोटीवरून ५०,०८६ कोटीपर्यंत वाढविण्यात आली आहे. प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा लाभ ७०% स्त्रियांना उपलब्ध करून दिला जाणार आहे. तसेच गरोदर स्त्रियांना २६ आठवडे प्रसूती रजा दिली जाणार आहे. एकात्मिक बालकल्याण विकास योजनेवर २७,५८४ कोटी खर्च केले जाणार आहे, जे पूर्वी २३,३५७ कोटी होते. मात्र सामाजिक विकासातील शिक्षण, रोजगार, विषमता, गरिबी, गृहबांधणी, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि पर्यावरण याकडे दुर्लक्ष या अंदाजपत्रकात झाले आहे.

**आर्थिक विकासाकडे दुर्लक्ष करणारे केंद्रीय अंदाजपत्रक २०१९-२०** (Union Budget 2019-20 Neglects Economic Development) :

जसा सामाजिक विकास देशास आवश्यक आहे तसाच आर्थिक विकासही आवश्यक असतो आणि तो गतिमान करावा, अशी अपेक्षा सार्वजनिक अंदाजपत्रकाकडून असते. मात्र केंद्रीय अंदाजपत्रक २०१९-२० मध्ये आर्थिक विकासाकडे फारसे लक्ष दिल्याचे दिसत नाही. आपला विकासाचा दर २००६ मधील ७.९% वरून २०१८-१० मध्ये ७.२% पर्यंत घटला असल्याने तो पूर्ववत करणे आवश्यक होते. आज आपली सेवाक्षेत्र प्रधान अर्थव्यवस्था असून ती उद्योग आणि शेती विकास आधारित करणे अत्यंत आवश्यक होते. कारण या दोन्ही क्षेत्रांचे विकासातील योगदान अपेक्षित राहिले नाही. वस्तू निर्माण क्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पादनातील हिस्सा फक्त १७% एवढा अल्प आहे की जो दक्षिण कोरिया २८%, जर्मनी २१% आणि चीनमध्ये २९% आहे. भारत हा तरुणांच देश असून लोकसंख्येच्या लाभांशाचा लाभ उठवून आर्थिक महासत्ता होण्यासाठी शिक्षण आणि रोजगाराकडे लक्ष देणे अवश्यक होते. महात्मा गांधी रोजगार हमी योजना आणि मूलभूत संरचना यावरील तरतुदीतून होणारी रोजगार निर्मिती वगळता, रोजगार निर्मितीकडे हे अंदाजपत्रक लक्ष देत नाही. मनरेगासाठी या अंदाजपत्रकाने ६०,००० कोटी रुपये तरतूद केली आहे. तर हवाई अड्डे आणि रस्ते बांधणीतून रोजगार निर्मिती केली जाणार आहे. २०१७-१८ मध्ये देशात सर्वात जास्त बेकारीचा दर ६.१% असून तो २०११-१२ मधील २.२% वरून वाढला आहे. सर्वात तरुणांच्या देशात शहरी भागात स्त्रियांमध्ये २७% तर पुरुषामध्ये १९% आणि ग्रामीण भागात अनुक्रमे १४% आणि १७% एवढा

अधिक बेकारी दर होता, याकडे हे अंदाजपत्रक लक्ष देत नाही. शिक्षणाची आणि प्रामुख्याने उच्च शिक्षणाची स्थिती फारशी चांगली आपल्या देशात नाही. फक्त २४% उच्च शिक्षणातील पटसंख्या असून क्षमता ४४% असताना प्रत्यक्ष सहभाग फक्त १०% आहे. असे असताना हे अंदाजपत्रक शिक्षणाकडे दुर्लक्ष करते. याबरोबरच आर्थिक विषमता, गरिबी, विकासातील असमतोल हेही प्रश्न गंभीर आहेत. मात्र हे अंदाजपत्रक नोकरदार वर्गास खूश करण्याचा प्रयत्न करते.

**सामाजिक विकासास प्राधान्य मात्र शिक्षणाकडे दुर्लक्ष करणारे केंद्रीय अंदाजपत्रक २०१९-२०** (Union Budget 2019-20 Prefers Social Development But Neglects Education) :

२०१९-२०च्या अंदाजपत्रकात सामाजिक विकासाचे शेतकरी कल्याण, आरोग्य सेवा विकास, स्त्री व बालकल्याण, अनुसूचित जाती आणि जमाती कल्याण या घटकाकडे लक्ष देण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात झाला आहे. मात्र त्याबरोबरच सामाजिक विकासातील शिक्षण, रोजगार, विषमता, गरिबी, गृहबांधणी, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि पर्यावरण याकडे खूपच दुर्लक्ष या अंदाजपत्रकात झाले आहे.

या अंदाजपत्रकात प्रथमच प्रधानमंत्री किसान सम्मान निधी स्थापन केला जाणार आहे. विशेष म्हणजे सामाजिक कल्याणाचा भाग म्हणून प्रथमच एन. टी. समुदाय कल्याणासाठी कल्याण विकास मंडळ स्थापन करण्याचा सरकारचा मानस आहे. स्त्री आणि बालकल्याणसाठी मोफत एकूण ८ कोटी घरगुती गॅस (LPG) कनेक्शन उपलब्ध केली जाणार आहेत, जी ६ कोटीपर्यंत पोहचली आहेत. प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा लाभ ७०% स्त्रियांना उपलब्ध करून दिला जाणार आहे. यावरून २०१९-२०चे केंद्रीय अंदाजपत्रक सामाजिक विकासातील काही महत्त्वाच्या घटकाकडे निश्चित लक्ष देणारे आहे.

मात्र सामाजिक विकासात शिक्षणाकडे या अंदाजपत्रकात अजिबात लक्ष दिले नाही, ही बाब गंभीर आहे. कारण एकूण शिक्षणाची आणि प्रामुख्याने उच्च शिक्षणाची स्थिती फारसी चांगली नाही. देशात आर्थिक विषमता वेगाने वाढत आहे १०% पेक्षा कमी लोकांकडे ९०% पेक्षा अधिक संपत्तीचे केंद्रीकरण झाले आहे, त्याकडे या अंदाजपत्रकाने लक्ष दिले नाही. देशातील बेकारीचा दर सर्वात उच्च ६.१% असून १५ ते २९ वर्षे वयोगटातील शहरी स्त्रियांमध्ये २७% आणि पुरुषांमध्ये १९%; तर ग्रामीण भागात हेच प्रमाण १३.६% आणि १७% असताना बेकारी निर्मूलन आणि रोजगार निर्मितीकडे हे अंदाजपत्रक लक्ष देत नाही. शेती विकास, औद्योगिक विकास आणि एकूण अर्थव्यवस्थेचा विकास गतिमान करण्याकडे हे अंदाजपत्रक लक्ष देत नाही.

**महाराष्ट्र अंदाजपत्रक २०१९-२० : शेती आणि पायाभूत विकासास प्राधान्य मात्र उद्योग आणि सर्वांगिण विकासाचे काय?**(Maharashtra Budget Prioritises Agriculture and Infrastructure, but What about Industrial and Over all Development?)

वर्तमान सरकारची येत्या वर्षात शेती विकास गतिमान करण्याची इच्छा दिसून येते. शेती विकासासाठी अनुकूल तरतुदी या अंदाजपत्रकात दिसून येतात. यात प्रामुख्याने टंचाई आणि दुष्काळग्रस्तांना २ हजार कोटी निधी उपलब्ध करून देणार आहे. सिंचनासाठी प्रामुख्याने विदर्भ आणि मराठवाड्यातील आत्महत्या आणि दुष्काळग्रस्त भागासाठी करण्यात आली आहे. याबरोबरच शेती विकासासाठी उपयुक्त जलसिंचन सुविधा वाढविण्यासाठी जलयुक्त शिवार आणि सूक्ष्मसिंचन, शेततळी, विहिरी यांच्या विकासासाठी अनुक्रमे १ हजार ५०० कोटी आणि १८७ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याबरोबरच कृषिपंप, कृषिविभाग योजना यांचाही समावेश आहे. उद्योग विकास अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण त्यात संपूर्ण

अर्थव्यवस्थेचा विकास जलद आणि सर्वांगिण करण्याची क्षमता त्यात असताना हे अंदाजपत्रक त्याकडे खूप दुर्लक्ष करते. ग्रामीण विकास तर महाराष्ट्राचा विकास असताना हे अंदाजपत्रक त्यादृष्टीने कोणताही विचार करत नाही, ही गंभीर बाब आहे. मूलभूत सुविधा विकासाकडे हे अंदाजपत्रक लक्ष देते ही चांगली बाब आहे. यात प्रमुख्याने रस्ते विकास ८ हजार कोटी रुपये, केंद्रीय मार्ग निधी योजना १ हजार १०५ कोटी, नाबार्ड साहाय्यीत ३५० कोटी रुपये, ग्रामसडक योजना २ हजार १६४ कोटी योजना यासाठी तरतूद करण्यात आली आहे. तसेच रस्ते वाहतूक सुधारण्यासाठी राज्य महामंडळाच्या बसस्थानकांचे आधुनिकीकरणही विचारात घेता येतील. ऊर्जा विभागाच्या विकासाठी ६ हजार कोटी रुपयेही तरतूद आहेत. स्मार्ट सिटी व अमृत अभियानाच्या माध्यमातून शहरी पायाभूत सुविधा विकसित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**महाराष्ट्र अंदाजपत्रकात सामाजिक विकासाकडे लक्ष मात्र शिक्षण विकासाचे काय?** (Maharashtra Budget Prefers Social Development, but What about Educational Development? )

सामाजिक विकासाकडे दिलेले लक्ष हेही या अंदाजपत्रकाचे एक वैशिष्ट्य म्हणता येईल. आरोग्य सेवा सुधारण्यासाठी जन आरोग्य योजना आणि महात्मा फुले आरोग्य योजनेसाठी १ हजार २१ कोटी रुपयांची तरतूद या अंदाजपत्रकात आहे. अनुसूचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त जाती, आदिवासी आणि अल्पसंख्यांकासाठी या अंदाजपत्रकात तरतूद केली आहे. महिला आणि बालविकासासाठी आणि आवास योजना, पोलीस घरांसाठी, पिण्याचे पाणी यासाठीही हे अंदाजपत्रक तरतूद करत आहे. मात्र शिक्षण या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्राकडे आणि प्रामुख्याने महाविद्यालये आणि विद्यापीठ शिक्षण विकासाकडे हे अंदाजपत्रक साधा उल्लेखही हे अंदाजपत्रक करत नाही. फक्त काही नवीन संस्थांना अनुदान दिले जाणार आहे. अर्थात, पूर्वीच्याच योजना पुढे चालू ठेवण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात आहे. तसेच प्रामुख्याने सामाजिक कल्याण आणि विकास योजनावरील खर्च फक्त जाहीर केला जातो किंवा तो बाकीच्या घटकांकडे वळविला जातो, हेही दुर्लक्षित करता येणार नाही. ही प्रवृत्ती अनुसूचित जातीजमाती आणि आदिवासी कल्याण योजनाबाबत मोठ्या प्रमाणावर दिसून येते. आज राज्य उत्पन्न विषमतेत देशात प्रथम असताना ती कमी करण्याचा कोणताही उपाय आणि धोरण या अंदाजपत्रकात नाही. गरिबी, बेकारी, कुपोषण, उपासमार उच्च पातळीवर पोहचली असताना आणि रोजगार प्रामुख्याने सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार आणि त्यांचे सामाजिक स्तरीकरण त्यांचा साधा उल्लेखही हे अंदाजपत्रक करत नाही, ही गंभीर बाब विचारात घेणे आवश्यक आहे.

**पैशाचे सोंग; महसुलाचे काय?** (Money Matters; What about Revenue?)

सर्व सोंगे करता येतात मात्र पैशाचे सोंग करता येत नाही. या अंदाजपत्रकात अनेक तरतुदी, उपाय, योजना, धोरणे आहेत, मात्र त्यासाठी येणारा पूर्वीचा आणि वाढीव खर्च कसा भागवायचा याचे उत्तर हे अंदाज पत्रक देत नाही. कारण सरकारी उत्पन्न वाढविण्यासाठी सरकार कोणतेही पाऊल उचलणार नाही ते स्पष्ट दिसते. महसूल संकलन करण्यासाठीची योजना या अंदाजपत्रकात नाही. त्यामुळे या अंदाजपत्रकात घोषणाचा सुकाळ आणि निधीचा दुष्काळ अशी स्थिती दिसून येते. त्यामुळे या अंदाजपत्रकाचे स्वरूप, निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून केलेल्या घोषणा असे दिसून येते. ते सुधारण्यासाठीचा प्रामाणिक आणि गंभीर प्रयत्न अत्याश्यक आहे. जर त्या दृष्टीने आणि प्रामाणिक प्रयत्न झाला तरच खऱ्याअर्थाने या अंदाजपत्रकास अर्थ आहे.

**समारोप** (Concluding Remarks) :

वरील विश्लेषण हे स्पष्ट करते की केंद्रीय अंदाजपत्रक २०१९-२० सामाजिक विकासास प्राधान्य देताना तेही अंशतः दिल्याचे दिसते. विशेष म्हणजे आर्थिक विकासाकडे अतिशय दुर्लक्ष या अंदाजपत्रकात झाले आहे. अर्थात, सामाजिक विकासातही अधिक घोषणाच दिसून येतात. यावरून येत्या भविष्यातील निवडणुकांचे प्रतिबिंब या अंदाजपत्रकात दिसून येते, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. महाराष्ट्र अंदाजपत्रक २०१९-२० म्हणजे एक राजकीय घोषणा व कार्यक्रम ठरेल आणि विकासाचे साधनही अंदाजपत्रकाची ओळख पुसून जाईल.

**संदर्भ :**


1) Datta and Sundhram, 2018, Indian Economy, Himalaya Publishing House.
2) Government of India, Union Budget 2019-20.
3) Government of Maharashtra, Maharashtra Budget 2019-20.
4) Lekhi R. K., 2018, Public Finance, Kalyani Publishers.
5) Mishra and Puri, 2018, Indian Economy, Himalaya Publishing House.
6) Tyagi B. P., 2018, Public Finance, Jay Prakash Nath Co.


◆

---

भांडवलशाही समाजात आर्थिक प्रगती म्हणजे उधळेपणा.

**- जोसेफ शुम्पीटर**

---

आपण कमाई करण्यापूर्वी आपला पैसा कधीही खर्च करू नका.

**- थॉमस जेफरसन**

---

# ‘मोदीनॉमिक्स’

**मंजुषा मुसमाडे** †

पुस्तकाचे नाव : ‘मोदीनॉमिक्स’
लेखक : डॉ.विनायक गोविलकर
प्रकाशक : अल्टीमेट असोसिएटस, नाशिक, २०१८.
पृष्ठसंख्या : २६०, किंमत : २५० रु.
ISBN नाही.

**प्रस्तावना**

नुकतीच भारतात सतराव्या लोकसभेची निवडणूक पार पडली आणि पुन्हा एकदा बहुमताने केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले आहे. २०१४-२०१९ या मोदी सरकारच्या पहिल्या कार्यकाळातील आर्थिक धोरणांना एका बाजूने वारेमाप प्रसिद्धी मिळाली तर दुसऱ्या बाजूने टीकाही केली गेली. एखाद्या नेत्याने राबविलेल्या आर्थिक धोरणांना त्याच्या नावापुढे अर्थशास्त्र शब्द जोडून नवा जोडशब्द तयार करण्याची पाश्चात्य पद्धत उदा. रीगनॉमिक्स, आबेनॉमिक्स इ. मोदींनी राबविलेल्या विविध आर्थिक धोरणांबाबतही वापरली गेली आणि ‘मोदीनॉमिक्स’ ही संज्ञा रूढ झाली.

प्रस्तुत पुस्तकाचे हे शीर्षक वाचकाला आकर्षित करून घेते. ‘अर्थसंवाद’च्या वाचकांना याचा परिचय करून देणे समयोचित वाटते. लेखक सी.ए. डॉ. विनायक गोविलकर यांची ओळख मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सभासदांना वेगळी करून देण्याची गरज नाही. या पुस्तकाची प्रस्तावना श्री. मृगांक परांजपे या व्यावसायिक तज्ज्ञाने लिहिली आहे, हे एक या पुस्तकाचे वैशिष्ट्य सांगता येईल. आरंभी लेखकाने हे पुस्तक लिहिण्यामागील आपली भूमिका विशद केली आहे. मोदी सरकारच्या पहिल्या कार्यकाळातील चार वर्षांचा वस्तुनिष्ठ आढावा घेण्याचा प्रयत्न केल्याचे लेखकाचे म्हणणे आहे. लेखकाने प्रस्तावनेत असे मत मांडले आहे की, मोदी सरकारच्या काळात २०१४-१८ भारतीय अर्थव्यवस्था ‘दुर्बल पाच’ मधून जागतिक आर्थिक पातळीवरील एक ‘चमकदार स्थान’ बनली आहे. मात्र, त्याचबरोबर त्यांनी वस्तुनिष्ठपणे मोदींच्या विरोधकांचे सरकारवर असलेले आक्षेपही विचारात घेतले आहेत. रोजगारनिर्मिती, भाववाढ, काळ्या पैशाच्या निर्मूलनातील अपयश, कृषी क्षेत्राकडे दुर्लक्ष इत्यादी आघाड्यांवरील सरकारचे दोषही त्यांनी परखडपणे मांडले आहेत.

† अर्थशास्त्र विभाग प्रमुख, नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे.
आजीव सभासद क्र. : ९३१, भ्रमणध्वनी : ९८८१३४०७२५, ई-मेल : manjushamusmade@gmail.com

लेखकाने सुरुवातीलाच हे स्पष्ट केले आहे की, या पुस्तकाचा उद्देश मोदी सरकारच्या विविध खात्याची कामगिरी तपासणे हे नसून सरकारने लोककल्याण आणि आर्थिक विकासासाठी अंमलात आणलेल्या विविध योजनांचे विश्लेषण करणे एवढ्यापुरताच मर्यादित आहे. पुस्तकात एकूण नऊ प्रकरणे आहेत. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी संदर्भसूची दिली आहे. अर्थातच, त्यातील बहुतेक संदर्भ संकेतस्थळांच्या स्वरूपातील आहेत.

**पुस्तक परिचय**

पहिल्या प्रकरणात १९४७-२०१८ या कालखंडाचा धावता आढावा घेताना लेखकाने या काळाचे पुढील चार टप्प्यांत विभाजन केले आहे-

- १९४७ ते १९७७- नियंत्रित आणि सार्वजनिक क्षेत्राच्या अधिकाराखालील अर्थव्यवस्था.
- १९७७ ते १९९१- राजकीय अस्थिरता आणि त्यामुळे निर्माण झालेले आर्थिक संकट.
- १९९१ ते २००८- सुधारणा, पुनरुज्जीवन आणि अर्थव्यवस्थेचा उदय.
- २००८ ते २०१४- वित्तीय बेशिस्त, प्रचंड आर्थिक गैरव्यवहार/घोटाळे आणि कल्याणकारी योजनांवरील अवाजवी खर्च.

या सर्व टप्प्यांचे लेखकाने मुद्देसूद विवेचन केले आहे. २००८-२०१४ या कालखंडातील कल्याणकारी योजनांचा आढावा घेताना त्यांनी अर्थतज्ज्ञ जगदीश भगवती आणि नीती आयोगाचे पहिले उपाध्यक्ष अरविंद पंगारीया यांचे 'नरेगा' योजनेवरील मत उद्धृत केले आहे. या तज्ज्ञांच्या मते ही योजना दारिद्र्य-निर्मूलनाच्या दृष्टीनेही अतिशय अकार्यक्षम होती. याचा आधार घेऊन लेखक असा निष्कर्ष काढतात की, ही योजना रोजगारनिर्मिती आणि दारिद्र्यनिर्मूलन या दोन्ही आघाड्यांवर अपयशी ठरली होती. याचप्रमाणे, अन्नसुरक्षा विधेयकानुसार होणाऱ्या प्रचंड खर्चामुळे १,२५,००० कोटी रु.ही योजना भारताच्या कल्याणासाठी होती की देशाच्या आर्थिक वृद्धीला निरोप देणारी होती, असा प्रश्न उपस्थित झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे. "Is it welfare or farewell to India's growth?'

ख्यातनाम 'टाईम 'मासिकाचा हवाला देत लेखकाने माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या एकूण आर्थिक धोरणांचे आणि कामगिरीचे समर्पक शब्दांत विश्लेषण केले आहे. १९९१ मध्ये आर्थिक सुधारणा कार्यक्रम खंबीरपणे राबविणारे डॉ. मनमोहनसिंग २०१२ मधील या मासिकाच्या लेखात 'सुमार कामगिरी करणारे' Underachiever ठरल्याची माहिती ते देतात.

थोडक्यात, या कालखंडात अनेक चांगल्या गोष्टी घडूनही १९९१ च्या आरंभी देश आर्थिक आपत्तीच्या उंबरठ्यावर उभा होता, ही वस्तुस्थिती त्यांनी स्पष्ट केली आहे. तसेच, २००४-१४ या राजकीयदृष्ट्या स्थिर काळात आणि अर्थतज्ज्ञ पंतप्रधान असूनही देशाची आर्थिक स्थिती खालावत गेल्याचे ते नमूद करतात.

**'मोदीनॉमिक्स'**

दुसऱ्या प्रकरणात तथाकथित 'मोदीनॉमिक्स' संकल्पनेचे स्पष्टीकरण आहे. लेखकाच्या मते, ज्याप्रमाणे शिवशाही किंवा चाणक्यनीती या संकल्पना त्यांच्या एकमेवाद्वितीय वैशिष्ट्यांमुळे ओळखल्या जातात, त्याचप्रमाणे 'मोदीनॉमिक्स' धोरणे निराळी ठरल्याने ही संज्ञा लोकप्रिय झाली आहे. जपानच्या पंतप्रधान शिंझो आबे यांचे देशाला चलनस्फितीच्या आपत्तीमधून बाहेर काढण्याचे धोरण - मुद्राविपुलता, वित्तीय प्रोत्साहने आणि संरचानात्मक सुधारणा असे 'त्रिसूत्री' होते. यामुळे जपान विकासपथावर आला.

त्यातूनच ‘आबेनॉमिक्स’ ही संज्ञा रूढ झाली. त्याचप्रमाणे ‘मोदीनॉमिक्स’ संज्ञा वापरली जाते, असे त्यांचे प्रतिपादन आहे.

येथे लेखकाने एक महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण असे दिले आहे की, जरी मोदी सरकारची सर्व आर्थिक धोरणे ‘मोदीनॉमिक्स’ या नावाने ओळखली जात असली तरी त्या सर्व कार्यक्रम/धोरणांचे जनक पंतप्रधान मोदीच असतील असे नाही. या कल्पना त्यांच्या सहकाऱ्यांकडूनही मांडल्या गेल्या असू शकतात. परंतु, कोणतेही धोरण नेत्याच्या नावे ओळखले जाण्याची पद्धत सर्वमान्य असल्यामुळे याला ‘मोदीनॉमिक्स’ हेच नाव पडले आहे.

लेखकाने पुढे स्पष्ट केले आहे की, ही संकल्पना काही जुन्या धोरणातील सुधारणा आणि काही नवी कोरी धोरणे असे मिश्रण आहे. मनरेगा, थेट लाभ हस्तांतरण अशा काही योजना अगोदरच्या शासनाच्या असून त्या मोदी शासनाने अधिक प्रभावी आणि कार्यक्षमतेने अंमलात आणल्या तर गेले दशकभर वादग्रस्त ठरलेली वस्तू आणि सेवा करप्रणाली सहज संमत होऊन २०१७ मध्ये लागू केली गेली. तसेच, नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल, रेरा, दिवाळखोरी संहिता, विमुद्रीकरण, जनधन योजना इत्यादी कार्यक्रम अतिशय वेगाने व धाडसाने अंमलात आणले गेल्याचे ते नमूद करतात.

या सर्व योजनांचे उद्दिष्ट वेगवान आर्थिक विकास आणि औद्योगिकरण हे होते. यासाठी पायाभूत सुविधा, पोषक वातावरण, पतक्षमता आणि उत्तरदायित्व व विश्वासार्हता यांची आवश्यकता असते. ‘मोदीनॉमिक्स’ धोरणाची पाच मूलभूत सूत्रे लेखकाने दिली आहेत-

१ वित्तीय धोरण सुसूत्रीकरण

२ धडाकेबाज hawkish मौद्रिक धोरण आणि सौम्य भाववाढ

३ संरचनात्मक सुधारणा

४ अर्थव्यवस्थेचे औपचारिकीकरण

५ क्षमताबांधणी/ निर्मिती आणि व्यवहार्य कल्याणकारी योजना

याचे स्पष्टीकरण करण्यासाठी लेखकाने अधिकच्या नोंदी आणि संदर्भही दिले आहेत. वरील सर्व कार्यक्रमांची तिहेरी उद्दिष्टे ते खालीलप्रमाणे सांगतात-

**१. विकास -** या अंतर्गत पायाभूत सुविधा प्रसार आणि उद्योग व कृषी विकास यांवर भर आहे. यासाठी भारतमाला परियोजना, सागरमाला प्रकल्प, सेतू भारतम, अंतर्गत जलमार्ग विकास, एकात्मिक ऊर्जा विकास योजना, उदय, उजाला, दीनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजना, सौभाग्य योजना, राष्ट्रीय राजमार्ग जिल्हा संजोक्त परियोजना अशा असंख्य कार्यक्रमांची जंत्री लेखकाने दिली आहे. लहान शहरे राष्ट्रीय महामार्गांना जोडणे ही निमशहरी आणि ग्रामीण भागाच्या विकासाच्या दृष्टीने अनोखी योजना आहे, असे लेखकाचे प्रतिपादन आहे.

मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया, स्टॅंडअप इंडिया या योजनांमुळे उद्योजकतावाढीला चालना मिळाली आहे तर सुलभ आणि जलद पतपुरवठ्यासाठी मुद्रा योजना हा कळीचा उपाय ठरू शकेल, तसेच स्किल इंडियासारख्या कार्यक्रमांमुळे उद्योगांना भेडसावणारी कुशल कामगार उपलब्धतेची समस्या दूर होऊ शकेल, असे लेखक स्पष्ट करतात.

शासनाद्वारे कृषीविकासासाठी जाहीर झालेल्या प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, पाणलोटक्षेत्र विकास आणि प्रधानमंत्री किसान संपदा योजनेद्वारे कृषी पायाभूत सुविधांची तरतूद होऊ शकेल, असे प्रमुख मुद्दे लेखकाने मांडले आहेत.

**२ सामाजिक सुरक्षा -** सामाजिक सुरक्षेत वाढ करण्यासाठी अपघात व जीवनविमा, निवृत्तीवेतन अशा सुविधा अतिशय क्षुल्लक रकमेच्या मोबदल्यात अंमलात आणल्या गेल्या आहेत. या योजना मोफत न देता त्यासाठी नाममात्र शुल्क आकारण्याचा हेतू लोकांना आपल्या सुरक्षिततेची जाणीव व्हावी आणि त्यासाठी अल्प का होईना मोबदला देण्याची मनोवृत्ती तयार व्हावी, हा असल्याचे लेखक स्पष्ट करतात.

**३. वित्तीय शिस्त-** यासाठी वित्तीय तुटीची काटेकोर मर्यादा पाळणे आणि जनधन योजना, थेट लाभ हस्तांतरण, वस्तू आणि सेवा कर, विमुद्रीकरण, अंकीकरण इत्यादी मार्गांनी हे आव्हान पेलण्याचा प्रयास केला जात असल्याचे लेखक नमूद करतात.

अशा प्रकारे मोदीप्रणीत धोरणाद्वारे भारतीय समस्यांना भारतीय पद्धतीने उत्तरे मिळवण्याचा प्रयत्न केला गेला, असेही लेखक म्हणतात. हे धोरण सावधगिरी prudence, प्रागतिकता pragmatism आणि समृद्धी prosperity यांचे देशातील लोकशाही, लोकसंख्या लाभांश व विकास यांच्याशी समन्वय साधणारे आहे, असा दावा पंतप्रधान मोदींनीच आपल्या कार्यकालाच्या पहिल्या वर्षात केल्याचा उल्लेख लेखक करतात.

लेखकाच्या दृष्टिकोनातून सारांशाने 'मोदीनॉमिक्स' म्हणजे समता आणि समावेशकता यांचे भारताच्या दृष्टीने अनुकूल ठरू शकणारे कल्याणकारी राज्याचे अर्थशास्त्र आहे. एका वाक्यात हे धोरण 'कमी खर्च करणारे आणि अधिक सक्षम बनवणारे शासन' Government less a spender , more an enabler या सूत्रावर आधारित असल्याचे ते सांगतात.

पुस्तकातील पुढील सहा प्रकरणे तीन ते आठ 'मोदीनॉमिक्स' धोरणाची कृषी, उद्योग, पायाभूत सुविधा, सामाजिक सुरक्षा, काळा पैसा निर्मूलन आणि राज्यवित्तीय आणि मौद्रिक धोरण या क्षेत्रातील कामगिरीचे तपशीलवार विवेचन करतात.

मोदीनॉमिक्स' जादुई धोरण की आभास- शेवटच्या म्हणजे नवव्या प्रकरणात 'मोदीनॉमिक्स' म्हणजे जादुई धोरण आहे की नुसताच आभास आहे, याचा तटस्थपणे ऊहापोह केलेला आहे.

यामध्ये लेखकाने पुन्हा एकवार १९९१ ते २०१४ या काळातील आर्थिक-राजकीय परिस्थितीचा विश्लेषक आढावा घेतला आहे. २००४-२०१४ या काळात शासन विकास योजनांच्या अंमलबजावणीच्या अंगाने कमी पडले, असा ते निष्कर्ष काढतात. आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ ते मिल्टन फ्रीडमनच्या उद्गारांचा आधार घेतात. "one of the greatest mistakes is to judge policies and programmes by their intentions rather than their results" केवळ चांगले हेतू व चांगली धोरणे असून भागत नाही, तर ती धोरणे राबवण्याची इच्छा व क्षमताही तितकीच महत्त्वाची असते. मोदी शासनाकडून लोकांच्या खूप अपेक्षा होत्या आणि त्यांनी आश्वासनेही खूप दिली होती, त्यामुळेच मोदी सरकारच्या धोरणांचे सातत्याने मूल्यमापन केले जात असल्याची टिप्पणीही ते करतात. त्यांच्या मते, २०१४-२०१८ हा चार वर्षांचा काळ कामगिरीचे मूल्यमापन करण्यासाठी अपुरा आहे. परंतु, भारतात कोणत्याही शासनाचा कार्यकाळ पाच वर्षांचाच असल्याने हे मूल्यमापन होणेही उचितच ठरते, असेही त्यांनी म्हटलेले आहे.

भारतात शासन चालवणे सोपे नाही आणि शासनाचे मूल्यमापन करणेही तितकेच अवघड असल्याचे नमूद करून लेखक हे स्पष्ट करतात की, कोणत्याही शासनाने काय केले यापेक्षा काय केले नाही, यावर त्याच्या कामगिरीचे मूल्यमापन केले

पाहिजे. लेखक मोदी शासनाचे मूल्यमापन पुढीलप्रमाणे करतात-

लोकप्रिय, सवंग धोरणांचा अवलंब न करणे ही मोदी शासनाची एक चांगली बाजू असल्याचे लेखक स्पष्ट करतात. तसेच, 'न केलेल्या' बाबींमध्ये मोठ्या पातळीतला भ्रष्टाचार हीदेखील या शासनाची जमेची बाजू असल्याचे ते म्हणतात. मागील सरकारने अर्धवट सोडलेल्या अनेक अयशस्वी योजना या शासनाने यशस्वीपणे राबवल्याचे ते नमूद करतात. लेखकाच्या मते मोदी शासनाने अनेक धोरणांद्वारे वृद्धिदरात वाढ, भाववाढीला आळा, चालू खात्यावरील तुटीत घट, वित्तीय तुटीची मर्यादा राखणे, परकीय गुंतवणूक आकर्षून घेणे, काळ्या पैशाविरोधी धोरणे, वस्तू आणि सेवा कराच्या अंमलबजावणीद्वारे अप्रत्यक्ष करांचे सुसूत्रीकरण, उद्योग सुलभतेत वाढ, केवळ दान दिल्याप्रमाणे कल्याणकारी योजना न राबवता त्यासाठी नाममात्र का होईना मोबदला आकारून सामान्य नागरिकाला जबाबदारीची जाणीव करून देणे, अनुदानातील गळती कमी करणे, दिवाळखोरी कायद्याद्वारे बँकांच्या बुडीत मालमत्तेवर मर्यादा आणणे इत्यादी आघाड्यांवर चांगली कामगिरी केल्याचे लेखक म्हणतात.

या व्यतिरिक्त काही बिगर आर्थिक क्षेत्रातील कामगिरीची नोंद घेताना शासनाने केलेल्या हरित अर्थव्यवस्था आणि ऊर्जेसाठी विद्युत वाहनांचा प्रसार, वनीकरणासाठी मोठी आर्थिक तरतूद, स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छता आणि शौचालय सुविधांचा प्रसार, पंचवार्षिक योजना समाप्ती, त्याऐवजी १५ वर्षे दूरदृष्टी आणि ३ वर्षे कृती योजनांची घोषणा, रोकडरहित अर्थव्यवस्थेकडे उचललेले पाऊल, अंकीय/संगणकीय अर्थव्यवस्थेची पायाभरणी असे काही मुद्दे मांडलेले आहेत.

**'मोदीनॉमिक्स' पुढील आव्हाने**

प्रकरणाच्या अखेरीस लेखक मोदी शासनापुढील आव्हानांचा थोडक्यात परामर्श घेतात. मोदी २.० काळात २०१९-२०२४ ही आव्हाने महत्त्वाची ठरू शकतात. यात थकीत कर्जांचा वाढता डोंगर, वाढत्या तरुण लोकसंख्येची आव्हाने, रोजगारनिर्मितीचा प्रचंड डोलारा, चीनसारख्या देशांशी असणारी आंतरराष्ट्रीय प्रादेशिक स्पर्धा, शेजारील देशांशी सलोख्याचे संबंध राखणे, उत्पन्न विषमता कमी करणे, वस्तुसेवा कर, भूमिअधिग्रहण आणि कामगार कायदे अंमलबजावणीतील सुधारणा तसेच, ग्रामीण आणि कृषी अर्थव्यवस्थेचा विकास हे ठळक मुद्दे दिलेले आहेत.

**समारोप**

एकंदरीत, लेखकाच्या मते 'मोदीनॉमिक्स' धोरण आभासी नाही किंवा जादुईही नाही. ती वास्तवात उतरू शकणारी बाब आहे, असे त्यांच्या चार वर्षांच्या कामगिरीवरून दिसते. कुठल्याही अनपेक्षित किंवा जलदगतीने आर्थिक विकास घडून येणार नाही, याची ते जाणीव करून देतात. २०१९ मध्ये पुन्हा मोदी सरकार सत्तेवर येईल की नाही यावर प्रचंड चर्चा सुरू असल्याचे सांगून लेखकाने असा निष्कर्ष काढला आहे की भारताच्या आर्थिक इतिहासात मोदींचे अर्थशास्त्र ऐतिहासिक ठरेल, यात शंका नाही.

दरम्यान २०१९च्या निवडणुकांचा निकाल लागून पुनश्च मोदी सरकार सत्तेत आले आहे. या पुस्तकात मांडलेल्या आव्हानांना नवे सरकार कसे तोंड देते हे आपण पाहूच. एखाद्या शासनाची आर्थिक धोरणांचा अभ्यासू, तटस्थ आणि मुद्देसूद आढावा घेण्याचे अतिशय महत्त्वाचे काम या पुस्तकाने केले आहे. त्यासाठी डॉ. गोविलकर यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

◆

# महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचाराची समर्पकता

**अविनाश निकम** †

ॲडम स्मिथ, मार्शल यांना ज्या अर्थाने अर्थशास्त्रज्ञ म्हटले जाते, त्या अर्थाने महात्मा गांधी हे अर्थशास्त्रज्ञ नाहीत. महात्मा गांधी यांनी अर्थशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ लिहिलेला नसला तरी देखील त्यांनी निर्धन नागरिकांच्या साहाय्यतेसाठी एक व्यावहारिक आर्थिक कार्यक्रम दिला आहे. महात्मा गांधी हे शास्त्रीय दृष्टीने अर्थशास्त्रज्ञ नसून देखील त्यांच्या विचारांनी भारतीय अर्थशास्त्रावर व्यापक प्रभाव पाडला आहे. गांधीवादी विचारधारा ही भारताच्या अर्थिक जीवनात महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त करते. महात्मा गांधी यांचे अर्थशास्त्राबाबत विचार पाश्चिमात्य अर्थशास्त्रज्ञांपेक्षा खूपच वेगळे आहेत. अर्थशास्त्राच्या व्याख्या अनेक अर्थशास्त्रज्ञांनी केल्या आहेत. ॲडम स्मिथच्या मते, संपत्तीचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय. मार्शलच्या मते, अर्थशास्त्र मनुष्याच्या त्या आर्थिक व्यवहाराचा अभ्यास करते, ज्यातून त्याला भौतिक कल्याण लाभते. तर गांधीजींच्या दृष्टीने अर्थशास्त्र जीवनाच्या सामाजिक, राजनैतिक आणि धार्मिक पैलूंनी युक्त आहे. नैतिकतेसंबंधी भावना त्यांच्या आर्थिक विचारात महत्त्वपूर्ण आहेत. गांधीजींच्या मते, अर्थशास्त्र ज्यामुळे कोणी व्यक्ती किंवा राष्ट्राच्या नैतिकतेस धक्का पोहचत असेल, तर ते शंभर वेळा त्याग करण्यायोग्य आहे. खरे अर्थशास्त्र तर सामाजिक न्यायाचा स्वीकार करते, अतिदुर्बल व्यक्तीसह सर्वांचे समप्रमाणात कल्याण करू इच्छिते. समाजात संपत्तीचे जे विषम विभाजन आहे, त्यास महात्मा गांधी एक सामाजिक समस्या म्हणत असत. कोणत्याही अर्थव्यवस्थेत संपत्तीचे थोड्या लोकांच्या हाती केंद्रीकरण होत असताना त्याचवेळी लाखो लोक बेरोजगार असतील तर तो एक मोठा सामाजिक अपराध आहे, असे ते मानत. गांधीजी अति भौतिकतेच्या विरोधात होते.

औद्योगिकरण, यांत्रिकीकरण यांबाबत महात्मा गांधी यांचे विचार सुस्पष्ट स्वरूपाचे होते. खरेतर, गांधीजी औद्योगिकरण अथवा यंत्राच्या विरोधात नव्हते. गावातील लाखो कारागिरांना काम देण्याचे सामर्थ्य असणाऱ्या लहान-लहान यंत्रांचे ते स्वागत करत असत. मोठमोठ्या कारखान्यांमध्ये विपूल प्रमाणात मालाचे उत्पादन घेण्यापेक्षा देशातील गावागावात, घरात, झोपड्यांमध्ये मालाचे उत्पादन घेणे योग्य ठरेल,

†माजी संपादक, अर्थसंवाद, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. : ८९८ , भ्रमणध्वनी : ९८२२६६५१४१, ई-मेल : avinashnikam70@yahoo.com

असे विचार व्यक्त करत. ज्याच्यामध्ये काम करण्याची क्षमता आहे अशा प्रत्येक व्यक्तीच्या हाताला काम मिळावे, अशी त्यांची इच्छा होती. गांधीजींच्या मते ग्रामोद्योग व कुटिरोद्योगांची कास धरल्याशिवाय रोजगार वृद्धीचे ध्येय गाठता येणार नाही. देशातील जी आर्थिक योजना ग्रामीण भागामध्ये बेरोजगार राहणाऱ्या मानवी साधन संपत्तीचा पुरेपूर उपयोग करत नाही त्या योजनेस बुद्धिमानी योजना म्हणता येणार नाही. गांधीजींच्या विचारानुसार आर्थिक विकासाचे सर्वोच्च लक्ष्य आत्मनिर्भरता प्राप्त करणे हे आहे. देश त्याचवेळी आत्मनिर्भर होऊ शकतो, ज्यावेळी देशातील सर्व गावे आत्मनिर्भर होतील. ग्रामीण क्षेत्राची निर्भरता शेतीक्षेत्रावर विसंबून आहे. शेती क्षेत्रात वर्षभर रोजगार प्राप्त होत नाही. ग्रामीण क्षेत्रात लघु-कुटीर उद्योगांना विकसित करणे गरजेचे आहे. कारण शेतकऱ्यांच्या विकासाशिवाय भारताच्या सर्वांगिण विकासाची कल्पना करणे अशक्य आहे.

महात्मा गांधी यांनी स्वदेशीला महत्त्वपूर्ण स्थान दिले आहे. आर्थिक व औद्योगिक जीवनात स्वदेशीपासून दूर गेल्यानेच मोठ्या प्रमाणात गरिबी आली आहे. देशात बाहेरून जर कोणतीच वस्तू आणली गेली नसती तर समृद्धी असती, असे त्यांचे मत होते. कारण भारत, इंग्लंड व्यापार संबंधांची उभारणी चुकीच्या पायावर झालेली होती. पुढे गांधीजी म्हणतात, *''मला जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात सरकारची ढवळाढवळ आवडत नाही, तरीही विदेशी वस्तूंवर जबर कर बसविला जाणे पसंत करेन. इंग्लंडने मुक्त व्यापार भारतावर थोपवून भारताचे नुकसान केले आहे.''* ज्या विदेशी वस्तूंची आयात केल्याने देशातील उद्योगधंद्यांना हानी पोहोचण्याचा संभव आहे, त्या सर्वांवर बहिष्कार घालणे हे गांधीजींचे अर्थशास्त्रीय सूत्र आहे. याचा अर्थ असा की, जी वस्तू स्वदेशात पुरेशा प्रमाणात निर्माण होऊ शकते, ती वस्तू विदेशातून कधीही आणता कामा नये. प्रत्येक विदेशी वस्तूचा बहिष्कार करणे, हे गांधीजींना मान्य नव्हते. म्हणूनच स्वदेशीची व्याख्या, देशातील उद्योगांचे रक्षण होण्यासाठी विदेशी सोडून स्वदेशी उत्पादनांचा वापर ही आहे.

ग्रामस्वराज्य, स्वदेशी नियोजन, आदर्श आर्थिक व्यवस्था, खादी ग्रामोद्योग, आर्थिक समानता, शेतकरी विकास, औद्योगिक क्षेत्रातील मजूर, आर्थिक विकास व आत्मनिर्भरता, भूमिसुधार व शेती विकासाचे सूत्र, ग्रामोन्मुख विकेंद्रित अर्थव्यवस्था, गावांची आत्मनिर्भरता, आर्थिक विषमतेचे निर्मूलन, मानवी श्रमाचे महत्त्व, औद्योगिकरण व यांत्रिकीकरण, पंचायती राजव्यवस्था याबाबत महात्मा गांधी यांनी आपली स्वतंत्र विचारधारा व्यक्त केली आहे. याशिवाय देश व समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी २१ सूत्री रचनात्मक कार्यक्रमाचा विचार प्रस्तुत केला आहे.

भारताच्या आर्थिक, सामाजिक परिस्थितीत स्वातंत्र्योत्तर काळात व्यापक परिवर्तन झाले आहेत. वर्तमानात जागतिकीकरण स्वीकारलेल्या खुल्या अर्थव्यवस्थेला महत्त्व प्राप्त झाले आहे, असे असले तरी आज देखील देशाच्या सर्वांगिण विकासासाठी गांधीजींच्या विचारांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. जगाला जर आपले अस्तित्व कायम ठेवायचे असेल, कल्याणाच्या मार्गाला जायचे असेल तर गांधी विचारांना पर्याय नाही!

प्रथम तांत्रिक चर्चासत्रासाठी निर्धारित केलेल्या विषयावर शोधनिबंध लिहिताना महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांविषयी एक-दोन मुद्दे निवडल्यास उत्तम ठरेल. गांधीजींनी व्यक्त केलेल्या अनेक मुद्द्यांना एकत्रित स्वरूपात लेखात समाविष्ट केले तरी चालेल. महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांचे विश्लेषण

शोधनिबंधात सादर करताना त्या विचारांची वर्तमानकाळातील समर्पकता व उपयुक्तता व्यक्त करणे अपेक्षित आहे. त्यासाठी काही विषय पुढीलप्रमाणे सुचविता येतील.

१) महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार.
२) आर्थिक विकास, आत्मनिर्भरता व ग्रामोद्योगाचा विकास.
३) महात्मा गांधी यांचा रचनात्मक कार्यक्रम.
४) खादी ग्रामोद्योग व रोजगार निर्मिती.
५) ग्रामोन्मुख विकेंद्रित अर्थव्यवस्था.
६) स्वदेशी-अर्थ आणि आशय.
७) गांधीजी आणि अर्थकारण.
८) गांधी विचार - अर्थव्यवस्थेचा आधार.
९) महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची सार्थकता.
१०) महात्मा गांधी यांच्या आर्थिक विचारांचे मूल्यमापन.
११) गांधीवादी अर्थशास्त्राची उपयुक्तता.
१२) औद्योगिकरण, यांत्रिकीकरणाविषयी महात्मा गांधी यांचे विचार.
१३) महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज्य संकल्पना.
१४) महात्मा गांधी यांचे भूमिसुधार व शेतीविकासाचे सूत्र.

याशिवाय या सर्व शीर्षकांच्या अनुषंगाने इतर उपविषयांवर देखील शोधनिबंध सादर केल्यास त्यांचे स्वागतच आहे. महाविद्यालयांच्या ग्रंथालयात महात्मा गांधीजींवर बरीच पुस्तके व संदर्भग्रंथ उपलब्ध असतात. काही शहरांमध्ये तर गांधीजींवर स्वतंत्र ग्रंथालये आहेत, त्यांचा उपयोग शोधनिबंध लेखकांना करता येईल. तसेच इंटरनेटचा देखील उपयोग करता येईल.

◆

---

भूगोलाने आम्हाला शेजारी केले आहे,
इतिहासाने आम्हाला मित्र बनवले आहे,
अर्थशास्त्राने आम्हाला भागीदार केले आहे आणि
गरजांनी आम्हाला सहयोगी बनविले आहे.
ज्यांना भगवंताने एकत्र जोडले आहे, त्यांना कोणीही अडवू नये.

**- जॉन एफ. केनेडी**

---

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४३ वे राष्ट्रीय अधिवेशन
निबंधलेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयाची रूपरेषा

# भारतीय शेतीसंबंधी पारित करण्यात आलेल्या कायद्याचे पुनरावलोकन

**विकास विनायक सुकाळे** †

**प्रास्ताविक**

भारतात शेतीसंबंधीचे कायदे संविधानाच्या नवव्या परिशिष्टामध्ये आहेत. नवव्या परिशिष्टामध्ये जे कायदे आहेत त्या कायद्याच्या विरोधात न्यायालयात जाता येत नाही. शेतीशिवाय इतर अनेक कायदे हे या परिशिष्टाच्या बाहेर आहेत. म्हणून नववे परिशिष्ट समजून घेणे आवश्यक आहे. १९४७ पूर्वी भारतात अंतरिम सरकार होते. स्वातंत्र्यानंतरही काही काळ तेच सरकार कायम राहिले. अंतरिम सरकारद्वारा संविधानसभा गठीत करण्यात आली होती. मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. घटना समितीचे कामकाज ९ डिसेंबर १९४७ रोजी सुरू झाले. ते २ वर्षे ११ महिने व १८ दिवस चालले. २४ जानेवारी १९५० ला राज्यघटना मंजूर करून २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना देशाला लागू झाली. या संविधानामध्ये एकूण आठ परिशिष्ट (अनुसूची) होते. परिशिष्ट (अनुसूची) म्हणजे ज्या बाबींचा उल्लेख संविधानाच्या अनुच्छेदात झाला आहे पण त्या ठिकाणी तपशील देण्यात आलेला नाही तो तपशील देण्यासाठी परिशिष्ट जोडले जाते.

भारताच्या मूळ संविधानात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ आठ परिशिष्टे जोडली होती. पुढे नववे परिशिष्ट जोडण्यासाठी १८ जून १९५१ रोजी पहिली घटना दुरुस्ती केली व अनुच्छेद ३१-बी चा संविधानात समावेश करण्यात आला. त्यानुसार या परिशिष्टात ज्या कायद्याचा समावेश आहे ते कायदे न्यायालयाच्या कक्षेबाहेर राहतील, असे या परिशिष्टाचे स्वरूप आहे.

आजच्या घडीला परिशिष्ट ९ मध्ये २८४ कायदे आहेत. त्यापैकी थेट शेती व शेतकऱ्यांशी संबंधित २५० पेक्षा जास्त कायदे आहेत. उरलेल्या कायद्याचा शेतीशी अप्रत्यक्ष संबंध आहे. हे सर्व कायदे न्यायालयापासून दूर आहेत. उदा. आवश्यक वस्तू कायदा, जमीन अधिग्रहण कायदा, सिलींग कायदा, आदिवासींनी बिगर आदिवासींना जमीन विकण्याचा कायदा, वन्यजीव संरक्षण कायदा, वारसा हक्क कायदा, शेती उत्पन्न आयकरातून वगळणारा कायदा इ.

**शेतीसंबंधी कायदे - शेती व शेतकरी**

शेती हा विषय राज्य सरकारचा असूनही यात हस्तक्षेप करून भारत सरकारने शेतीसंबंधी कायदे

† अर्थशास्त्र विभाग प्रमुख (पदवी, पदव्युत्तर व संशोधन केंद्र) पीपल्स कॉलेज, नांदेड.
आजीव सभासद क्र. : ५२३, भ्रमणध्वनी : ९४२३३४५१४५, ई-मेल :vvsukale@gamil.com

९व्या परिशिष्टात घातले. त्यावेळी सरकारची भूमिका समाजवादी समाजरचनेची होती. आज सरकारच्या भूमिकेत काही अंशी बदल झाला आहे. त्यामुळे या कायद्याचे पुनरावलोकन होणे आवश्यक आहे. आजपर्यंतचा अनुभव असा आहे की, या कायद्याचा भारतीय शेती व शेतकरी यावर प्रतिकूल परिणाम होत आहे. म्हणून या कायद्याचे पुनरावलोकन होणे आवश्यक आहे. या कायद्याचा शेती उत्पादनासाठी किती फायदा झाला? या कायद्यामुळे शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढली काय? शेतीमध्ये रोजगार वाढला काय? शेतीच्या तुकडीकरणाचे परिणाम काय झाले? आज शेतीसंबंधी कायदे कालबाह्य झालेत काय? याचे मूल्यमापन शोधनिबंध लेखकाकडून व्हावे, ही अपेक्षा आहे.

**अपेक्षित शोधनिबंध**

१) महाराष्ट्रात सिलींगचा कायदा १९६१ मध्ये झाला. त्याची अंमलबजावणी १९७१ पासून झाली. महाराष्ट्रात कोरडवाहू जमिनीची मर्यादा ५४ एकर व बागायत १८ एकर आहे. यामुळे जमिनीचे विखंडन झाले, यामुळे लहान तुकड्यावर भांडवली गुंतवणूक झाली नाही, या कायद्यामुळे शेतकऱ्यास मुक्तपणे शेती व्यवसाय करता येत नाही किंवा या कायद्याचा शेतीला फायदा झाला असेल तर काय झाला असे विविध मुद्दे घेऊन शोधनिबंध तयार करता येतो.

२) भारतातील शेतकऱ्यांची जमीनधारणा (होल्डींग) सरासरी अडीच एकरच्या आत आहेत व यात घट होत आहे. तर जगात अमेरिका सरासरी होल्डींग ४५० एकर, ब्राझील २०० ते १००० एकर, ऑस्ट्रेलिया सरासरी ५००० एकर याचा तुलनात्मक अभ्यास करून त्याचा शेती उत्पादनावर काय परिणाम होतो ते शोधनिबंधामध्ये विश्लेषण करता येईल.

३) भारतात आवश्यक वस्तूचा कायदा-१९५५ मध्ये आला. या कायद्यामध्ये आवश्यक वस्तूची व्याख्या नाही. कायद्यात म्हटले आहे की, सरकार ठरवेल ती आवश्यक वस्तू. या कायद्यात दोन हजारपेक्षा अधिक वस्तूंची यादी आहे. यात प्रामुख्याने शेती उत्पादनाच्या वस्तू आहेत. या कायद्यामुळे सरकार शेतमालाच्या किमतीवर व विक्रीवर निर्बंध घालते हा कायदा औषधी वस्तू व औद्योगिक वस्तूंना लागू नाही. याचा परिणाम असा होतो की, एखाद्या शेतमालाचे उत्पन्न कमी झाले तर त्याच्या वाढीव किमतीचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही. यामुळे शेती उत्पन्नात अनिश्चितता निर्माण झाली. या कायद्याचा शेतीवरील परिणाम शोध निबंधामध्ये अभ्यासता येतो.

४) आवश्यक वस्तू कायद्यामुळे ग्रामीण उद्योजकता निर्माण झाली नाही, कच्च्या मालावर प्रक्रिया उद्योग निर्माण झाले नाहीत, हे शोधनिबंधात स्पष्ट करता येते.

५) भारतामध्ये जमीन अधिग्रहण कायदा आहे. त्या कायद्यात बदल करून भूसंपादन कायदा २००७ या नावाने लोकसभेत बील मांडले. २०१४ पासून कायदा लागू आहे. या कायद्याचा गैरवापर होत आहे. सरकार शेतकऱ्याच्या जमिनी घेऊन खाजगी कारखानदाराला देत आहे. भारतात या अंतर्गत विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) निर्माण करण्यात आले. या विशेष आर्थिक क्षेत्राचे (SEZ) मूल्यमापन करता येईल.

६) कंपनीला सिलींगचा कायदा लागू नाही. यामुळे एखाद्या कंपनीच्या नावावर कितीही जमीन खरेदी करता येते. यामुळे अनेक कंपन्यांनी जमीन घेऊन

त्या पडीक ठेवलेल्या आहेत. ही एक प्रकारे राष्ट्रीय संपत्तीचा दुरुपयोग आहे. भारतात कोणत्या कंपनीची किती जमीन आहे, त्या जमिनीचा किती प्रमाणात उपयोग होत आहे. परिणामी, शेतीच्या एकूण उत्पादनात किती घट झाली याचा शोध घेऊन शोधनिबंध तयार करता येतो.

७) भारतात शेती उत्पन्नाला करातून वगळलेले आहे. मुळात शेती हा तोट्यात चालणारा व्यवसाय आहे. त्यामुळे केवळ शेतीवर करपात्र उत्पन्न मिळत नाही. सध्या या कायद्याचा गैरवापर होत आहे. डॉक्टर, इंजिनिअर, व्यापारी इ. अनेक लोक शेतीचे खोटे उत्पन्न दाखवून सरकारची फसवणूक करतात. कोणी, किती शेतीचे उत्पन्न दाखवले याचा गैरफायदा कसा घेतला जातो, याचा शोध घेऊन संशोधन करता येते.

अशा प्रकारे शेतीसंबंधी अनेक कायद्याचे मूल्यमापन करून त्यांचा शेतीवरील परिणाम अभ्यासता येतो. हे कायदे संविधानाच्या ९ व्या परिशिष्टात असल्यामुळे त्या विरुद्ध कोर्टात जाता येत नाही. यामुळे एक प्रकारचे शेतकऱ्यांचे स्वातंत्र्य नाकारले आहे. असे विविध मुद्दे घेऊन शोधनिबंध लिहावेत व यावर सखोल चर्चा व्हावी, ही अपेक्षा आहे.

**संदर्भ**


१. अमर हबीब - शेतकरी विरोधी कायदे, परिसर प्रकाशन, अंबाजोगाई मो.८४११९०९९०९
२. आवश्यक वस्तू कायदा १९५५.
३. भारतीय संविधान व नववे परिशिष्ट.
४. जमीन अधिग्रहण कायदा १९५०.
५. खंडागळे सुभाष, शेतकऱ्यांना गळफास ठरलेल्या घटनादुरुस्त्या, परिसर प्रकाशन अंबाजोगाई.
६. महाराष्ट्रातील सिलींग कायदा १९६१.
७. वारसा हक्क कायदा


◆

जेव्हा उत्पन्न खर्चापेक्षा जास्त असते आणि खर्च स्वत:च्या इच्छेप्रमाणे असतो तेव्हा तो खरा श्रीमंत असतो.

**- एडवर्ड गिब्बन**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४३ वे राष्ट्रीय अधिवेशन
निबंधलेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयाची रूपरेषा

# ‘महाराष्ट्राच्या जडणघडणीत छत्रपती शिवाजी महाराजांचे योगदान’

**एस. एस. कावळे** †

खालील उपविषय घेऊन शोधनिबंध तयार करता येतील त्यात शोधनिबंधासाठी पुढील संभाव्य मुद्दे चर्चेसाठी घेता येतील.

**१) शिवाजी महाराजांच्या जडणघडणीत राजमाता जिजाऊंचे योगदान :** शिवाजींचा जन्म, तत्कालीन महाराष्ट्राची स्थिती, राजमाता जिजाऊंनी केलेले संस्कार, बालशिवाजीसमोर ठेवलेले स्वप्न,आदर्श राजा बनण्यासाठी केलेली मनोभूमिका, हिंदवी स्वराज्य निर्माण करण्याचे शिवाजी महाराजांचे बालपणीचे धाडस.

**२) शिवाजी महाराजांची स्वराज्याची पायाभरणी :** महाराष्ट्राची भौगोलिकस्थिती व शिवाजी महाराजांची राजनिती आणि गनिमीकावा.

**३) शिवाजी महाराज व मोगल संबंध :** शिवाजी व विजापूर दरबाराशी झालेला संघर्ष, आदिलशाहीशी संघर्ष, शाहिस्तेखानाची स्वारी, अफजलखानाचा वध आणि परकीय सत्तेशी संघर्ष.

**४) शिवाजी महाराजांची आग्रा भेट :** मराठा प्रदेशावर जयसिंहाची स्वारी, पुरंदरचा तह, आग्राभेट, आग्राहून सुटका.

**५) शिवाजी महाराजांची युद्धनिती एक मूल्यमापनः** महाराष्ट्राच्या भौगोलिक स्थितीचा फायदा घेण्यासाठी वापरलेली गनिमीकावा युद्धनिती त्यांचे मराठ्यांच्या इतिहासावर झालेले परिणाम.

**६) शिवाजी महाराज एक जाणता राजा :** शिवाजी महाराजांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, शिवाजी महाराजांमध्ये असणारे सर्व आदर्शवत गुणांची ओळख, विविध प्रसंगातून देता येईल. धाडसीपणा, चातुर्य, राजकीय दृष्टिकोन, माणसाची पारख, प्रत्येकामधील चांगल्या गुणांचा उपयोग स्वराज्यासाठी करून घेण्याचे कसब/कौशल्य.

**७) शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक :** शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक करण्याची गरज ह्याकरिता जबाबदार घटक किंवा कारणे.

**८) शिवाजी महाराजांची राज्यव्यवस्थाः** शिवाजींचे अष्टप्रधान मंडळ व त्याची वैशिष्ट्ये.

**९) शिवाजी महाराजांची धार्मिक निती :** हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याची भावना, स्वधर्मप्रेम, स्वाभिमान, धर्मरक्षणाची गरज, स्त्रीरक्षण, गोरक्षण इत्यादी.

†प्राचार्य, श्री गोविंद प्रभू कला, वाणिज्य महाविद्यालय, तळोधी (बाळापूर), ता. नागभीड, जि. चंद्रपूर.
आजीव सभासद क्र. : १११४, भ्रमणध्वनी : ९४२०१४३८१० , ई-मेल : principalsgpmv@gmail.com

**१०) शिवाजी महाराजांचे सर्वधर्मसमानतेचे धोरणः** उदाहरणाद्वारे स्पष्ट करणे, दुसऱ्या धर्मात गेलेल्यांना पुन्हा स्वधर्मात आणण्यासाठी वापरलेली नीती.

**११) शिवाजी महाराजांची आदर्श न्याय्यव्यवस्थाः** शिवाजीच्या न्याय्यव्यवस्थेची वैशिष्ट्ये, न्याय्यप्रिय राजा त्यामुळे कल्याणकारी राज्य कसे निर्माण झाले त्याचे विश्लेषण यात करता येईल.

**१२) शिवाजी महाराजांच्या काळातील गडकिल्ले व त्यांचे महत्त्व :** महाराष्ट्राच्या भौगोलिक स्थितीचा फायदा अचूक घेऊन डोंगराळ प्रदेशात स्थापन केलेले मजबूत व भक्कम किल्ले, महत्त्वाच्या किल्यांची नावे व त्याचा राज्यकारभारासाठी झालेला उपयोग.

**१३) शिवाजी महाराजांचे आरमार धोरण व त्यांचे महत्त्वः** शिवाजीचे नौदल, जलदुर्ग तयार करण्याची कारणे, परकीय सत्तेचा दिलेला शह, नौदलाचे महत्त्व व त्यातून महाराजांचा दूरदृष्टीपणा इत्यादी संरक्षण धोरणातून केलेली राज्याची मांडणी.

**१४) शिवाजी महाराजांचे आर्थिक धोरणः** प्रजेच्या भरणपोषणासाठी सैन्याची साहित्य व्यवस्था, दाणागोटा आर्थिक नियोजनाचा आढावा घेता येईल.

**१५) शिवाजी महाराजांची सैन्यव्यवस्था व त्याचे परिणाम :** शिवाजीच्या सैन्यात असलेली शिस्त, सैन्याला लावून दिलेले नियम, त्याचा राज्यव्यवस्थेवर झालेला परिणाम. शिवाजी महाराजांच्या विजय कार्यातून शिवाजीचे चतुर्स्थ राजकारण, धाडसीपणा व दूरदृष्टीतून घेतलेले निर्णय या सर्वांगा महाराष्ट्राच्या जडणघडणीवर परिणाम झालेला आहे. शिवाजी महाराजांच्या सर्वगुणांचा अभ्यास केल्यानंतर महाराष्ट्रासाठी शिवाजी महाराज एक प्रेरणास्थान ठरलेले आहेत.

सदर शोधनिबंधासाठी खालील संदर्भग्रंथाचा उपयोग करता येईल.

**संदर्भ ग्रंथ सूची**


1) Dr. Balkrishna - Shivaji the Great
2) Kulkarni, Dr. A.R. - Maharashtra in the age of Shivaji
3) Pagadi, Setumadhavrao - Chhhatrapati Shivaji
4) Sardesai, G.S.-Main currents of Maratha History
5) Sarkar, J.N. - House A Shivaji
६) आठवले, सदाशिव - शिवाजी व शिवयुग
७) बेंद्रे, व्ही. एस. - श्री छत्रपती शिवाजी महाराज
८) देसाई रणजित - श्रीमानयोगी
९) देसाई, रणजित - पावनखिंड
१०) देसाई, रणजित - लक्ष्यवेध
११) गोडबोले, रविंद्र - औरंगजेब शक्यता आणि शोकांतिका
१२) जोशी, शं.ना.(संपादक)- छत्रपती श्रीशिवाजीराजे यांची बखर, पुणे १९६०,
१३) जाधव, प्रा. नामदेव - शिवराय
१४) केळूसकर, कृ.अ. - छत्रपती शिवाजी महाराज
१५) केळूसकर - छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र
१६) कुलकर्णी अ. रा. - शिवकालीन महाराष्ट्र
१७) कुलकर्णी, अ.रा. आणि खरे, ग.ह. (संपादक) - मराठ्यांचा इतिहास भाग-१
१८) खोले, विलास (संपादक) - आज्ञापत्र
१९) मेहेंदळे, गजानन भास्कर - श्री राजाशिवछत्रपती भाग १ व २
२०) पगडी, सेतूमाधवराव - शिवचरित्र एक अभ्यास
२१) पानसरे, गोविंद - शिवाजी कोण होता?
२२) पाटील, विश्वास - संभाजी

२३) पुरंदरे, बाबासाहेब - राजाशिवछत्रपती
२४) सणस उमेश - शिवप्रताप
२५) सेन एस. एन. - मराठ्यांची लष्करी व्यवस्था
२६) शेवडे, डॉ.सच्चिदानंद/परूळकर, दुर्गेश - शिवरायांची युद्धनीती
२७) शिवदे सदाशिव - शिवपत्नी सईबाई
२८) श्रीखंडे, शशिकांत - औरंगजेब
२९) तेंडुलकर, महेश - साद-पन्हाळा ते विशाळगडाची
३०) वैद्य, चि.वि. - मराठा स्वराज्य संस्थापक श्रीशिवाजी महाराज

◆

---

अर्थव्यवस्थेबद्दल सरकारचा दृष्टिकोन थोड्या थोड्या वाक्यात सारांशित केला जाऊ शकतो. जर अर्थव्यवस्था चालत असेल तर कर घ्या, पळत असेल तर नियंत्रित करा, थांबली असेल तर अनुदान द्या.

**- रीगन**

---

श्रीमंत होण्यासाठी कष्टासोबत बुध्दी आणि नियोजनाचीही जोड लागते.
नुसत्या काबाडकष्टाने श्रीमंत होता आले असते तर,
रोजंदारीवरचा मजूर जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती झाला असता.

**- आचार्य चाणक्य**

---

# डॉ. नी. भा. सप्रे

**संतोष दास्ताने** †

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य आणि अर्थशास्त्राचे ज्येष्ठ व अभ्यासू प्राध्यापक डॉ. नी. भा. सप्रे यांचे पुणे येथे दि. २६ एप्रिल २०१९ रोजी दुःखद निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ८९ वर्षे होते. त्यांचा व माझा सुमारे पाच दशकांचा सहवास आणि परिचय होता. पुणे विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण घेत असताना मी त्यांचा विद्यार्थी होतो. नौरोसजी वाडिया महाविद्यालयात ते अर्थशास्त्राचे प्राध्यापक, विभाग प्रमुख, उपप्राचार्य व नंतर प्राचार्य होते, मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे ते आजीव सदस्य होते, अशा सर्व टप्प्यांमध्ये मी त्यांच्याबरोबर काम केले. त्यांच्या सहवासाचा व अनुभवाचा मला लाभ मिळाला. त्यांच्याशी माझे भावासारखे नाते होते, त्यामुळे त्यांचे निधन मला व्यक्तिशः अतिशय शोचनीय वाटते.

डॉ. सप्रे हे हाडाचे शिक्षक होते. नेहमी सुटाबुटात वावरणारे, इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांमध्ये अगदी अस्खलित व्याख्याने देणारे सर मला अजूनही स्पष्ट आठवतात. दिलेला अभ्यासक्रम शिकवताना विद्यार्थ्यांस ते स्वतः विचार करायला शिकवीत. त्यांचे वाचन चौफेर व अद्ययावत असे. बँकिंग व वित्तीय संस्था हा विषय शिकवताना बँकिंग व्यवहार, कायदे, आंतरराष्ट्रीय घडामोडी, न्यायालयीन निवाडे, घटनात्मक तरतुदी या सर्वांना ते चर्चेमध्ये आणीत व विषयाची व्यापकता आणि सखोलता विद्यार्थ्यांच्या मनावर ठसवीत. विषयाची तयारी करताना रिझर्व्ह बँकेची प्रकाशने, इकॉनॉमिस्ट (साप्ताहिक), इकॉनॉमिक टाइम्स, बीबीसीवरील बातम्या, चर्चा यांचा ते आधार घेत. एका अभ्यासक्रमाला एकच क्रमिक पुस्तक वापरून काम भागवावे अशा मानसिकतेतल्या विद्यार्थ्याला अभ्यासाचा असा विस्तीर्ण आवाका अडचणीचा वाटे. 'अभ्यास आणि उजळणी करण्यासाठी एखादे सोपे क्रमिक पुस्तक सांगा' असा एका व्याख्यानाच्या वेळेस आम्ही विद्यार्थ्यांनी हट्टच धरला. त्यांनी आमची मागणी नम्रपणे नाकारली. पण वेगवेगळ्या ठिकाणहून माहिती तसेच अभ्यासासाठी मुद्दे कसे मिळवावेत हे त्यांनी सोदाहरण व तपशीलवार स्पष्ट केले. विद्यार्थ्याला स्वतःच्या अभ्यासासाठी उद्युक्त आणि प्रेरित करणे ही त्यांची शैली होती. विद्यार्थ्यांना सहज समजेल अशा सोप्या भाषेतील मांडणी व क्रमिक पुस्तकांच्या पलीकडे जाऊन केलेले तर्कशुद्ध सुगम विवेचन यामुळे त्यांच्या व्याख्यानांमधून भरपूर वैचारिक खाद्य मिळे. त्या वेळेस भारतातील मोठ्या व्यापारी बँकांचे नुकतेच राष्ट्रीयीकरण

† माजी अध्यक्ष व विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. : ६४, भ्रमणध्वनी : ९८२२००९९५४ , ई-मेल : santosh.dastane@gmail.com

झाले होते व नव्या शाखा उघडण्याचा तुफानी कार्यक्रम सुरू झाला होता. पण बँकांनी आपली मानसिकता बदलावी व निधी व्यवस्थापन व्यवस्थित करावे अशा अपेक्षा सरांनी त्या वेळेस चर्चेमध्ये बोलून दाखवल्या होत्या. त्या घटनेला आता पन्नास वर्षे उलटून गेली. नेमके तेच मुद्दे कळीचे ठरत आहेत, असे आज आढळून येत आहे. त्यांच्या विवेचनातील दृष्टेपणाला आणखी कोणता पुरावा हवा?

सार्वजनिक वित्तव्यवहार हे त्यांचे विशेषीकरण होते. त्यातही केंद्र-राज्य वित्तीय संबंध हा त्यांच्या सूक्ष्म विशेषीकरणाचा भाग होता. त्यांचा स्वत:चा पीएच.डी. पदवीसाठी संशोधन अभ्यास चालू असताना त्या वेळच्या वित्त आयोगाच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करण्याची त्यांना वारंवार संधी मिळाली होती. केंद्र सरकारची व राज्य सरकारांची अंदाजपत्रके तयार करण्याची पद्धती, त्यातील आकडेवारीच्या गफलती, आकडे कमी किंवा जास्त दाखवण्याची कसरत या सर्व गोष्टी ते रंगवून सांगत. वित्त आयोगाच्या अहवालांचा अभ्यास करताना पडद्यामागच्या या सुरस आणि चमत्कारिक कथांनी तो काहीसा रूक्ष अभ्यास मनोरंजक होऊन जाई. एका राज्यात कडकडीत दुष्काळ पडलेला असताना सरकारने ‘पूर परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी’ कशी मदत पाठवली होती अशा आठवणी ते सांगत. वार्षिक अंदाजपत्रक अर्थमंत्र्यांनी सादर केल्यानंतरची त्यांची मते/प्रतिक्रिया अभ्यासपूर्ण व मार्मिक असत. त्यांनी आपल्या आवडीच्या विषयांवर सतत मनन-चिंतन-चर्चा यांचा सिलसिला चालू ठेवला. पण प्रत्यक्ष लेखन मात्र अगदी मोजके केले. स्थानिक स्वराज्य संस्था पातळीवरील अर्थव्यवहारांचे सबलीकरण व्हावे यासाठी त्यांनी एक पुस्तकही लिहिले होते. त्यांच्या प्रतिमानावर एक चर्चासत्र आयोजित करावे असे आम्ही तत्त्वत: ठरवले होते, पण ते काही कारणांनी राहून गेले, याची आज खंत वाटते.

ते प्राचार्य असलेल्या वाडिया महाविद्यालयाचा आणि ते ज्या मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य होते त्या पितृसंस्थेचा सुवर्ण महोत्सव १९८२ साली साजरा झाला. त्या निमित्ताने प्रसिद्ध करण्यात आलेल्या स्मरणिकेत त्यांनी संस्थेच्या आर्थिक व्यवहारांचे विश्लेषण करणारा एक प्रदीर्घ संशोधनात्मक व टीकात्मक लेख लिहिला होता. सार्वजनिक न्यासांचे अर्थकारण कसे असावे, त्यात भविष्यकालीन घडामोडी काय असणार आहेत यांची चर्चा होती. तशा पद्धतीचे शैक्षणिक कार्य करणाऱ्या अनेक संस्थांनी त्या वेळेस त्या लेखाची दखल घेतली व त्यावर चर्चा केल्या असे आज आठवते. संस्थेच्या सनदी लेखापालांनीही त्या लेखास दाद दिली होती.

महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर विभाग सुरू करणे व दरवर्षी आर्थिक विषयावर एक चर्चासत्र घेणे या गोष्टी त्यांनी सुरू केल्या. नवनवीन विषय व ख्यातनाम वक्त्यांची हजेरी यामुळे ही चर्चासत्रे हा त्या काळी एक अनोखा उपक्रम ठरत असे. शून्याधार अंदाजपत्रकावरील चर्चासत्राची त्या काळच्या काही आमदारांनी दखल घेतली होती व त्या विषयावर पुन्हा चर्चा करण्यासाठी ते महाविद्यालयात चर्चेला आले होते. डॉ. वि. म. दांडेकर, डॉ. हरिभाऊ परांजपे, डॉ. नीळकंठ रथ अशा मातब्बर व्यक्तींच्या विचारांचा आस्वाद त्याद्वारे घेता आला. महाविद्यालयात वक्तृत्व विभाग, निबंध स्पर्धा यात त्यांचा पुढाकार असे. पुणे विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे ते काही काळ सदस्य होते. पदवी व पदव्युत्तर पातळीवर अभिनव अभ्यासक्रम सुरू करणे असे प्रयोग त्यांनी केले. आर्थिक विचार व आर्थिक इतिहास यांचा समन्वय असणारा एक अपारंपरिक असा पेपर पदवी अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात त्यांचा पुढाकार होता. अर्थशास्त्राच्या सभोवतालच्या विद्याशाखांशी विद्यार्थ्यांचा नुसता परिचयच नव्हे तर पूर्ण अभ्यास असला पाहिजे असा

त्यांचा आग्रह असे. औद्योगिक वित्तपुरवठा या विषयाच्या अभ्यासात बँकांचे आणि वित्तीय संस्थांचे व्यवहार, त्यांची कार्यपद्धती, त्यांच्या ताळेबंदांचे विश्लेषण, शेअर बाजार, शेअर बाजारांची कार्यपद्धती, त्याबद्दलच्या कायदेशीर तरतुदी अशा काहीशा वाणिज्य विषयात मोडणाऱ्या उपविषयांचा समावेश आवर्जून असावा, असा त्यांचा विचार असे. संघराज्यीय वित्तव्यवहारांच्या अभ्यासात भारतीय राज्यघटना, त्यासंबंधांची न्यायालयीन निकालपत्रे, लोकप्रशासनाचा आकृतिबंध, देशातील राज्यव्यवस्था यांचा ठळक समावेश असावा - ओझरता उल्लेख नको असे ते स्पष्टपणे मांडत. त्यांचा स्वत:चा शेअर मार्केटचा चांगला अभ्यास होता. व त्यातील चढउतारांवर ते मार्मिक भाष्य करीत. शेअरमध्ये ते नियमितपणे गुंतवणूकही करीत असत. पण त्यांच्या नेमस्त स्वभावानुसार तेथे त्यांनी कधी धोकादायक व्यवहार केले नाहीत. कंपन्यांच्या कामगिरीचा अभ्यास करण्यावर त्यांचा भर असे.

अर्थशास्त्र परिषदेबद्दल त्यांना विशेष जिव्हाळा होता. काही निवडक अधिवेशनांना त्यांनी हजेरीही लावली होती. रवीन्द्र सबनीस, आनंद नाडकर्णी, यशवंत रारावीकर, व्यं. सु. पाटणकर या समवयस्क प्राध्यापकांच्या सहवासात ते रमत असत. अर्थसंवादचे त्यांचे बारकाईने वाचन असे. 'अर्थ शब्दांची वाट पाहे' या सदराची पाने चाळताना त्यात त्यांनी भरपूर लेखन केलेले आढळेल. मी ज्या वर्षी परिषदेचा अध्यक्ष होतो त्या वर्षीचे माझे अध्यक्षीय भाषण 'उच्च शिक्षणाचे अर्थशास्त्र' या विषयावर होते. भाषण तयार करताना काही मुद्यांची चर्चा मी त्यांच्याशी केल्याचे स्मरते आहे. विशेषत: सरकारने शिक्षणावरील खर्च वाढवला पाहिजे असे मी सुचवताना त्याच्या अंदाजपत्रकी तरतुदी कशा असाव्यात याचेही मार्गदर्शन त्यांनी मला केले.

अतिशय शांत, मितभाषी, सरळ स्वभावाचे निगर्वी सप्रे सर माणसांचे लोभी होते. संस्थेमध्ये किंवा विद्यापीठ पातळीवर काम करताना गॉसिपिंग करणे, कंपू करणे, अवास्तव महत्त्वाकांक्षा ठेवणे, निलाजऱ्या तडजोडी करणे यांपासून ते कटाक्षाने दूर राहिले. सच्चेपणा आणि प्रामाणिकपणाची मूल्ये लहानपणी स्काउटमध्ये सहभागी असल्याने मिळाली असे ते म्हणत. घरातली मांजरे हा त्यांचा विरंगुळा होता. मांजरांच्या सवयींवर ते जिव्हाळ्याने बोलत असत. कॉलेजमध्ये (आणि सेवानिवृत्तीनंतर घरीही) त्यांनी अनेक दुर्मीळ झाडांची लागवड आणि जोपासना केली होती. संस्थेच्या कामानिमित्त अनेक वेळा आम्हाला मुंबईला जावे लागे. परतीच्या वाटेवर खंडाळा, तळेगाव येथील नर्सरींमधून अनेक अनोखी झाडे आणून त्यांनी कॉलेजमध्ये लावली होती व त्यांची लहान मुलासारखी जोपासना केली होती. सेवानिवृत्तीनंतरही त्यांचे जेव्हा कॉलेजमध्ये येणे होई तेव्हा सर्व आवारात फिरून आपण लावलेल्या झाडांची वाढ ते निगुतीने पाहात.

डॉ. सप्रे यांच्या दु:खद निधनाने एक शिस्तप्रिय शिक्षक, सोज्वळ शिक्षणप्रेमी व एक भला माणूस आपल्यातून निघून गेला. त्यांना माझी विनम्र आदरांजली.

◆

---

ज्ञानाच्या गुंतवणूकीमध्ये सर्वोत्तम व्याज मिळते.

**- ब्रेन्जामिन फ्रँकलिन**

---

# पाणी विपणन : एक उद्‌बोधन

**शि. ना. माने** †

आज एका बाजूला पाणी प्रश्नाच्या नवीन परिप्रेक्ष्यातून विचार करण्याची वेळ आली आहे. जलविज्ञान व जलतज्ज्ञ हा प्रश्न पोटतिडकीने मांडत आहेत. दुसऱ्या बाजूला 'लेक्सस' सारख्या दर दिवशी ३०० चार चाकी आरामगाड्यांचे कारखान्यात उत्पादन करावे तसे पाण्याचे उत्पादन करणे आपणाला शक्य नाही. म्हणून आपणाला भूगर्भातील व भूपृष्ठावरील उपलब्ध पाण्यावर अवलंबून राहावे लागते. पाण्याचा काटकसरीने वापर करावा लागतो. कोणी म्हणेल यात नवीन ते काय? हे सर्व आम्हाला ठाऊक आहे. आणि त्यांचे हे मत अगदीच चुकीचे नाही. कारण येथे अर्थशास्त्राची पुढील एक व्याख्या आठवते : जे उघड (Obvious) आहे ते जो सांगत सुटतो तो अर्थशास्त्रज्ञ. म्हणून मित्रांनो, खरे नवीन, दडलेले (उघड नव्हे) ते पुढेच आहे.

विख्यात जलतज्ज्ञ माधवराव चितळे यांनी लिहिलेला मूलगामी व पथदर्शक लेख ('पाण्याचे दर व मूल्य', अर्थसंवाद, जानेवारी-मार्च, २०१९) वाचला. आणि त्यात त्यांनी उल्लेख केलेल्या 'पाण्याचे विपणन' या नवीन परंतु आतापर्यंत दुर्लक्षित संकल्पनेवर माझे चित्त खिळले. लेविस कॅरॉल यांच्या प्रसिद्ध कवितेतील पुढील तीन दिशादर्शक ओळी आठवल्या:

"The time has come", the
Walrus (जलचरी प्राणी ) said,
"To talk of many things ...."

चितळे यांनी स्पेन व ऑस्ट्रेलिया देशांतील त्यांच्या समृद्ध अनुभवाच्या संदर्भात त्यांच्या संकल्पनेचा उल्लेख मात्र केला आहे. अधिक विस्तार नाही. अर्थसंवादच्या वाचकांसाठी त्यांची गरज होती व आहे. अशा अवघड परिस्थितीत त्या संकल्पनेत सूचित होणाऱ्या पैलूंविषयी मी साधक-बाधक स्पष्टीकरण करण्याचे साहस करत आहे. साहस यासाठी की, माधवराव चितळ्यांच्या कल्पनेतील संकल्पनेच्या पुष्पमालेत माझी एक दुर्वा ठेवत आहे. त्यातील त्रुटी माझ्या असतील. आता तथाकथित स्पष्टीकरणाचा विचार करू.

विशेषत: महाराष्ट्रातील मागील ५९-६० वर्षांतील पाणी व्यवस्थापन व पाणी वापर जमेस धरता, चितळे यांच्या पाण्याचे विपणन संकल्पनेत पुढील संभवनीय पैलू सूचित होतात.

१. माधवराव चितळे यांच्या 'पाण्याचे अर्थशास्त्र' (पृ. ३५५) व 'पाण्याचे विपणन' (पृ. ३५५) या संज्ञांचा रोख पाहता, पाणी विपणन बाजारचलित धोरणाकडे झुकलेले हवे. एक सुरुवात म्हणून साठवण, शुद्धीकरण, वितरण व उत्सर्जन यांच्यात नव्याने भांडवली गुंतवणूक खर्चाचा समावेश हवा.

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, निवृत्त प्राध्यापक, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा.
आजीव सभासद क्र. : १०८, भ्रमणध्वनी : ७७३८३५६७८१

तरच किंमत व मूल्य यांच्यातील पारंपरिक व प्रसिद्ध (Proverbial) विरोधाभासाची जागा सुसंगती घेईल.

२. इतर वस्तूंप्रमाणेच पाण्याच्या टंचाईच्या व अधिक्याच्या काळात पाण्याचे दर जास्त-कमी असणे जरूर आहे. त्यामुळे विशेषतः टंचाईच्या काळात पाण्याचा अपव्यय टाळण्यास अंशतः मदत होऊ शकते.

३. पाणी जर आर्थिक वस्तू असेल, तर त्याला भविष्यात बाजारपेठीय नियमांपासून फार काळ स्वतंत्र ठेवणे परवडणारे नाही.

आता पाण्याच्या सामान्य उपयोगकर्त्यांकडून तुलनेने पाणी जास्त घेणाऱ्या विशिष्ट पीकांकडे व दुसऱ्या पैलूंकडे वळू. पाणी विपणनाच्या आणखी दोन-तीन फलप्रमाणवादी (Pragmatic) पैलूंचा उल्लेख करू. त्यापूर्वी महाराष्ट्रावरील संभवनीय संकटाचा उल्लेख करू.

**महाराष्ट्र : ऊस शेती, साखर कारखाने व दुष्काळ :-**

आज महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत पाण्याला जर चलनी नाणे म्हटले तर महाराष्ट्रातील ऊस शेतीला व साखर कारखान्यांना त्या नाण्याच्या दोन बाजू म्हणावे लागेल. दोन्ही बाजूंने चित्र आज विदारक आहे. पूर्वी जमीनदार (Landlords) होते. आज त्यांची जागा जलाढ्य (Waterlords) घेत आहेत. आज महाराष्ट्रात दुष्काळ घोषित झाला आहे. नेतागण दुष्काळ अभ्यास दौरे, दुष्काळ आढावे, शेतकरी संवाद इत्यादींमध्ये मग्न आहे. दुष्काळ निवारणात कटिबद्ध झाला आहे. विनोदाचा भाग असा की, ऊस व साखर कारखाने तथाकथित दुष्काळास प्रारंभिक अर्थाने कारणीभूत ठरतात. हे वास्तव कोण लक्षातच घेत नाही. 'दुष्काळ, दुष्काळ' असा सार्वत्रिक आक्रोश आहे. 'सत्याचाच जय होतो' असा सर्वांचाच पुकार आहे. 'असत्याचा नाही' हे सगळेच विसरले आहेत (सत्यमेव जयते। नानृतम्।). किंबहुना असत्याचा विजय होत नाही, हे अभिव्यक्ती स्वातंत्र्यच आपण हरवून बसलो नाहीत ना? ग्रामीण महाराष्ट्रातील ही विदारक स्थिती वेळीच थोपवली नाही तर महाराष्ट्राची अर्थव्यवस्था 'प्रतिसादशून्य सपाटीकरणाच्या सापळ्यात' (Dysflation trap) सापडेल. एवढ्या अल्पशा वळणानंतर परत आपण पाणी विपणनाच्या पुढील पैलूंचा विचार करू.

४. पाणी प्रश्नाचे अभ्यासक विलासराव साळुंखे एके ठिकाणी म्हणतात की, महाराष्ट्रात पीकाखालील एकूण जमिनीपैकी ऊसाखालील क्षेत्र फक्त ६ टक्के आहे. परंतु उपलब्ध पाण्यापैकी ७०-७५ टक्के पाणी एकटा ऊस घेतो. अशा वेळी उसासाठीच्या पाण्याचा दर तुलनेने जास्त असणे गरजेचे नाही काय?

५. काही प्रदेशात अतिरेकी पाणी वापरामुळे उसाखालील जमिनीचे विद्रुपीकरण होते. ती खारपड होते. ती नापीक बनते. त्या नापिकीची किंमत कोण चुकती करणार? पाणी विपणनाचे तत्त्व सांगते की, प्रदुषकानेच प्रदुषणाची किंमत चुकती केली पाहिजे. जेणेकरून भविष्यात खारपडीच्या प्रमाणाला अटकाव बसेल.

माधवराव चितळ्यांची पाणी विपणनाची संकल्पना व तिला केंद्रस्थानी ठेवून वर उपस्थित केलेले मुद्दे यांतून एक नवी संस्थावादी चौकट अधोरेखित होते. नवीन पाणी-दराशी संबंधित निरनिराळे घटक त्या नव्या व्यवस्थेला कसा प्रतिसाद देतात यावर पाणी विपणनाचे यश अवलंबून असेल. जास्त पाणी सेवन करणारा ऊस उत्पादक चढा दर देण्यास सहजपणे तयार होणार नाही. लोकतांत्रिक सरकारला ऊस उत्पादक शेतकऱ्याला नाखूष ठेवणे परवडणार नाही. नवीन वित्तव्यवस्थेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांची अवस्था नाजूक होणार. मग जुनाट, प्रतिगामी व पाण्याचा न परवडणारा अपव्यय करणाऱ्या आजच्या व्यवस्थेला चिकटून बसावयाचे काय? याला एखादा पर्याय नाही काय? पर्याय आहे. प्रत्येक घटकाला त्याच्या गरजेनुसार पाणी मिळावयाला हवे याविषयी तडजोड होऊ शकते. आज नाही तर उद्या गरजेपेक्षा जास्त पाणी घेणारा तडजोडीस तयार होऊ शकतो. अंतिमतः ऊस पाणी पितो व कारखाना रस पितो, हे तिरपागडे मानव-राहाटीला मानवणारे नाही.

◆

# डिपॉप्युलेशन (Depopulation)

**शि. ना. माने †**

पुढील परिच्छेदांत डिपॉप्युलेशन या इंग्रजी संज्ञेच्या मराठी पर्यायाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी तीन पातळ्यांवरील उदाहरणांचा विचार केला आहे.

जागतिक पातळीवर भूक, उपासमार, दुष्काळ, वाईट हवामान, साथीचे रोग, प्राकृतिक आपदा आणि महायुद्धे यांच्यामुळे मोठी जीवितहानी झाली. १३३०-३९ या दशकात तथाकथित 'ब्लॅक डेथ' ने (आपण त्याला मृत्युचा सापळा संबोधू) आशिया, युरोप व उत्तर आफ्रिकेत ७५ दशलक्ष ते ६०० दशलक्ष लोकांचा बळी घेतला. इंग्लंडमध्ये प्रत्येक १० लोकांमागे ४ लोक दगावले. लोकसंख्या ३.७ दशलक्षवरून २.२ दशलक्षापर्यंत घटली किंवा संकोचली.

दुसरे उदाहरण मुगाबे यांच्या झिंबाब्वे देशाचे आहे. झिंबाब्वेचे उदाहरण येथे सहेतुकपणे घेतले आहे. त्याचा खुलासा पुढे योग्य ठिकाणी केला आहे. आपण जाणता की झिंबाब्वेमध्ये १९८२ मध्ये सत्तांतर झाले. सत्ताधीश (Despot) मुगाबे यांचा उदय झाला. ते अभिमत संप्रदायाचे कडवे टीकाकार होते. झिंबाब्वेच्या स्वातंत्र्याचा उद्गाता अशी त्यांनी स्वत:ची ओळख निर्माण केली. ते भेदभावाच्या अर्थशास्त्राचे (Economics of Discrimination) कट्टर पुरस्कर्ते होते. सत्तेवर आल्यानंतर लगेच त्यांनी एक फर्मान जारी केले. त्याचा आशय पुढे दिला आहे. उत्पादन खर्चापेक्षा सरकारनियंत्रित अल्प किमतींना वस्तुंचा पुरवठा करणे गौरवर्णीय उत्पादकांना बंधनकारक. परंतु तोटयाची भरपाई करण्यास मनाई. अभिमत अर्थशास्त्राचा सिद्धांत सांगतो त्याप्रमाणे दुकानांतील वस्तुंची कपाटे रिकामी. वस्तू गायब. परिणाम? अदमासे ३० लक्ष लोकांचे शेजारच्या देशांत पलायन (नव्हे, अघोषित अपहरण). ७ लक्ष नागरी लोकांच्या उद्योगांचे स्थलांतरण. आंतरराष्ट्रीय पैसा निधीच्या एका माफक अंदाजानुसार भावफुगवटा १,००,००० टक्के (२००७). अधिकृत विनिमय दर १ अमेरिकी डॉलर = १,००,००० झिंबाब्वेचा डॉलर. भावफुगवट्याची उच्चांकी घोडदौड सुरूच. २००८ मध्ये एका संख्याशास्त्रज्ञाने उपहासाने म्हटल्याप्रमाणे त्या वर्षात किंमत निर्देशांक काढण्यासाठी वस्तूच उपलब्ध नव्हत्या. १० पैकी ८ झिंबाब्वी बेकार. नोकरदाराचा १/३ पगार १ कि. खाद्यतेलावर खर्च होऊ लागला. १ कि. साखर मिळण्याची मारामार. मात्र काळ्या बाजारात जबर किमतींना वस्तू उपलब्ध. त्रस्त व भयभीत लोकांचे हरारेत आंदोलन (२००८). आंदोलकांवर पोलीसांचा अश्रुधूर. जुलै, २०१८

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, निवृत्त प्राध्यापक, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा.
आजीव सभासद क्र. : १०८, भ्रमणध्वनी : ७७३८३५६७८१

पदच्युत, चक्रमादित्य मुगाबेंच्या झिंबाब्वेत नव्या सरकारसाठी निवडणुका झाल्या. निवडणूक प्रचार धुमधडाक्यात सुरू होता. (दी इकॉनॉमिस्ट, नोव्हें. ३०-डिसें. २००२; मे १९- २५, २००७; जून २३- २९, २००७ आणि जुलै २८ - ऑगस्ट ३, २०१८).

तिसरे उदाहरण आहे सुमारे ७५ वर्षांपूर्वी प्लेगच्या साथीने हैराण झालेल्या सावर्डे (ता. तासगाव, जि. सांगली) गावाचे. गावाची लोकसंख्या जेमतेम १५०० च्या आसपास. प्लेगच्या साथीने सर्व कुटुंबे गावाबाहेर पडली. 'गाव फुटले' असा शब्दप्रयोग रूढ झाला. दिवसाकाठी ५-१० लोकांचा बळी पडू लागला. २-३ महिन्यानंतर साथ आटोक्यात आली. लोक आपापल्या घरी परतू लागले. १००-१५० लोक हाकनाक बळी पडले. अदमासे १३००-१४०० मागे जीवंत राहिले. कोण गेले यापेक्षा '..... आता गावात राहिले कोण?' ही चर्चा काही दिवस गावभर ऐकावयाला मिळत होती, असे जुने-जाणते लोक सांगतात. गावपातळीवरील हा एक प्रकारचा लोकसंख्या क्षय होता.

प्रत्येक विवाहित स्त्रीमागे आज १ व १.५ टक्के जननप्रमाण असलेल्या अनुक्रमे द.कोरिया व जपानसारख्या घसरत्या लोकसंख्येच्या देशात 'आता वृद्धांची काळजी कोण घेणार?' हा प्रश्न उभा आहे. पूर्वी मृत्युच्या सापळ्याला कोण व कसे रोखणार, हा प्रश्न भेडसावत होता. दोन प्रश्न एकमेकांपासून मूलत: भिन्न आहेत, त्यांची उत्तरेही भिन्न असणार. असो.

आता मागील झिंबाब्वेच्या सहेतुक उल्लेखाचा खुलासा करू. कोणी असा प्रतिवाद करतील की पहिल्या व तिसऱ्या उदाहरणांतील लोकांची जीवितहानी झाली. तशी दुसऱ्या उदाहरणात प्राकृतिक जीवितहानी झाली नसताना लोकसंख्या संकोच किंवा लोकसंख्या क्षय हा पर्याय अवास्तव नाही काय? या प्रश्नाचे उत्तर पुढीलप्रमाणे दिले आहे. कार्यकारी वयोगटातील प्रत्येक व्यक्ती, मग ती कोणत्याही व्यवसायात असो, जशी व्यवसायाला दायित्व (Liability) असते तशी ती त्या व्यवसायाला मत्ताही (Asset) असते. तिच्या ठिकाणी कौशल्य असते तशी कल्पकताही असते. गरज आहे ती कौशल्य व कल्पकता यांचा सुयोग्य समन्वय साधणाऱ्या व्यवसाय व्यवस्थापकाची किंवा उपयोगकर्त्याची. अर्थशास्त्र गुरू व व्यवस्थापनशास्त्र गुरू त्याला (समन्वयाला) परस्परानुकूल्यन (Reciprocity) म्हणतात. चक्रमादित्य मुगाबेंच्या राजवटीत त्याचा अभाव होता. तथाकथित परस्परानुकूल्यनाची अपरिमित हानी झाली होती. प्राकृतिक हानीपेक्षा ती जास्त विदारक व विध्वंसक असते ना? विशेषत: झिंबाब्वे देशाच्या भविष्याचा विचार करता, देश सोडून पलायन केलेल्या लोकांपेक्षा त्यांच्यातील अपव्यायित किंवा फुकटात गेलेल्या मत्ता (Wasted Assets) जास्त सूचक नाहीत काय? शिवाय, २१ व्या शतकातील 'ज्ञान अर्थव्यवस्थेत' (Knowledge Economy, WDR, 2005) प्राकृतिक मत्तेपेक्षा (जमीन, हात) तंत्रविद्याविषयक अमूर्त व कालसापेक्ष मत्तेला (छाप-ओळख, मेंदू) दुय्यम लेखणे परवडेल काय? तिच्याकडे पाठ फिरविणे म्हणजे 'ग्रीक ट्रॅजेडीला' आमंत्रण देणे. तिची चर्चा यथावकाश.

वरील तीन पातळ्यांवरील (जग, देश व खेडे) उदाहरणांच्या आधारे लोकसंख्या संकोच व लोकसंख्या क्षय हे मराठी पर्याय सुचवू इच्छितो. आज प्रमोशनसाठी पदोन्नती व डीमोशनसाठी पदावनती किंवा इन्फ्लेशनसाठी भावफुगवटा व डीफ्लेशनसाठी चलनसंकोच व चलनक्षय हे पर्याय रूढ झाले आहेत. मग डिपॉप्युलेशनसाठी लोकसंख्या संकोच व लोकसंख्या क्षय हे पर्याय रूढ होण्यास काय हरकत आहे?

◆

# सस्टेनेबल डेव्हलपमेंट (Sustainable Development)

**जे. एफ. पाटील** †

सस्टेनेबल डेव्हलपमेंट या शब्द गटात डेव्हलपमेंट म्हणजे 'विकास' हा अर्थ रूढ झाला आहे. वृद्धी (Growth) व विकास (Development) असा फरकही स्वीकृत झाला आहे.

पण 'सस्टेनेबल' या विश्लेषणात्मक शब्दाच्या वापरात मराठीत बराच फरक आढळतो. सध्याचे लेखन वाचल्यास Sustainable या शब्दासाठी मराठीत पुढील शब्दांचा वापर होताना दिसतो. सक्षम, चिरंतर, टिकावू, संवर्धनक्षम सातत्यपूर्ण.

इंग्रजी शब्दकोषांचा आधार घेतल्यास Sustain या क्रियापदापासून सुरुवात करावी लागेल. सस्टेनचा अर्थ 'टिकून राहणे, तग धरणे(Hold Up), आधार किंवा मदत देणे (Support or Relief) पोषण करणे(Hourish or Sustonmance), तसेच पेलणे (to carry or with stand) असे अर्थ रूढ झालेले दिसतात.

विकासाच्या अर्थशास्त्रामध्ये Sustainable Development चा अर्थ 'असा विकास (आजचा)जो पुढील पिढीच्या गरजांची पूर्तता करता येईल, या पद्धतीने उपलब्ध साधनसामग्रीचा वापर करतो', असा अर्थ. अर्थातच, अधिक शहाणपणाचा, सभ्यतेचा व सुसंस्कृतपणाचा व सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवणारा आहे.

विकासासाठी प्रयत्न करताना साधनसामग्रीचा वापर होणार, तो वाढतही जाणार. भूमी, पाणी, तापमान, ऊर्जा, प्रकाश, मनुष्यबळ, खनिजे, लाकूड इ. साधनसामग्री वापरणे, वाढते उत्पादन रोजगार व विकासासाठी आवश्यक असते. साहजिकच आजच्या समाजाच्या गरजा व अधिक उच्चतर पातळीवर उद्याच्या समाजाच्या गरजा यांच्यात समन्वय साधला जाईल, अशा पद्धतीने उत्पादन, वाटप प्रक्रिया वापरली जाईल. साधनसामग्री काटकसरीने वापरली जाईल अशा स्वरूपाच्या विकासाला (विकास प्रक्रियेला) Sustainable Development असे म्हणावे लागेल. त्या अर्थाने प्रस्तुत लेखकाच्या मते,

'टिकावू विकास' व 'संवर्धनक्षम विकास' हे दोन शब्दप्रयोग लक्षात घ्यावे लागतील. काही प्रमाणात 'सातत्यपूर्ण विकास' असाही शब्दप्रयोग वापरणे योग्य ठरेल. अर्थवाचक शब्द वा शब्दगट प्रस्थापित करण्यासाठी 'संवर्धनक्षम विकास', सातत्यपूर्ण विकास वा टिकावू विकास असे शब्दप्रयोग योग्य वाटतात. अर्थपूर्ण निवड करायची झाल्यास 'संवर्धनक्षम विकास' हाच पर्याय योग्य वाटतो.

◆

† माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष व विश्वस्त मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. : ६२, भ्रमणध्वनी : ९४२२०४६३८२, ई-मेल : jfpatil@rediffmail.com

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## नवीन आजीव सभासद

## (दि. १-४-२०१८ ते ३१-३-२०१९)

| अ.क्र. | आजीव सभासदांचे नाव | आजीव सभासद क्र. | पावती क्र. | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | ठावरी विठ्ठल निळकंठराव | १७६२ | ४३४ | ५१००-०० |
| २. | बनकर वनिता केरुजी | १७६३ | ४३५ | ३१००-०० |
| ३. | पाटील प्रणया महेंद्र | १७६४ | ४३६ | ३१००-०० |
| ४. | शिरसी राजेंद्र शिवयोगी | १७६५ | ४३७ | ५१००-०० |
| ५. | भोकसे उमेश चिंघु | १७६६ | ४३८ | ३१००-०० |
| ६. | मुंगमोडे आस्तीक ताराचंद | १७६७ | ४३९ | ५१००-०० |
| ७. | पांडे अभिजीत शामसुंदर | १७६८ | ४४० | ३१००-०० |
| ८. | पिंगळे सोनाली सतिश | १७६९ | ४४१ | ३१००-०० |
| ९. | सोनवणे प्रशांत ब्रिजलाल | १७७० | ४४२ | ५१००-०० |
| १०. | गौरकार चंद्रशेखर नामदेव | १७७१ | ४४३ | ५१००-०० |
| ११. | श्रीवास्तव सतिश गुलाबसिंह | १७७२ | ४४४ | ५१००-०० |
| १२. | गुडधे मनोहर आनंदराव | १७७३ | ४४५ | ५१००-०० |
| १३. | महेशकर आरती दशरथजी | १७७४ | ४४६ | ५१००-०० |
| १४. | जाधव अभय नामदेवराव | १७७५ | ४४७ | ५१००-०० |
| १५. | सुर्वे विजय चंद्रभान | १७७६ | ४४८ | ५१००-०० |
| १६. | कसबे सचिन नागोराव | १७७७ | ४४९ | ५१००-०० |
| १७. | ताकतोडे प्रदिप विठ्ठलराव | १७७८ | ४५० | ५१००-०० |
| १८. | थगनर बाळासाहेब केशवराव | १७७९ | ४५१ | ३१००-०० |
| १९. | महाजन संजय मारोतराव | १७८० | ४५२ | ५१००-०० |
| २०. | सोरते रवि सुधाकर | १७८१ | ४५३ | ५१००-०० |
| २१. | मालेकार विशाल वासुदेवराव | १७८२ | ४५४ | ५१००-०० |
| २२. | दुर्गे निलेश अडण | १७८३ | ४५५ | ५१००-०० |
| २३. | आदे राजू लक्ष्मण | १७८४ | ४५६ | ५१००-०० |
| २४. | बोबडे स्वप्नील कनीराम | १७८५ | ४५७ | ५१००-०० |
| २५. | वाटमोडे जगदिश रामभाऊजी | १७८६ | ४५८ | ५१००-०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६. | शास्त्रकार रवि मुरलीधर | १७८७ | ४५९ | ५१००-०० |
| २७. | पाटील गजानन भाऊराव | १७८८ | ४६० | ५१००-०० |
| २८. | कुंदूरकर राजेश्वर गंगागौड | १७८९ | ४६१ | ३१००-०० |
| २९. | सावंत विकास प्रल्हादराव | १७९० | ४६२ | ५१००-०० |
| ३०. | दोनाडकर संजय श्रीहरी | १७९१ | ४६३ | ५१००-०० |
| ३१. | अनपट काकासाहेब जालिंदर | १७९२ | ४६४ | ५१००-०० |
| ३२. | कारभारी भालचंद्र काशिनाथ | १७९३ | ४६५ | ५१००-०० |
| ३३. | राचलवार संजय बाबुराव | १७९४ | ४६६ | ५१००-०० |
| ३४. | घुगल सुनिल प्रभाकर | १७९५ | ४६७ | ५१००-०० |
| ३५. | झेंडे अनिल सुभाष | १७९६ | ४६८ | ३१००-०० |
| ३६. | ढाले मिलींद हरिभाऊ | १७९७ | ६६९ | ५१००-०० |

आर. बी. भांडवलकर
कार्यवाह - खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

## प्रा. नी. वि. सोवनी व्याख्यान देणगी

| अ.नं. | देणगीदारांची नावे | पावती क्र. | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | दि. व्यं. जहागिरदार | ३३९ | २५०००-०० |

## देणगी

| अ.नं. | देणगीदारांची नावे | पावती क्र. | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | चारुदत्त गोखले | ३४० | ५०००-०० |

मराठी अर्थशास्त्र परिषद

## इमारत निधी

| अ. क्र. | देणगीदारांची नावे | आजीव सदस्य क्र. | पावती क्र. | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | सु. दा. तुपे | ३६ | ३१२ | ५०००-०० |
| २. | रूपा शहा | ४८५ | ३३२ | २०००-०० |
| ३. | दिपक भुसारे | १४७९ | ३३३ | २५०-०० |
| ४. | मंजुषा मुसमाडे | ९३१ | ३३४ | २५०-०० |
| ५. | प्रमोद लोणारकर | १५६४ | ३३५ | ५००-०० |
| ६. | उषा पाटील | १५०० | ३३६ | १०००-०० |
| ७. | प्राचार्य डॉ. पी. ई. विभुते | १६४३ | ३३७ | ५००-०० |
| ८. | किशोर कदम | १३०१ | ३३८ | १०००-०० |

टीप :- आजीव सभासद रु.५१००/- मध्ये इमारत निधीचे रु.२०००/- समाविष्ट आहेत.

बुध्दीने पैसे कमावता येतात,
पण पैशाने बुध्दी नाही.

**- आचार्य चाणक्य**

जर कुबेरसुध्दा आपल्या उत्पन्नापेक्षा
जास्त खर्च करावयास लागला तर तोही भिकारी बनेल.

**- आचार्य चाणक्य**

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## ४३ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, सोलापूर

## शोधनिबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच शीर्षक आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उपविषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.

२. सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करू नये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्द्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.

३. जी माहिती एम. ए. पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण असू नये. कारण ते सर्वांना माहीत असते. त्या माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.

४. समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय/ प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक- सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

५. निबंधात वेगवेगळ्या भागामध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

६. निबंधात शक्यतो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या ‘अर्थशास्त्र परिभाषा कोश’ यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दाचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञाचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

७. निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पद्धतीनुसार असणे आवश्यक आहे.

८. शोधनिबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन, वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पद्धतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल.

९. निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा / संदर्भ सूची प्रमाणित पद्धतीने असावी.

१०. निबंधाच्या अखेरीस ३०० शब्दांत गोषवारा देणे अनिवार्य आहे.

११. शोधनिबंध सूचनेत दिलेल्या फॉन्टमध्येच पाठवावेत. कारण तो फॉन्ट आयोजक महाविद्यालयाने सुचविला आहे.

१२. शोधनिबंध दिलेल्या तारखेपूर्वी पाठविण्यात यावे.

**आर.बी.भांडवलकर**
कार्यवाह-खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## ४३ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, सोलापूर

## शोधनिबंध लेखकांसाठी निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४३ वे वार्षिक अधिवेशन अभिजित कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड सोशल सायन्सेस, सोलापूर येथे दिनांक ३१ ऑक्टोबर व १ आणि २ नोव्हेंबर २०१९ रोजी आयोजित केले आहे. अधिवेशनाचे अध्यक्षस्थान रामदास.य.माहोरे, नागपूर हे भूषविणार आहेत. अधिवेशनातील चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१) महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचाराची समर्पकता.

२) भारतीय शेतीसंबंधी पारित करण्यात आलेल्या कायद्याचे पुनर्रावलोकन.

३) महाराष्ट्राच्या जडणघडणीत छत्रपती शिवाजी महाराजांचे योगदान.

वरील विषयाचे मार्गदर्शन टिपण अर्थसंवादमधून प्रकाशित केले जाणार आहेत. ऐनवेळेचा चौथा विषय परिषदेचे अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील, त्याविषयावर सदस्यांकडून शोधनिबंध मागविले जात नाहीत.

सदर अधिवेशनाकरिता शोधनिबंध स्वीकारण्याची अंतिम तारिख ३१ ऑगस्ट २०१९ ही राहील. निबंधलेखकांनी आपले शोधनिबंध जास्तीत जास्त २००० शब्दांत लिहावयाचे असून निबंधासोबत ३०० शब्दांत त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. शोधनिबंध मराठी फॉन्ट Unicode किंवा Shivaji मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही फॉन्ट वापरू नये. फॉन्ट साईज १४ मध्ये असावा. शोधनिबंधाची सॉफ्ट कॉपी (सीडी) व दोन हार्ड कॉपीज मा. अध्यक्षांकडे पाठवाव्यात. शोधनिबंध लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचा आजीव सभासद असला पाहिजे. निबंध मराठीतच असावेत, ते पूर्वी कोठेही प्रकाशित केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक, महाविद्यालय/ विद्यापीठाचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीत देणे आवश्यक आहे.

निबंध लेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

**रामदास य. माहोरे**
'यशवंत'४०, शास्त्री लेआऊट,
सुभाषनगर चौक, जयताळा रोड, नागपूर- ४४००२२
ई-मेल - drrymahore@yahoo.com.
भ्रमणध्वनी - ९८२२७०६१९१

**आर.बी.भांडवलकर**
कार्यवाह-खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

सदर वार्षिक अधिवेशनाचे स्थानिक कार्याध्यक्ष - व्ही. एस. मंगनाळे, संचालक तसेच स्थानिक कार्यवाह - प्रितम प्रवीण कोठारी, सोलापूर ४१३००३ (भ्रमणध्वनी ९९२३३०३९१३) ई-मेल - pritampkothari@gmail.com हे आहेत.

## 'अर्थसंवाद'च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (2335) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२. **शोधनिबंधाची प्रत अथवा सीडी पोष्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाइल व त्याचीच PDF केलेली फाइल) ई–मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई–मेल ॲड्रेसवर पाठवावी.** पेपरबरोबर संपादकांना शोधनिबंध पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई–मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई–मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई–मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. शोधनिबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. शोधनिबंधात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पुढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, (२०१०). (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452


मराठी अर्थशास्त्र परिषदेस हार्दिक सदिच्छा

सरस्वती शिक्षण, क्रीडा, ग्रामीण विकास व बहुउद्देशीय संस्था, ढोरवी
द्वारा संचालित व
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित

# स्व. गणेश भास्करराव शिंगणे (३६८) वरिष्ठ महाविद्यालय

देऊळगाव मही, ता.देऊळगाव राजा, जि.बुलढाणा ४४३२०६



अध्यक्ष
श्री.जनार्धन मुरकुट



प्राचार्य
प्रा.रमेश मुरकुट

## महाविद्यालयाची वैशिष्टये

महाविद्यालयाची सुसज्ज इमारत

विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती निर्माण व्हावी यासाठी रुची निर्माण करणे.

अनुभवी व उच्च विद्याविभूषित प्राध्यापक

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

सीए. सीएस, आयसीडब्लूए विषयी मार्गदर्शन

आयसीआयसीआय, अक्सिस, महिंद्रा कोटक, एक्विडस्
अशा विविध बँकांमध्ये प्लेसमेंट सुविधा

सौजन्य : डॉ. गणेश मांगडे, दापोली